सेव्हींग व करंट
खात्यांवर मिळवा
7% व्याजदर
दि जैन मर्चन्टस् को-ऑप.
क्रेडीट सोसायटी लि.
श्री. संजय काठेड (संस्थापक)
Mo. 9372444001
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ,
कापड बाजार, अ.नगर.
फोन नं. : 0241-2993900

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२(६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ०७.११.२०२६ | अंक नं. १८६ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
Since 1935
मे. हरी धाकाजी देडगांवकर
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.



डायनिंग सेट | कपाट | सोफासेट

सर्वांना दिवाळी पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा..
यंदाची दिवाळी
हरीषचे अत्याधुनिक फर्नीचर सोबत..!
फेस्टीवलसाठी भरपूर व्हेरायटी
बंगला असो किंवा ऑफिस, शोरूम असो किंवा फॅक्टरी
हरीष स्टील फर्निचर
शॉप नं.६ स्मिता अपार्टमेंट, सावेडी रोड, अ.नगर. 9822506521, 9850890005



डबल बेड | ऑफिस खुर्ची | ऑफिस टेबल

HAPPY DIWALI
शुभेच्छूक
कांतीलाल चंदुलालजी कोठारी
आनंद कांतीलालजी कोठारी
हर्ष कोठारी प्रेम कोठारी
अमोल ताथेड
एवं समस्त कोठारी परिवार
जामखेड व अहिल्यानगर

यंदाची सुवर्णखरेदी दिवाळी धमाका ऑफर भरघोस फायद्याची..
₹999/- प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची) + ₹111/- चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)
सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे 11 एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी*
(प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)
ऑफर कालावधी - 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध
शुध्दतेनुसार सोन्याचा दर 22 कॅरेट = (91.6 शुध्दता)
शुध्दतेनुसार चांदीचा दर

चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02



2014 पासुन आपल्या सेवेत..सोनेरी नातं..
Conditions Apply*

सेल! सेल !! सेल!!!
ऑफर ! ऑफर !! ऑफर !!!
MULTI BRAND HUB
SALE UPTO 80%
THE BRAND FACTORY OUTLET
7 नोव्हेंबर ते 10 नोव्हेंबर
दिवाळीच्या खरेदीचा महास्फोट!
१०० हून अधिक ब्रँड्सवर ८०% टक्क्यांपर्यंत सूट
कपडे फक्त ९९ रुपयांपासून!
साड्या अवघ्या १५०/-, २००/- आणि २५०/-
रुपयांपासून; महिला व पुरुषांसाठी १०० टक्के
ओरिजिनल राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ब्रँड्सचे भव्य कलेक्शन!
adidas PUMA Reebok HRX Lee Cooper SINCE 1908
REDTAPE Allen Solly Est 1744 FILA U.S. POLO ASSN. SINCE 1890 JOCKEY
स्थळ : माऊली सांस्कृतिक भवन,
हॉटेल पॅराडाईज शेजारी, न्यू टिळक रोड,अहिल्यानगर

OLA
ग्राहकांच्या पसंतीची "OLA"
डिलरशिप आता अहिल्यानगर मध्ये
विख्यात OLA वाहनांची सर्व रेंज उपलब्ध
OLA S1 Pro & Pro+



Smart Features
Proximity Unlock | Cruise Control | Vacation Mode | Advanced Regen | Built-in Speakers with Concert Mode

शुभयान ऑटो प्रा. लि.
माणिकनगर शिल्पागार्डन समोर, अहिल्यानगर. संपर्क: 90214 27330
श्रीरामपुर -संपर्क: 70208 51564, नेवासा - संपर्क: 97661 94709,
जामखेड - संपर्क: 77967 80386, दौंड - संपर्क: 84828 68958

SONI Since 1965
TILES
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज



नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२(६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ०७.११.२०२६ | अंक नं. १८६ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

चाहूल लागता थंडीची... आठवते दुकान जरीवालाची
। स्वेटर्स । जॅकेट। 2 in 1 जर्किन
। टोपी । ग्लोज । सॉक्स । मफलर
लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी.
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
आता पुण्यात सुद्धा..

जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505
जरीवाला मेन्स, महाजनवाडी, अहिल्यानगर.मो. 9850216268



₹11 लाखांची
1111 बक्षिसे
जिंकण्याची संधी...
विश्वसनीय कापडांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर 02425-222226 | अ.नगर 0241-2999299 | नारायणगाव 02132-242132 | श्रीरामपूर 02422-220090 | नाशिक 9920552780


नव्या घरात
आनंदाची नवी पहाट!
Serenity
या दिपावलीच्या
शुभमुहूर्तावर
बुक करा
आपल्या
हक्काचं नवं घर
बुकिंग सुरु
अत्याधुनिक
सुविधांनी सुसज्ज
टेरेस गार्डन
आधुनिक बांधकाम
सुसज्ज पार्किंग सुविधा
अत्याधुनिक डिजिटल
सुरक्षा प्रणाली
प्राईम
लोकेशन
प्रीमियम
फ्लॅट्स
3BHK
LUXURIOUS APARTMENT

PROJECT BY -
VASUDHA GROUP
कवीजंग नगर, युनियन बँकेजवळ, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर
9730969093 | 9860182219

या दिवाळीत
स्वप्नातील घराला द्या
सुंदर सुरुवात!
Pristine
बुकिंग सुरु
या दिवाळीच्या शुभमुहूर्तावर
बुक करा आपल्याहक्काचं नवं घर
अत्याधुनिक
सुविधांनी सुसज्ज
टेरेस गार्डन
आधुनिक बांधकाम
सुसज्ज पार्किंग सुविधा
अत्याधुनिक डिजिटल
सुरक्षा प्रणाली
3BHK
LUXURIOUS APARTMENT
रेडी पझेशन
प्राईम लोकेशन
प्रीमियम फ्लॅट्स

PROJECT BY -
VASUDHA GROUP
डुंगरवाल हॉस्पिटल शेजारी, सावेडी नाका, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9881883993 | 9860182219 | 9730969093

ना नफा ना तोटा पहिली तीन वर्ष.. कृपया त्याचा फायदा घ्या
कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
रत्नकमल™ चहा
दिवाळी धमाका पॅकेटमध्ये
कुकर,
दहा किलो पिशवी,
आरती संग्रह,
पाऊच यांचे
रँडमली कुपन


इतर कंपन्यांपेक्षा
५० ते ७० रुपये कमी किलो मागे
स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम..
ब्रँडेड कंपनीचा चहा व
रत्नकमल चहा
एक वेळेस जरुर तुलना करुन पहा
आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर,अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367



15TH AUG
HAPPY
INDEPENDENCE
DAY OFFER
Career Ki Shuruat DISHA ke saath
An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE
Get Any Course Just in 2700/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME, ADV. TALLY,
BANKING, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW,
PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING,
C++, CANVA, HTML.
दिल्ली गेट शाखा 9371051769 | जुने बस स्टँड शाखा 9371151769 | पाईपलाईन शाखा 7447761769
Career Ki Shuruat DISHA ke saath



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

मिळकतीच्या मर्यादा आणि आकांक्षांचा/अपेक्षांचा वाढता आवाका



राजन कुटे

प्रत्येकाच्या आयुष्यात काही ना काही आकांक्षा असतात. चांगलं घर, अधिक आरामदायी जीवनशैली, मुलांचं चांगलं शिक्षण, कुटुंबासाठी उत्तम सुविधा आणि भविष्यात आर्थिक सुरक्षितता. या आकांक्षा असणं स्वाभाविक आहे. त्या आपल्याला पुढे जाण्याची प्रेरणाही देतात.

मात्र एक मुख्य मुद्दा नजरे आड जातो आहे–आपल्या आकांक्षांचा वेग आणि आपल्या उत्पन्नाचा वेग यांच्यात ताळमेळ आहे का?

उत्पन्न वाढतं तसं जीवनमान सुधारतं. पण अनेकदा उत्पन्नाबरोबरच अपेक्षाही वाढत जातात. कालपर्यंत पुरेसं वाटणारं घर आज लहान वाटू लागतं. वापरात असलेली गाडी बदलण्याची इच्छा निर्माण होते. सुट्टीसाठी नवी ठिकाणं, अधिक महागड्या वस्तू आणि अधिक सोयीसुविधा आकर्षित करू लागतात. यात काही गैर नाही. प्रश्न तेव्हा निर्माण होतो, जेव्हा या सगळ्या इच्छा पूर्ण करण्यासाठी आपण आपल्या आर्थिक क्षमतेपेक्षा अधिक खर्च करू लागतो.

यामागे केवळ वैयक्तिक इच्छा नसतात. आपल्या आजूबाजूचं वातावरणही त्यावर परिणाम करत असतं. मित्रमंडळींची जीवनशैली, सहकाऱ्यांच्या खरेदी, सोशल मीडियावर दिसणारे प्रवास आणि अनुभवऱ्या सगळ्यांमुळे आपल्याही आयुष्यात काही गोष्टी असायलाच हव्यात, असं वाटू लागतं. कधी आपण एखादी वस्तू तिची गरज आहे म्हणून घेतो; तर कधी इतरांकडे आहे म्हणून ती आपल्याकडेही असावी असं वाटतं.

इथेच 'मला हे हवं आहे' आणि 'मला हे आत्ताच हवं आहे' यामधला फरक महत्त्वाचा ठरतो.

एखादी गोष्ट हवी असणं चुकीचं नाही. पण ती मिळवण्यासाठी योग्य वेळ, आर्थिक तयारी आणि प्राधान्यक्रम यांचा विचार न करता निर्णय घेतला, तर आजची इच्छा उद्याचा आर्थिक ताण बनू लागतो. मिळकत मर्यादित असताना खर्च मात्र सतत वाढत राहिला, तर बचत आणि गुंतवणुकीसाठी उरणारी रक्कम कमी होत जाते. काही वेळा कर्जावर अवलंबून राहण्याची वेळही येते.

उदा. समजा, एखाद्या कुटुंबाचं मासिक उत्पन्न ₹१ लाख आहे. घरखर्च, शिक्षण, विमा, कर्जाचे हप्ते आणि इतर आवश्यक खर्च भागवल्यानंतर काही रक्कम बचतीसाठी शिल्लक राहते. पण जीवनशैलीशी संबंधित खर्च वाढत गेले, तर हीच बचत हळूहळू कमी होऊ लागते. उत्पन्न वाढण्याआधी खर्च वाढला, तर भविष्यातील आर्थिक उद्दिष्टांसाठी लागणारा वेळही वाढू शकतो.

याच ठिकाणी बचत आणि गुंतवणुकीची भूमिका समजून घेणं महत्त्वाचं ठरतं. आपण आपल्या नियमित उत्पन्नासाठी काम करत असतो; पण त्याच वेळी आपली गुंतवणूकही भविष्यासाठी शांतपणे काम करत राहू शकते. एका अर्थाने, ती आपली मूक सहकारी किंवा silent side hustle असते. आपण रोजच्या आयुष्यात व्यस्त असताना, गुंतवलेला पैसा योग्य नियोजन आणि पुरेसा कालावधी मिळाल्यास भविष्यातील उद्दिष्टांसाठी संपत्ती उभी करण्याच्या प्रवासात हातभार लावू शकतो. मात्र वाढत्या खर्चामुळे गुंतवणुकीसाठी जागाच उरली नाही, तर हा शांतपणे सुरू असलेला प्रवासही मर्यादित होतो.

याचा अर्थ आकांक्षा कमी कराव्यात किंवा स्वतःला चांगलं आयुष्य देण्याची इच्छा सोडावी, असाही नाही. मात्र प्रत्येक आकांक्षेला आर्थिक नियोजनात योग्य जागा मिळायला हवी. काही गोष्टींसाठी अधिक उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न करता येतो. त्यासाठी कौशल्यवाढ, मेहनत आणि काही प्रमाणात त्यागही आवश्यक असू शकतो. पण उत्पन्न वाढेपर्यंत खर्चावर नियंत्रण ठेवणंही तितकंच महत्त्वाचं आहे.

'आपल्या चादरीच्या लांबीप्रमाणे पाय पसरावेत' ही म्हण याच साध्या आर्थिक शहाणपणाची आठवण करून देते. याचा अर्थ आपली चादर कायम लहानच ठेवावी असा नाही; ती मोठी करण्यासाठी प्रयत्न करावेत. पण ती मोठी होण्याआधीच त्यापेक्षा जास्त लांबी गृहीत धरून चालणं धोक्याचं ठरतं.

खरं तर आर्थिक शिस्त म्हणजे केवळ खर्च कमी करणं नाही. आपल्या पैशातून काय साध्य करायचं आहे, कोणत्या गोष्टींना प्राधान्य द्यायचं आहे आणि कोणत्या गोष्टींसाठी थोडं थांबणं योग्य ठरेल, हे ठरवणं म्हणजे आर्थिक शिस्त.


आकांक्षा आपल्याला पुढे जाण्याची दिशा देतात; पण त्या पूर्ण करण्यासाठी आर्थिक क्षमता, वेळ आणि नियोजन यांची साथ आवश्यक असते. उत्पन्न वाढत असताना बचत आणि गुंतवणूकही वाढत आहे का, याकडे लक्ष देणं गरजेचं आहे. कारण जीवनमान उंचावण्याच्या प्रयत्नात भविष्यातील आर्थिक स्वातंत्र्य मागे पडू नये. आपल्याला काय हवं आहे, हे समजून घेणं जितकं महत्त्वाचं आहे, तितकंच ते कधी आणि कशा पद्धतीने मिळवायचं हे ठरवणंही महत्त्वाचं आहे.

आकांक्षा मोठ्या असू द्या; पण त्यांना पूर्ण करण्याच्या प्रवासात आपल्या आर्थिक क्षमतेचं भान कायम राहू द्या.

स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

– **राजन कुटे**, अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०


आनंदीबाई शेकटकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सावेडी येथील नोबेल हॉस्पिटल मागील धनाजीनगर येथील रहिवासी श्रीमती आनंदीबाई वसंतराव शेकटकर (वय ९१) यांचे ६ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ४ मुले, सुना, १ मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. बाळासाहेब, अशोक, राजू, संजय, लता गवते यांच्या त्या मातोश्री होत.

रावसाहेब भोजने यांचे हृदयविकाराने निधन



नगर – कडा येथील रहिवासी व हॉटेल संतकृपाचे संचालक रावसाहेब लक्ष्मण भोजने (वय ५१) यांचे ६ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ७ नोव्हेंबर रोजी कडा स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, १ भाऊ, भावजय, पत्नी, २ मुले असा परिवार आहे.

नगर शहरात ९ नोव्हेंबरला लग्न रेषा माहिती चित्रपटाचे ऑडिशन

मुलींचा जन्मदर वाढविणे, स्त्रीभ्रूणहत्या रोखणे आणि मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा उद्देश



नगर – मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव दूर करून मुलींच्या जन्माचे स्वागत व्हावे, स्त्रीभ्रूणहत्येला आळा बसावा आणि मुलींच्या शिक्षणाबाबत समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हावा, या सामाजिक उद्देशाने 'लग्न रेषा' या माहितीपटाची निर्मिती करण्यात येणार आहे. जय युवा अकॅडमी, ॲक्शन फॉर वेल्फेअर डेव्हलपमेंट असोसिएशन आणि स्वप्नपूर्ती क्रिएशन मूव्ही कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने हा सामाजिक आशयाचा माहितीपट साकारण्यात येत आहे. या माहितीपटासाठी पाडव्याच्या मुहूर्तावर अर्थात ९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून अहिल्यानगरमधील कल्याण रोड येथील जाधव लॉन्स येथे कलाकार निवडीसाठी ऑडिशन घेण्यात येणार आहे. अशी माहिती दिग्दर्शक तुषार रणनवरे, निर्माते प्रा. डॉ. रमेश वाघमारे आणि ॲड. महेश शिंदे यांनी दिली.

समाजात आजही काही ठिकाणी मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव केला जात असल्याचे चित्र दिसून येते. विशेषतः काही कुटुंबांमध्ये मुलीच्या जन्माबाबत नकारात्मक मानसिकता असून, मुलगा–मुलगी समानतेचा विचार अद्याप सर्व स्तरांपर्यंत प्रभावीपणे पोहोचलेला नाही. ही मानसिकता बदलण्यासाठी केवळ कायदे आणि नियम पुरेसे नसून समाजाच्या विचारांमध्ये परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे. मुलींच्या जन्माचे आनंदाने स्वागत करणे, स्त्रीभ्रूणहत्या रोखणे, महिलांचे आरोग्य जपणे आणि मुलींना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देणे, या विषयांवर व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे.

याच सामाजिक जाणिवेतून 'लग्न रेषा' या माहितीपटाची संकल्पना पुढे आली आहे. मनोरंजनाच्या माध्यमातून समाजाला विचार करायला लावणारा आणि सामाजिक प्रश्नांबाबत सकारात्मक परिवर्तन घडविण्यास प्रेरणा देणारा हा माहितीपट संपूर्ण महाराष्ट्रात लोकचळवळीच्या स्वरूपात पोहोचविण्याचा प्रयत्न राहणार आहे. मुलींच्या अस्तित्वाचा सन्मान, स्त्री–पुरुष समानता आणि समाजातील जुनाट विचारसरणीत बदल घडविण्याचा संदेश या माध्यमातून दिला जाणार असल्याचे ॲड. महेश शिंदे यांनी सांगितले.

या माहितीपटासाठी चार ते साठ वर्षे वयोगटातील महिला व पुरुष कलाकारांना संधी देण्यात येणार आहे. डॉक्टर, वकील, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ, गावातील प्रमुख व प्रतिष्ठित व्यक्ती, प्रमुख भूमिकेतील स्त्री–पुरुष कलाकार, सहाय्यक कलाकार, खलनायक, बालकलाकार तसेच युवक–युवती अशा विविध भूमिकांसाठी कलाकारांची निवड केली जाणार आहे. त्यामुळे अभिनयाची आवड असणाऱ्या नवोदितांसह अनुभवी कलाकारांनाही या सामाजिक उपक्रमात सहभागी होण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

इच्छुक कलाकारांनी ९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता कल्याण रोड येथील जाधव लॉन्स, अहिल्यानगर येथे उपस्थित राहून ऑडिशन द्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या सामाजिक माहितीपटाच्या निर्मितीसाठी राजेंद्र उदागे, ॲड. अनिता दिघे, आरती शिंदे, प्रतिभा गांधी, रोहिणी थोरात, पूजा बनकर, जयश्री शिंदे, भाऊसाहेब पादीर, बाळासाहेब शिंदे, राजकुमार चिंतामणी, संतोष लयचेट्टी आणि ॲड. दिनेश शिंदे आदी प्रयत्नशील आहेत. माहितीसाठी ९८२२९७४९२३ व ९९२१८१००९६.

भंडारदऱ्यात १४ व १५ नोव्हेंबर रोजी दहावे राज्यस्तरीय पर्यावरण संमेलन

नगर – निसर्गाचे संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि पर्यावरणविषयक जनजागृतीचा संदेश समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने १४ व १५ नोव्हेंबर रोजी इकोसिटी (घाटघर) भंडारदरा अकोले येथे १० व्या राज्यस्तरीय पर्यावरण संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यभरातील पर्यावरणप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी, शेतकरी आणि निसर्ग संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या संस्थांनी या संमेलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

हे संमेलन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे मार्गदर्शनाखाली होणार आहे. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री राहिबाई पोपेरे राहणार असून, उद्घाटनप्रसंगी लिज्जत पापडचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश कोते उपस्थित राहणार आहेत. याशिवाय विशेष कार्य अधिकारी मंत्रालय मुंबई चंद्रकांत आडे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी चंद्रकांत शिंदे, पुणे महानगरपालिकेचे अधीक्षक अभियंता नामदेव गिंभिरे, कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याचे सहाय्यक वनसंरक्षक अनिल पवार आणि सी.एस. आर. प्रमुख संतोष जगधने संमेलनाला उपस्थित राहणार आहेत.

१४ नोव्हेंबर रोजी सकाळी निसर्गभ्रमंती व नाथा कार्यक्रमाने संमेलनाची सुरुवात होईल. त्यानंतर पर्यावरण संमेलनाचे उद्घाटन, भोजन आणि विविध विषयांवरील व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. पुणे येथील डी.वाय. पाटील विद्यापीठाचे प्रा. डॉ. मोहन बी. वामन हे वनस्पती वर्गीकरणशास्त्र, लोकवनस्पतिशास्त्र आणि जैवविविधता संवर्धन या विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. ज्येष्ठ बांबू अभ्यासक, संशोधक व लेखक राजेंद्र कुलकर्णी हे बांबू व गवत प्रजातींचा अभ्यास, संशोधन आणि संवर्धन याविषयी विचार मांडणार आहेत. पर्यावरण व शाश्वत विकासातील विविध पैलूंवरही या संमेलनात चर्चा होणार आहे. सायंकाळी पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा आढावा, आदिवासी, कातकरी समाजाच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारे सांस्कृतिक कार्यक्रम आणि सहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.

१५ नोव्हेंबर रोजी योग व प्राणायाम रानकवी तुकाराम धांडे यांच्या मार्गदर्शनाखाली समारोपाचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय घाटघर, सांदणदरी, अमृतेश्वर मंदिर, विविध धबधबे, भंडारदरा धरण आणि रंधा फॉल यांसारख्या परिसरातील निसर्गरम्य स्थळांना भेट देण्याची संधीही उपलब्ध होणार आहे.संमेलनात सहभागी व्हावे, असे आवाहन निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे, कार्याध्यक्ष महेश पाडेकर, छायाताई राजपूत, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब डोंगर, सतिश नेहे, उपाध्यक्ष रामनाथ भोजने आणि संमेलन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



फटाक्यांचा धूर, ध्वनिप्रदूषण आणि पर्यावरणाची हानी टाळून निसर्गपूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश देत निमगाव वाघा (ता. नगर) येथे फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली.

शहीद जवानांच्या स्मारकासमोर पर्यावरण रक्षणाचा संकल्प

नगर – फटाक्यांचा धूर, ध्वनिप्रदूषण आणि पर्यावरणाची हानी टाळून निसर्गपूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश देत निमगाव वाघा (ता. नगर) येथे फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली. शहीद जवान गोरख नाना जाधव यांच्या स्मारकस्थळी हा पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम उत्साहात पार पडला.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि पै. नाना डोंगरे व्यायामशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामस्थ, युवक–युवती आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येत फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संकल्प केला.

सध्या परिसरात दुष्काळाचे सावट असून पाणीटंचाईची समस्या गंभीर बनत आहे. त्यातच वाढते वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. सण–उत्सव साजरे करताना निसर्गाचेही भान ठेवणे काळाची गरज बनली आहे. दिवाळीचा आनंद फटाक्यांच्या आवाजात नव्हे, तर दिव्यांच्या प्रकाशात, आपुलकीत आणि सामाजिक बांधिलकीत शोधला पाहिजे, हा विचार या उपक्रमातून मांडण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी उपस्थित ग्रामस्थांना फटाकेमुक्तीची शपथ दिली. फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच पशुपक्ष्यांना होणारा त्रास टाळण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने दिवाळी साजरी करावी, असे आवाहन करण्यात आले. पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, हा संदेश यावेळी देण्यात आला.

देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या जवानांच्या स्मृतीला अभिवादन करत समाजाप्रती आणि पर्यावरणाप्रती आपले कर्तव्य जपण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी भाऊसाहेब जाधव, बापू सुंबे, पोपट भगत, रमेश कुलट, राजू डोंगरे, बाळू जाधव, उत्तम निमसे, नवनाथ जाधव, भागचंद जाधव, बापू पुंड, हुसेन शेख, बाबूभाई शेख, अजय फलके, संदीप डोंगरे, किरण ठाणगे, राजू शिंदे, भाऊ होळकर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

पर्यावरणाचा विचार न करता केलेल्या विकासामुळे देशाचे टाऊन प्लॅनिंग कोलमडले

पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत पर्यावरण संवर्धनासाठी पद्मश्री पोपटराव पवार यांचे मार्गदर्शन; १५ हजार वृक्षांच्या संगोपनाचे आवाहन



उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत साई द्वारका सेवा ट्रस्ट व अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनाच्या विषयावर आयोजित बैठकीत पद्मश्री पोपटराव पवार यांनी मार्गदर्शन केले. (छायाचित्र – लहू दळवी)

नगर – भारताची मूळ परंपरा निसर्गाशी जोडलेली आहे. मात्र, पर्यावरणाचा कोणताही विचार न करता ओढे–नाले यांमध्ये अतिक्रमणे, नद्यांच्या पूररेषेचे उल्लंघन करून बांधकामे आणि विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात वृक्षतोड व जंगलतोड सुरू आहे. त्यामुळे आपल्या देशाचे टाऊन प्लॅनिंग पूर्णपणे कोलमडले आहे, असे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले.

उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत साई द्वारका सेवा ट्रस्ट व अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनाच्या विषयावर आयोजित बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी उपमहापौर धनंजय जाधव, संजय गुगळे, कैलास दिघे, हर्षल आगळे, राजेंद्र पवार, प्रताप काळे, अमोल बागुल, राहुल मुथा उपस्थित होते.

झाडांचे जतन मुलांप्रमाणे करावे

श्री. पवार म्हणाले, धनंजय जाधव यांच्या पुढाकारातून शहरात आतापर्यंत १५ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. मात्र, केवळ वृक्षलागवड करून चालणार नाही, तर दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या काळात लावलेली झाडे कशी जगवायची, याचे योग्य नियोजन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने लावलेले झाड जतन करून त्याला मुलाप्रमाणे सांभाळले पाहिजे. हेच आपल्या पुढील पिढीचे खरे भविष्य आहे.

अहिल्यादेवी होळकर यांचा आदर्श घ्यावा

पवार यांनी सातबारा संकल्पनेचा संदर्भ देत वृक्षांचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, ब्रिटिश भारतात आल्यानंतर त्यांनी जमीन महसूल पद्धतीचा अभ्यास केला. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील जमीन महसूल पद्धत, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या काळातील पद्धत आणि पेशव्यांच्या काळातील महसूल पद्धतीचा अभ्यास करण्यात आला. त्यावेळी अहिल्यादेवी होळकर यांच्या काळात झाडांना पाण्याइतकेच महत्त्व दिले जात होते. बारा झाडे लावायची, त्यापैकी सात झाडांची फळे जमीन मालकाने घ्यायची आणि पाच झाडांची फळे महसूल म्हणून सरकारला द्यायची, अशी पद्धत होती. या संदर्भातून वृक्षांचे आर्थिक व पर्यावरणीय महत्त्व स्पष्ट होते.

साई द्वारका सेवा ट्रस्टचा उपक्रम प्रेरणादायी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने आपल्या अहिल्यानगर शहराची ओळख आहे. त्यामुळे त्यांना अभिप्रेत असलेले पर्यावरणसंतुलित आणि पाणीदार शहर घडविण्यासाठी धनंजय जाधव यांनी हाती घेतलेल्या पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेत सर्वांनी सहभागी व्हावे. साईबाबांची प्रेरणा समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी आहे. त्याच भावनेतून साई द्वारका सेवा ट्रस्टचा हा उपक्रम पुढील पिढीच्या भविष्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.


पर्यावरण हा मतपेटीचा विषय नाही

पर्यावरणाचा समतोल बिघडल्यामुळे आज जगभरात सामाजिक आणि विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या समस्यांच्या अनेक कारणांपैकी मोठ्या प्रमाणावरील जंगलतोड हे एक महत्त्वाचे कारण आहे. पर्यावरण हा मतपेटीचा विषय नसून, तो पुढील पिढ्यांच्या अस्तित्वाशी संबंधित विषय आहे. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन पर्यावरण संतुलनासाठी काम करणे आवश्यक आहे.

मनुष्याने निसर्गावर प्रेम करणे आवश्यक


धनंजय जाधव म्हणाले, दुष्काळाच्या काळात या वृक्षांचे संगोपन व्हावे, यासाठी पाण्याचे नियोजन आणि पर्यावरण संवर्धन या विषयांवर पद्मश्री पोपटराव पवार यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. मनुष्याने निसर्गावर प्रेम करणे आवश्यक आहे. वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असून, दिवसेंदिवस वाढणारे तापमान कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे आणि लावलेल्या वृक्षांचे संगोपन करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असे आवाहन त्यांनी केले.

जयकुमार फिरोदिया यांचे अपघाती निधन



नगर – बालाजीनगर, नक्षत्र लॉन समोरील रहिवासी जयकुमार प्रकाशलाल फिरोदिया (वय ४०) यांचे ६ नोव्हेंबर रोजी चाकण रोड येथे अपघाती निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, २ बहिणी, पत्नी, २ मुली असा परिवार आहे.

निर्मलाबाई बोरा यांचे संथारा व्रतात निधन



नगर – अनुरॉन ग्रॅण्ड, हॉटेल आयरिस जवळ माणिकनगर, स्टेशन रोड येथील रहिवासी निर्मलाबाई अशोक बोरा (वय ७१) यांचे ६ नोव्हेंबर रोजी संथारा व्रतात निधन झाले. त्यांनी प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी म.सा. यांच्या मुखारविंदने संथारा घेतला होता. त्यांच्यावर जैन परंपरेनुसार अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पती अशोक बन्सीलाल बोरा ('मनोराज'वाला), २ मुले मनोज व राजेश बोरा, विवाहित मुलगी सुजाता सचिन गांधी, दीर प्रकाश व दिलीप बोरा, पुतणे सीए परेश बोरा, सीए रुपेश बोरा, सुना, नातवंडे रोहित बोरा, श्रृती बोरा, निर्वी बोरा असा परिवार आहे.

अहिल्यानगरच्या ८ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ४०३ कोटी रुपये जमा



मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

नगर – जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली असून नूकसानीपोटी अग्रीम मदत जिल्ह्यातील सुमारे ८ लाख ७ हजार २८४ शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये प्रत्येकी पाच हजार रुपयांची मदत जमा झाली आहे. या माध्यमातून सुमारे ४०३ कोटी ६४ लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग झाले असल्याची माहिती जलसंपदा तथा अहील्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा सातत्याने आढावा घेत शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी शासनस्तरावर केलेल्या पाठपुराव्याच्या पार्श्वभूमीवर या मदत वितरणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये पावसाचे दिलेली ओढ, पिकांची झालेली हानी, घटलेले उत्पादन आणि वाढता शेतीचा खर्च यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले होते.राज्य सरकारने नूकसानीपोटी शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रीम मदत दिवाळीपुर्वी देण्याची घोषणा केली होती. दुष्काळाची गंभीरता लक्षात घेऊन पालकमंत्री विखे यांनी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात टंचाई आढावा बैठका घेवून प्रत्येक तालुक्यातील परिस्थितीचा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अहवाल यांना सादर केला होता. प्रशासनाला आवश्यक उपाय योजनांसाठी सूचना दिल्या होत्या.

शेतकऱ्यांना मिळाला आर्थिक आधार

राज्य सरकारने शेतकऱ्यांना जाहीर केलेल्या मदतीसाठी पहील्या ट्रीगर मध्येच जिल्ह्याचा समावेश झाल्याने शासनाकडून तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांनी पाठपुरावा केला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन मदत वितरणाची प्रक्रिया राबविली. त्यानुसार जिल्ह्यातील सुमारे८ लाख ७ हजार २८४ शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये प्रत्येकी पाच हजार रुपयांप्रमाणे ४०३ कोटी ६४ लाख रूपये जमा झाले आहेत. थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून ही मदत वितरित झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळाला आहे.

प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी

शेतकऱ्यांवरील संकटाच्या काळात त्यांना केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष आर्थिक मदत मिळवून देणे आवश्यक आहे, ही भूमिका पालकमंत्री विखे यांनी सातत्याने मांडली आहे. जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा, वीजपुरवठा आणि शेतीच्या नुकसानीसंदर्भात प्रशासनाच्या माध्यमातून विविध उपाययोजनांचा आढावा मंत्री विखे सातत्याने घेत आहेत. आर्थिक मदतीमुळे शेतकऱ्यांना तातडीच्या गरजा भागविण्यासाठी आधार मिळणार असून आगामी शेती हंगामाच्या तयारीसाठीही या रकमेचा उपयोग होऊ शकतो. उर्वरित पात्र लाभार्थ्यांपर्यंतही मदत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना पालकमंत्री विखे यांनी दिल्या आहेत.



एमआयडीसीतील सालासर हुंडाईत द ऑल न्यू बेयॉनचे अनावरण व लोकार्पण पोलीस निरीक्षक हेमंत पाटील व मॅनेजिंग डायरेक्टर आदित्य खडके यांच्या हस्ते झाले.

सालासर हुंडाई शोरुम मध्ये द ऑल न्यू बेयॉनचे अनावरण

अत्याधुनिक तंत्रज्ञान, प्रगत सुरक्षा आणि प्रीमियम सुविधांनी सज्ज नव्या बेयॉनची ग्राहकांना पर्वणी

नगर – हुंडाईच्या द ऑल न्यू बेयॉन या आकर्षक कारचे एमआयडीसी येथील सलासार हुंडाई शोरूममध्ये अनावरण करण्यात आले. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील आणि सलासार हुंडाईचे मॅनेजिंग डायरेक्टर आदित्य खडके यांच्या हस्ते नव्या कारचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी पोलीस कॉन्स्टेबल उमेश शेरकर, पोलीस हवालदार राजेंद्र सुद्रिक, जनरल मॅनेजर गोकुळ डाके, सेल्स मॅनेजर शेख मुद्सर व तसेच शोरूम मधील कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

आधुनिक डिझाइन, अत्याधुनिक तंत्रज्ञान, प्रगत सुरक्षा व्यवस्था आणि प्रीमियम सुविधांचा सुरेख संगम असलेली ही कार ग्राहकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. ADAS लेव्हल–२, सहा एअरबॅग्ज आणि ३२ हून अधिक सुरक्षा सुविधा, सनरूफ, वायरलेस चार्जिंग, ३६० डिग्री कॅमेरा, ड्युअल झोन क्लायमेट कंट्रोल आणि आकर्षक इंटिरिअर अशा सुविधांमुळे ही कार विशेष ठरणार आहे.

ग्राहकांना केवळ दर्जेदार वाहनच नव्हे, तर तत्पर विक्रीपश्चात सेवा देण्यासही सलासार हुंडाई कटिबद्ध आहे. ग्राहकांच्या पसंतीनुसार विविध आकर्षक रंगांमध्ये ही कार उपलब्ध असून, नामांकित बँका व वित्तीय संस्थांच्या माध्यमातून १०० टक्के ऑन–रोड फायनान्स आणि झिरो प्रोसेसिंग फीची सुविधा देण्यात येत आहे. तसेच हुंडाई प्रॉमिसअंतर्गत जुन्या वाहनाच्या एक्स्चेंजची सुविधाही उपलब्ध आहे.

नव्या बेयॉनची पाहणी आणि टेस्ट ड्राइव्हसाठी ग्राहकांनी एमआयडीसी येथील सलासार हुंडाई शोरूमला भेट द्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या या नव्या कारच्या आगमनामुळे अहिल्यानगरच्या वाहन बाजारात आणखी एक आकर्षक पर्याय उपलब्ध झाला आहे.

'गवळी समाजातील विविध मागण्यांचे' उपसभापती सचिन आहेर यांना निवेदन



विधानपरिषदेचे उपसभापती सचिन आहेर यांना गवळी समाज राज्य कार्यकारणीचे सदस्य बाळासाहेब खताडे यांनी विविध मागण्यांचे निवेदन दिले.

नगर – अहिल्यानगर येथील गवळी समाजाचे राज्य कार्यकारणी सदस्य बाळासाहेब महादू खताडे यांनी मुंबई येथे राज्याचे विधानपरिषदेचे उपसभापती सचिन आहेर यांची भेट घेऊन त्यांना विविध मागण्याचे निवेदन सादर करून त्यांच्याशी चर्चा केली. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर गवळी समाजाने सन १९३१ मध्ये सि.स.नं. ६९३१ स्मशानभुमीसाठी खरेदी केलेल्या मालकी हक्काच्या जागेवरील अतिक्रमण झोपडपट्टी काढण्यात यावेत. गवळी समाजाच्या स्मशानभूमीच्या जागेवर काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने एका व्यक्तीने वैयक्तिक नाव लावले आहे. त्याची सखोल चौकशी करुन त्या व्यक्तीवर सदर अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करुन नगर मधील गवळी समाजाला न्याय मिळवुन दयावा.

गवळी समाजाचे नगर व बीड जिल्हयाच्या हद्दीवर पुरातन मंदिर ब्रम्हसिध्देश्वर सावरगांव या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता जिर्णोध्दासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा, या मंदिरात महिन्याच्या प्रयेक अमावस्येला अहिल्यानगरमधून भंडाऱ्याचे नियोजन केले जाते व दरवर्षी श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी मोठ्या प्रमाणात भंडाऱ्याचे नियोजन केले जाते. त्याठिकाणी मोठी यात्रा भरते. त्या यात्रेसाठी तीन राज्यातून महाराट्र, कर्नाटक, व गोवा या ठिकाणाहुन गवळी समाजाचे जवळपास २५ ते ३० हजार भाविक लोक येतात. यासाठी आपण राज्य सरकारच्या माध्यमातुन निधी उपलब्ध करून द्यावा.

दुष्काळामध्ये ग्रामीण भागात ज्या पध्दतीने जनावरांसाठी राज्य सरकारकडून छावणीचे नियोजन करण्यात येते. त्या पध्दतीने शहरी भागात सुध्दा छावणी किंवा चारा डेपोची व्यवस्था करण्यात यावी. त्यामुळे कष्टकरी गवळी समाजाला त्याचा लाभ मिळेल, असे या निवेदनात खताडे यांनी म्हंटले आहे.

समाजातील वंचित घटकांची दिवाळी गोड करण्यासाठी डाक विभागाचा माणुसकीचा उपक्रम

विकास पालवे यांच्या संकल्पनेतून १५० गरजू एकल महिलांना किराणा किटचे वाटप

नगर– दिवाळी म्हणजे आनंद, प्रकाश, मांगल्य आणि आपुलकीचा सण! मात्र समाजातील प्रत्येकाच्या आयुष्यात हा आनंद सारख्याच प्रमाणात पोहोचतो असे नाही. अनेक गरजू, वंचित आणि संघर्षशील महिलांच्या आयुष्यात आर्थिक परिस्थितीमुळे सणाचा आनंद मर्यादित राहतो. अशाच महिलांच्या आयुष्यात आनंदाचा दीप प्रज्वलित करण्याचा संवेदनशील आणि स्तुत्य उपक्रम अहिल्यानगर डाक विभागाच्या वतीने राबविण्यात आला.

स्नेहालय संचलित उमेद प्रकल्प आणि साऊ एकल महिला समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिवाळी भाऊबीज स्नेहमेळाव्याचे औचित्य साधून डाक विभागाच्या वतीने समाजातील गरजू वंचित एकल महिलांना १५० किराणा किटचे सन्मानपूर्वक वाटप करण्यात आले. प्रवर अधीक्षक डाकघर अहिल्यानगर विकास पालवे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या अभिनव सामाजिक उपक्रमाने दिवाळीच्या आनंदाला माणुसकीची आणि सामाजिक बांधिलकीची सुंदर किनार लाभली.

रेहमत सुलताना हॉल, सर्जेपुरा, अहिल्यानगर येथे पार पडलेला हा स्नेहमेळावा केवळ एक कार्यक्रम नव्हता, तर संघर्षमय जीवन जगणाऱ्या महिलांना आधार, आपुलकी आणि सन्मान देणारा माणुसकीचा हृदयस्पर्शी सोहळा ठरला. या कार्यक्रमास अहिल्यानगरचे प्रवर अधीक्षक डाकघर विकास पालवे, स्नेहालयचे गिरीश कुलकर्णी, साऊ एकल महिला समितीचे निमंत्रक हेरंब कुलकर्णी, एकता परिषदेचे संस्थापक सदस्य व ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. पी. व्ही. राजगोपाल तसेच कॅनडाच्या शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक न्यायाच्या पुरस्कर्त्या डॉ. जिल कॅर हॅरिस यांची उपस्थिती होती.

सामाजिक संवेदनशीलतेतून साकारलेली माणुसकीची दिवाळी

समाजातील वंचित, गरजू आणि संघर्षशील एकल महिलांच्या आयुष्यात दिवाळीचा आनंद फुलावा, त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटावे आणि कोणत्याही आर्थिक विवंचनेशिवाय त्यांनाही सन्मानाने सण साजरा करता यावा, या उदात्त भावनेतून मान्यवरांच्या हस्ते १५० किराणा किटचे वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना प्रवर अधीक्षक पालवे म्हणाले की, आजचा हा कार्यक्रम म्हणजे केवळ किराणा किट वाटपाचा उपक्रम नसून माणुसकीचा उत्सव आणि सामाजिक संवेदनशीलतेचा जागर आहे. समाजातील गरजू घटकांच्या दुःखात सहभागी होऊन त्यांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करण्याचा डाक विभागाचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.



अहिल्यानगर डाक विभागाच्या वतीने दिवाळीनिमित्त गरजू एकल महिलांना किराणा किटचे सन्मानपूर्वक वितरण करताना प्रवर अधीक्षक विकास पालवे, गिरीश कुलकर्णी, हेरंब कुलकर्णी व इतर.

संघर्षाच्या कहाण्यांनी उपस्थितांचे डोळे पाणावले

या स्नेहमेळाव्यातील सर्वांत भावस्पर्शी क्षण म्हणजे संघर्षशील एकल महिलांपैकी दोघींनी आपल्या आयुष्यातील संघर्षमय प्रवास उपस्थितांसमोर मांडला. परिस्थितीशी दोन हात करत, अनेक अडचणींवर मात करून जीवन जगताना त्यांना आलेले अनुभव ऐकताना उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. मात्र, या कठीण प्रवासात स्नेहालयाच्या बालभवन प्रकल्पाने दिलेला आधार आणि सहकार्य अत्यंत मोलाचे ठरल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. त्याचबरोबर डाक विभागाने दिलेले योगदान आमच्यासाठी निश्चितच महत्त्वाचे असून, या मदतीमुळे दिवाळीच्या सणात आम्हाला आनंद आणि समाधान मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

चिमुकल्या सिद्धीची ५१०० रुपयांची अनोखी भाऊबीज!

या कार्यक्रमात माणुसकीचे आणि सामाजिक संस्कारांचे एक अत्यंत सुंदर उदाहरण पाहायला मिळाले. डाक विभागातील कर्मचारी प्रितम वराडे यांची कन्या सिद्धी वराडे हिने आपल्या आई–वडिलांनी खाऊसाठी दिलेले पैसे वर्षभर जपून साठवले होते. स्वतःच्या छोट्या छोट्या आनंदासाठी वापरता आले असते असे हे पैसे तिने समाजातील गरजू महिलांच्या मदतीसाठी देणगी म्हणून दिले. तिने तब्बल ५१०० रुपयांची देणगी या सामाजिक उपक्रमासाठी दिली. याबाबत बोलताना सिद्धी म्हणाली, आई–बाबांनी मला खाऊसाठी दिलेले पैसे मी वर्षभर साठवले. ते पैसे या उपक्रमासाठी देणगी म्हणून देता आले, याचा मला खूप आनंद होत आहे. सिद्धीच्या या निरागस आणि संवेदनशील कृतीने उपस्थितांची मने जिंकली. लहान वयातच दुसऱ्यांच्या दुःखाची जाणीव ठेवून मदतीचा हात पुढे करणाऱ्या सिद्धीचे सर्वांनी कौतुक केले. खऱ्या अर्थाने सामाजिक संस्कारांची ही दिवाळीतील अनमोल भेट ठरली.

माणुसकीचा दीप असाच तेवत राहो

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी डाक विभागातील सुभाष शिंदे, प्रितम वराडे, रामेश्वर ढाकणे, दीपक नागपुरे, सुखदेव पालवे, सलीम शेख, अमोल साबळे, महेश सदाफुले, विजय चाबुकस्वार,गणेश केसकर यांच्यासह डाक परिवारातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले. यावेळी डाक विभागातील अधिकारी–कर्मचारी, स्नेहालय परिवाराचे सदस्य आणि दीडशेहून अधिक एकल महिला उपस्थित होत्या. दिवाळीत आपण आपल्या घरात दिवे लावतो, फराळ करतो, आनंद साजरा करतो; परंतु आपल्या आनंदात समाजातील वंचित आणि गरजू घटकांनाही सहभागी करून घेतले, तरच दिवाळीचा खरा अर्थ सार्थ ठरतो. अहिल्यानगर डाक विभागाने राबविलेला हा उपक्रम याच विचारांची प्रचिती देणारा ठरला.



पंडित दीनदयाळ पतसंस्था व पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय फेडरेशन चषक कॉर्फबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करत विजेतेपद मिळवून देणाऱ्या दिशान किशोर गांधी यांचा सत्कार करण्यात आला.

दिशान गांधी यांचे कॉर्फबॉल आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील यश भूषणावह बाब : वसंत लोढा

नगर – देशातील पहिल्याच केपीएल मधील दिल्ली धुरंधर संघाच्या विजेतेपदात सिंहाचा वाटा उचलल्यानंतर लगेचच झालेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशन चषक कॉर्फबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करत विजेतेपद मिळवून देत दिशान गांधी यांनी कॉर्फबॉल खेळात आंतरराष्ट्रीय पातळीवर देदीप्यमान यश मिळवले आहे.त्यामुळे दिशान हे अहिल्यानगरचे भूषण ठरले आहेत. दिशान यांची आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील कामगिरी अहिल्यानगरसाठी भूषणवाह बाब आहे, असे प्रतिपादन पंडित दीनदयाळ परिवाराचे संस्थापक वसंत लोढा यांनी केले.

पंडित दीनदयाळ पतसंस्था व पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय फेडरेशन चषक कॉर्फबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करत विजेतेपद मिळवून देणाऱ्या दिशान किशोर गांधी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे चेअरमन वसंत लोढा, पंडित दीनदयाळ परिवाराचे अध्यक्ष धनंजय तागडे, सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, मिलिंद कोलते, किशोर गांधी, पतसंस्थेचे संचालक अनंत होशिंग, व्यवस्थापक निलेश लाटे, सहव्यवस्थापक सुखदेव दरेकर, उमेश मेरगु, गणेश जंगम, अजय आडेप आदी उपस्थित होते.

याप्रसंगी गोकुळ काळे यांनी भाषण केले, तर किशोर गांधी यांनी दिशानच्या खेळातील वाटचालीची माहिती दिली. अनंत होशिंग यांनी आभार मानले.

मनोज काशीद यांना राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार



नगर – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खोसपुरी येथील उपाध्यापक मनोज मच्छिंद्र काशीद यांना महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या माध्यमातून जाहीर झालेला राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, आनंददायी व कृतीशील शिक्षण मिळावे, या उद्देशाने मनोज काशीद सर सातत्याने विविध नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबवत आहेत. अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी वाचन चळवळ, विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता रुजविण्यासाठी सोनू–मोनू बचत बँक, विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी स्टुण्डट ऑफद डे, शालेय परसबाग, विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित उपक्रम अशा विविध माध्यमांतून त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान दिले आहे.

विद्यार्थीकेंद्रित अध्यापन, समृद्ध ग्रंथालय, अनुभवाधारित शिक्षण आणि लोकसहभागातून शाळेची गुणवत्ता वाढविण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत. त्यांच्या या सातत्यपूर्ण, कल्पक आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. यापूर्वीही त्यांना जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्याकडून जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

या बद्दल केंद्रप्रमुख नितीन दळवी, शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा मुरकुटे, शिक्षक बाळासाहेब कदम, भीमराज आव्हाड, संजय जाधव, उषा कडूस, पद्मिनी चौधरे आणि रुबीना तडवी यांनी काशीद यांचे अभिनंदन केले.

मुंबईच्या धर्तीवर अहिल्यानगरमध्ये काँक्रीट रस्त्यांचे जाळे निर्माण केले

आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; प्रभाग क्रमांक १३ मधील ॲडव्हेंटिस चर्च ते हेमराज बोरा केटरर्स रस्त्याच्या कामाचा शुभारंभ



प्रभाग क्रमांक १३ मध्ये आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते ॲडव्हेंटिस चर्च ते हेमराज बोरा केटरर्स रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी नगरसेवक अविनाश घुले, सुरेश बनसोडे, विपुल शेटीया, गोरख पडोळे, किरण व्होरा, डॉ. अतुल खालकर, डॉ. पराग कदम, सुनील शिंदे, प्रसन्ना शिंदे, हेमंत दिवटे, तरुण कराचीवाला, अतुल शिंदे आदी उपस्थित होते. (छायाचित्र – लहू दळवी)

नगर – अहिल्यानगर शहराचा सर्वांगीण आणि नियोजनबद्ध विकास करण्यासाठी विविध भागांमध्ये पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्यात येत आहेत. शहराचा विस्तार वेगाने होत असून, भविष्यातील गरजा लक्षात घेऊन विकासकामांचे नियोजन करणे आवश्यक आहे. मुंबईच्या धर्तीवर अहिल्यानगर शहरात काँक्रीट रस्त्यांचे जाळे निर्माण करण्याचा मानस आहे, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

शहरातील वाढती लोकसंख्या, वाहतुकीचा वाढता ताण आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांची गरज लक्षात घेऊन अहिल्यानगर शहरात पायाभूत सुविधांच्या विकासाला गती दिली जात आहे. याच अनुषंगाने प्रभाग क्रमांक १३ मधील ॲडव्हेंटिस चर्च ते हेमराज बोरा केटरर्सपर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाचा शुभारंभ आ. जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी नगरसेवक अविनाश घुले, सुरेश बनसोडे, विपुल शेटीया, गोरख पडोळे, किरण व्होरा, डॉ. अतुल खालकर, डॉ. पराग कदम, सुनील शिंदे, प्रसन्ना शिंदे, हेमंत दिवटे, तरुण कराचीवाला, अतुल शिंदे, विक्रम कराचीवाला, भाना शिंदे, विश्वजीत बोरा, संगीता भंडारी, सरोजनी पोखरणा, नूतन कर्नावट, सतीश मिसाळ, अविनाश कराचीवाला, पास्टर सुधीर भोसले आदींसह परिसरातील नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

दळणवळण अधिक सुलभ आणि सुरक्षित

आ. जगताप म्हणाले, नगरसेवक अविनाश घुले, सुरेश बनसोडे, अनिता शेटिया, सुजाता पडोळे यांच्या प्रयत्नातून हे काम मार्गी लागले आहे. या रस्त्याच्या काँक्रीटीकरणामुळे परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांपासूनची रस्त्याची समस्या दूर होण्यास मदत होणार असून, दळणवळण अधिक सुलभ आणि सुरक्षित होणार आहे. प्रभागातील रस्त्यांचा दर्जा सुधारण्याबरोबरच परिसराच्या एकूण विकासाच्या दृष्टीने हे काम महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

नागरिकांना चांगल्या दर्जाचा प्रवास अनुभवता येईल

काँक्रीट रस्त्यांमुळे रस्त्यांची टिकाऊ क्षमता वाढण्यासह नागरिकांना चांगल्या दर्जाचा प्रवास अनुभवता येईल. शहरातील प्रत्येक भागाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. अहिल्यानगर शहर हे एक विकसित आणि आधुनिक शहर म्हणून ओळखले जावे, यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता आहे. नगरसेवकांच्या सहकार्याने शहरातील विकासकामांना गती मिळत असून, नागरिकांना आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जात असल्याचे आ. जगताप यांनी सांगितले.

नागरिकांना दर्जेदार आणि कायमस्वरूपी मूलभूत सुविधा

यावेळी नगरसेवक अविनाश घुले म्हणाले की, प्रभाग क्रमांक १३ मधील नागरिकांना दर्जेदार आणि कायमस्वरूपी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे आपले प्रमुख उद्दिष्ट आहे. प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच अन्य नागरी सुविधांबाबत नागरिकांकडून सातत्याने मांडण्यात येणाऱ्या प्रश्नांचा पाठपुरावा केला जात आहे. ॲडव्हेंटिस चर्च ते हेमराज बोरा केटरर्स या रस्त्याची आवश्यकता लक्षात घेऊन या कामासाठी प्रयत्न करण्यात आले. नागरिकांना दररोज ये–जा करताना अडचणींचा सामना करावा लागू नये, वाहतुकीचा प्रश्न सुटावा आणि परिसरातील दळणवळण अधिक चांगले व्हावे, या उद्देशाने या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येत आहे. केवळ रस्त्यांची कामे करणे एवढाच मर्यादित उद्देश नसून, प्रभागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधांचा विकास करण्याचा आपला प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

टप्प्याटप्प्याने विविध कामे पूर्ण करण्याचे नियोजन

नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले की, लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरविणे ही आपली जबाबदारी आहे. नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रशासन आणि संबंधित यंत्रणांकडे नियमित पाठपुरावा केला जात आहे. प्रभागातील कोणताही भाग विकासापासून वंचित राहू नये, यासाठी टप्प्याटप्प्याने विविध कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे. विकासकामे ही केवळ आश्वासनांपुरती मर्यादित न राहता प्रत्यक्षात नागरिकांना त्याचा लाभ मिळाला पाहिजे, या भूमिकेतून काम सुरू आहे. आगामी काळातही प्रभागातील रस्ते आणि इतर मूलभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य देऊन प्रभागाचा कायापालट करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.





धनयत्रोदशीच्या मुर्हूतावर सावेडी येथील चंदूकाका ज्वेलर्स येथील चांदी विभागात चांदी खरेदी करण्यासाठी ग्राहकांनी मोठी गर्दी केली होती.

गृहिणी

आरोग्य

हात धुणे एक सामाजिक जबाबदारी

हात धुणे ही क्रिया वरवर पाहता अत्यंत सामान्य आणि क्षुल्लक वाटते परंतु मानवी आरोग्याच्या दृष्टीने विचार केला तर तीच क्रिया जीवन आणि मरण यातील अंतर ठरवणारी इतकी महत्त्वाची ठरते. आपल्या हाताची रचना अशी आहे की आपण दिवसाच्या चोवीस तासांत हजारो वेळा वेगवेगळ्या पृष्ठभागांना स्पर्श करत असतो, सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत दाराची कडी, बसचा दांडा, पैसे, भाजी मंडईतील भाज्या, मोबाईल फोन, लॅपटॉप, शाळेचे बाक, कार्यालयातील फाईल्स या सगळ्यावर कोट्यवधी सूक्ष्म जंतू, विषाणू आणि जीवाणू असतात जे उघड्या डोळ्यांनी कधीच दिसत नाहीत. आपल्याला हात स्वच्छ दिसले तरी त्यावर चिकटलेले हे अदृश्य शत्रू आपल्या शरीरात प्रवेश करण्याची संधी शोधत असतात आणि ती संधी आपणच त्यांना देतो जेव्हा आपण न धुता जेवण करतो, लहान मुलांना भरवतो, पाणी पितो किंवा सहजपणे तोंडाला, नाकाला आणि डोळ्यांना हात लावतो. वैद्यकीय शास्त्रानुसार मानव दिवसातून सरासरी शेकडो वेळा नकळतपणे चेहऱ्याला हात लावतो आणि यातूनच सर्दी, फ्लू, विषाणूजन्य ताप, घशाचे खवखवणे, कावीळ, टायफॉईड, कॉलरा आणि जुलाब सारखे पोटाचे गंभीर आजार पसरतात. जागतिक आरोग्य संघटनेने देखील वारंवार सांगितले आहे की केवळ साबणाने योग्य पद्धतीने वीस ते तीस सेकंद हात धुतल्यास जवळपास ऐंशी टक्के संसर्गजन्य आजारांना आळा बसू शकतो, जे कोणत्याही महागड्या लसीपेक्षा किंवा औषधापेक्षा अधिक प्रभावी आणि स्वस्त आहे. हात धुण्याची योग्य वेळ देखील लक्षात घेणे गरजेचे आहे जसे की शौचाला जाऊन आल्यावर, जेवण बनवण्यापूर्वी आणि जेवण्यापूर्वी, बाहेरून प्रवास करून घरी आल्यावर, शाळेतून किंवा कामावरून परतल्यावर, प्राण्यांना हात लावल्यावर, कचरा टाकल्यावर, शिंकल्यानंतर आणि खोकल्यानंतर ही वेळा चुकवू नयेत. केवळ पाण्याने हात धुणे पुरेसे नसते तर साबणाचा वापर करणे गरजेचे आहे कारण साबणातील क्षार जंतूंच्या बाह्य आवरणाला तोडून त्यांना नष्ट करतात आणि पाण्याबरोबर वाहून नेतात. ही सवय लहान मुलांमध्ये लहानपणापासूनच रुजवली तर त्यांची प्रतिकारशक्ती वाढते, ते अधिक निरोगी आयुष्य जगू शकतात. स्वच्छ हात हे केवळ स्वतःपुरते मर्यादित नाहीत तर ती एक सामाजिक जबाबदारी आहे कारण एका व्यक्तीच्या अस्वच्छ हातातून संपूर्ण कुटुंबाला, वर्गाला किंवा कार्यालयाला संसर्ग होऊ शकतो, विशेषतः स्वयंपाक करणाऱ्या व्यक्तीने, डॉक्टरांनी, परिचारिकांनी आणि अन्न विक्रेत्यांनी हात स्वच्छ ठेवणे हे अत्यंत आवश्यक आहे.

पाककला

तिरामिसू पेढा

साहित्य : मिल्क पावडर १ वाटी, कंडेन्स्ड मिल्क १/२ वाटी, ताजे क्रीम २ चमचे, क्रीम चीज किंवा मस्करपोन चीज २ चमचे, इन्स्टंट कॉफी पावडर १ चमचा, कोमट पाणी १ चमचा, कोको पावडर २ चमचे, बटर १ चमचा, वेलची पावडर १/४ चमचा

कृती : एका वाटीत कोमट पाण्यात कॉफी पावडर विरघळून घ्या. कढईत बटर गरम करून त्यात मिल्क पावडर, कंडेन्स्ड मिल्क आणि ताजे क्रीम घालून मंद आचेवर एकजीव करा. मिश्रण घट्ट होत आल्यावर त्यात विरघळलेली कॉफी, क्रीम चीज आणि वेलची पावडर घालून सतत ढवळत राहा. मिश्रण कढई सोडू लागले की गॅस बंद करून थंड होऊ द्या. थंड झाल्यावर हाताला थोडे बटर लावून लहान लहान पेढे वळून घ्या. तयार पेढ्यांवर चाळणीने कोको पावडर भुरभुरा. फ्रीजमध्ये अर्धा तास ठेवून थंडगार सर्व्ह करा.

वास्तू

मुलांच्या अभ्यासाची खोली

* मुलांच्या अभ्यासाची खोली ईशान्येला असावी. अभ्यास करताना तोंड पूर्वेला किंवा उत्तरेला असल्यास अभ्यासात लक्ष लागते आणि स्मरणशक्ती वाढते.

* पैशाची तिजोरी किंवा कपाट दक्षिण भिंतीला लागून ठेवावे आणि त्याचे तोंड उत्तरेकडे उघडेल असे ठेवावे. मुख्य दरवाजासमोर कचरा पेटी ठेवू नये.

सौंदर्य

मसूर डाळ रात्रभर दुधात भिजत घाला आणि सकाळी वाटून त्याची पेस्ट करा. यात थोडे मध टाका. हा पॅक आठवड्यातून दोन वेळा लावल्याने सुरकुत्या कमी होतात.

सल्ला

* मिक्सरच्या पात्याला धार येण्यासाठी मीठ वाटा.

* फ्रीजचा वास जाण्यासाठी लिंबाची फोड ठेवा. **संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर २०२६

विनायक चतुर्थी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, मूळ १७।१७, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.

राशिभविष्य

मेष : कामात यश मिळेल आणि उत्साह वाढेल.

वृषभ : खर्च वाढेल पण महत्वाचे काम पूर्ण होईल. कुटुंबाची साथ मिळेल.

मिथुन : नवीन ओळखीचा फायदा भविष्यात होईल.

कर्क : मन थोडे अस्वस्थ राहील. संध्याकाळी चांगली बातमी मिळेल.

सिंह : मान सन्मान वाढेल. व्यवसायात मोठा लाभ होईल.

कन्या : दिवस धावपळीचा राहील. मुलांकडून आनंद मिळेल.

तुळ : अचानक धनलाभ होण्याची शक्यता आहे.

वृश्चिक : रागावर ताबा ठेवाल. वादापासून दूर राहाल.


धनु : भाग्याची साथ मिळेल. रखडलेली कामे पूर्ण होतील.

मकर : मेहनतीचे फळ मिळेल. आरोग्याची काळजी घ्याल.

कुंभ : नवीन कल्पना सुचतील. प्रवास लाभदायक ठरेल.

मीन : भावनांवर नियंत्रण ठेवाल. मागील वसुली होईल.

फिल्मीचक्कर क्र. १२६२ सौ. शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) 'का हेच प्रेम आहे?' या अर्थाचा हिंदी चित्रपट ५) बीस ++ बाद (चित्रपटाचे नाव) ७) एक +++ मै करूं एक सवाल तुम करो (गाणे) ८) राजकुमार, मीनाकुमारी यांचा एक सुंदर गाण्यांनी सजलेला एक चित्रपट १०) ऐश्वर्या रॉय, अक्षय खन्ना यांचा एक चित्रपट ११) धर्मेंद्र, रेखा, १४) ++ चालली सासरला (चित्रपटाचे नाव) १६) ++ मेरे सपने (चित्रपटाचे नाव) १७) +++ समझा करो (चित्रपटाचे नाव)

उभे शब्द :- २) ++ रांझा चित्रपटाचे नाव ३) धर्मेंद्र, लीना चंदावरकर, जगदीप यांचा एक चित्रपट ४) मै ++ + ++ का शायर हूं (गाणे) ६) नायक संजय दत्तचा पहिला चित्रपट ८) ++ +++ + बडा नाम करेगा (गाणे) ९) भारत-चीन युद्धावर आधारित धर्मेंद्र, प्रिया राजवंश यांचा चित्रपट १०) ++ ओ ताकी ताकी ताकी रे (गाणे) १२) येऽऽ ++ गगन के तले धरती का प्यार फले (चित्रपटाचे नाव) १३) अभिनेत्री काजोलची अभिनेत्री आई १५) ++ तेरी गंगा मैली (चित्रपटाचे नाव)

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

सुविचार : आयुष्यात कितीही मोठे व्हा, पण ज्यांनी तुम्हाला मोठं केलं त्यांना कधीच विसरू नका.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

साबणाच्या बुडबुड्याला रंग कसे येतात?

साबणाच्या बुडबुड्याला पाहिल्यावर प्रत्येकाच्या मनात एक प्रश्न येतो की पारदर्शक पाणी आणि साबण यापासून बनलेला हा बुडबुडा इंद्रधनुष्यासारखा सात रंगात कसा काय चमकतो, याचे उत्तर निसर्गाच्या एका अतिशय रंजक आणि सुंदर भौतिकशास्त्रात लपलेले आहे. खरं तर साबणाच्या बुडबुड्याला स्वतःचा असा एकही रंग नसतो, तो पूर्णपणे पारदर्शक असतो परंतु आपल्याला जे रंग दिसतात ते प्रकाशाच्या खेळामुळे तयार होतात. आपल्याला दिसणारा सूर्याचा किंवा घरातील बल्बचा पांढरा प्रकाश हा वरून साधा दिसत असला तरी तो प्रत्यक्षात तांबडा, नारिंगी, पिवळा, हिरवा, निळा, पारवा आणि जांभळा या सात रंगांच्या प्रकाश लहरींचे मिश्रण असते.

जेव्हा हा पांढरा प्रकाश साबणाच्या बुडबुड्यावर पडतो तेव्हा त्या बुडबुड्याची रचना लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते, बुडबुड्याची भिंत ही पाण्याचा एक अत्यंत पातळ पडदा असते आणि या पडद्याच्या दोन्ही बाजूंना साबणाच्या रेणूंचा थर असतो जो पाण्याला ताणून धरतो आणि बुडबुड्याला गोल आकार देतो. जेव्हा प्रकाश या पातळ पडद्यावर येतो तेव्हा त्याचा काही भाग पडद्याच्या वरच्या पृष्ठभागावरून थेट परत फिरतो आणि काही भाग पडद्याच्या आत शिरून खालच्या पृष्ठभागावरून परावर्तित होऊन बाहेर येतो, अशा प्रकारे एकाच प्रकाशाचे दोन भाग तयार होतात आणि ते एकमेकांना येऊन मिळतात.

या दोन प्रकाश लहरी जेव्हा एकमेकांना मिळतात तेव्हा त्यांच्यात व्यतिकरण नावाची क्रिया घडते, म्हणजे काही ठिकाणी दोन लहरींचे शिखर एकमेकांवर येऊन तो विशिष्ट रंग अधिकच तेजस्वी होतो तर काही ठिकाणी एका लहरीचे शिखर आणि दुसऱ्या लहरीचा तळ एकमेकांना रद्द करून तो रंग नाहीसा होतो. बुडबुड्याची गंमत अशी आहे की त्याचा थर सर्व ठिकाणी सारख्या जाडीचा नसतो, गुरुत्वाकर्षणामुळे पाणी खाली ओघळते त्यामुळे बुडबुड्याचा वरचा भाग अत्यंत पातळ होतो आणि खालचा भाग तुलनेने जाड राहतो आणि जाडीच्या या सतत बदलामुळे वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या रंगाच्या लहरी बळकट होतात. त्यामुळे आपल्याला बुडबुड्यावर कधी हिरवा, कधी निळा, कधी जांभळा रंग हलताना आणि नाचताना दिसतो. बुडबुडा जसजसा जुना होतो तसतसा त्याचा थर अधिकाधिक पातळ होत जातो आणि शेवटी तो प्रकाशाच्या तरंगलांबीपेक्षाही पातळ झाल्यावर प्रकाशाचे व्यतिकरण होणे बंद होते आणि तो फुटण्यापूर्वी काळसर दिसू लागतो. याच तत्त्वावर पाण्यावर पडलेल्या तेलाच्या थेंबावर आणि सीडीच्या मागच्या बाजूवर देखील इंद्रधनुषी रंग दिसतात.

प्रमाणिकपणाचे फळ

एका मोठ्या शहरात एक प्रसिद्ध मिठाईवाला होता. त्याच्या दुकानात एक तरुण मुलगा नोकरीला होता, त्याचे नाव श्याम. श्याम खूप गरीब होता पण अतिशय प्रामाणिक होता. एकदा दुकानात खूप गर्दी होती. एका श्रीमंत माणसाने एक किलो मिठाई घेतली आणि घाईत श्यामला पाच हजार रुपयांची नोट दिली.

गर्दीमुळे त्या माणसाला वाटले आपण पाचशे रुपयेच दिले आणि तो सुटे पैसे न घेताच निघून गेला. दुकान बंद झाल्यावर हिशोब करताना श्यामला कळले की गल्ल्यात साडेचार हजार रुपये जास्त आहेत. त्याने लगेच मालकाला सांगितले.

मालक मनात म्हणाला, हा मुलगा खोटे बोलत आहे का हे पाहू, म्हणून तो म्हणाला, जास्त आले असतील तर ठेव तुझ्याकडेच, कोणाला कळणार आहे.

पण श्याम म्हणाला,

नाही मालक, हा पैसा माझा नाही. ज्याचा आहे त्याला परत दिला पाहिजे. दुसऱ्या दिवशी सकाळी श्यामने त्या श्रीमंत माणसाला शोधून काढले आणि त्याचे साडेचार हजार रुपये परत केले. तो माणूस खूप मोठा व्यापारी होता. श्यामच्या प्रामाणिकपणावर तो खूप खुश झाला.

त्याने श्यामला विचारले,

तू इतका गरीब असूनही पैसे परत का केलेस? श्याम म्हणाला,

गरीब असलो तरी आईने शिकवले आहे, दुसऱ्याच्या पैशाला हात लावू नये. त्या व्यापाऱ्याने त्या मिठाईवाल्याच्या मालकाला सांगून श्यामला आपल्या मोठ्या कंपनीत चांगल्या पगारावर नोकरी दिली. काही वर्षांत श्याम आपल्या प्रामाणिकपणा मुळेच त्या कंपनीचा मॅनेजर झाला.

तात्पर्य: प्रामाणिकपणा कधीच वाया जात नाही, त्याचे फळ नेहमी गोडच असते.

आत्मशक्ति



अध्यात्मिक शक्ती

तेव्हा अंतर्मंडळाची चर्चा करताना आम्ही लक्षात घेतले पाहिजे की संत महापुरुष, पैगंबर वा आध्यात्मिक पुरुषांनी त्यांनी अभिप्रेत असलेल्या गोष्टी सांगितल्या आहेत. तेवढेच त्यांना आवश्यक वाटले व तेवढेच त्यांना फक्त आपल्या शिष्यांना सांगावेसे वाटले. जर काहीही ह्याबाबत काहीच लिहून ठेवले नाही तर असे वाटू नये की अंतर्मंडळे नाहीतच. काही संतांना वाटले की, आत्मिक मंडळाची माहिती सर्वांसाठी नाही आणि असे समजून त्यांनी ती गुप्त ठेवली. ते ही माहिती आपल्या शिष्यांना ते फक्त तोंडी सांगत. प्राचीन जुन्या आध्यात्मिक संस्था ह्यांचे चांगले उदाहरण आहे. आपल्या शिक्षणाची ही रचना सांगते.

परंतु ह्या अध्यात्म विद्यालयाच्या प्लॅटो आणि सॉक्रेटिस सारख्यांनी मात्र ह्या रचनेची ओळख आपल्या ग्रंथात दिली आहे काही संत उदा. कबीरजी आणि स्वामी शिवदयाळजी महाराज सारख्यांनी ह्याबाबत विस्तृत माहिती आपल्यासाठी ठेवली आहे. त्यांनीसुद्धा काही रचना आपल्या शिष्यांना सांगितले परंतु सर्वसाधारणासाठी आंतरिक ज्ञानाच्या बाबतीत बऱ्याच काही सांगितले.

हा योगाच्या स्रोतांचा समीक्ष झालेल्या वर्णनावरून आपल्याला एवढे कळते की सर्वात खालचे मठ म्हणजे भौतिक किंवा पिंड मंडळ आहे. त्यानंतर वीर्य मंडळे येतात सर्वात मठ म्हणजे चताकुंड. येथे हिमसामी मंडळे आहे.'मैं पिता के घर में बहुत से रहने के स्थान हैं।' (जुहना १४:२) ध्यान साधनेतून आम्ही देहभावोवर वर येतो व अस्तित्व मंडळाकडे येतो. त्या प्रवासाचे वर्णन खाली दिले आहे.बऱ्याच आम्ही आमचे ध्यान दुसरे गुरु वा शिवनेत्रावर एकाग्र करतो तेव्हा आमची प्रज्ञा आणि शब्द-ध्वनीच्या लहरींना पकडते. आमचा आत्मा ह्या तरंगात सामील होतो आणि शरीर व मन ह्यांचा वर झेप लागतो. जसजसे आम्ही आंतरिक ज्योतिर्नय वाणी ऐकू लागतो, चंद्र मंडळ झीना वर करून सूक्ष्म मंडळाच्या द्वारावर पोहोचतो. सूक्ष्म मंडळाला आपला स्थूल शरीर सोडणे व अधिक हलकेच व सूक्ष्म अशा शरीराने आपला प्रवास करणे.

स्थूल मंडळापेक्षा सूक्ष्म मंडळ घन (दाट) नाही. परंतु तोताय काही बाबतीत सारखे आहे. सूक्ष्म मंडळात गुण अधिक सूक्ष्मतर व उत्तम असतात. येथील ज्योतीर्मय स्थूल मंडळाच्या अधिक प्रखर असते. येथे मधुर शब्दांचे आत्माना ऐकू येतात. हे आत्माचे विशेष प्रकारचे असतात. हृदयाचे मंडळात प्रवास करताना आत्मा सर्व मोहित होतो. परंतू श्रेष्ठ अडकून पडू नये. असा सल्ला येथे करणारी असंख्य आकर्षके व लोभसवडे यंत्र आहेत. असल्या भूमी करणे येथे सहजशक्य होते. (क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

नाती घट्ट विणू या

पण जेव्हा त्याच्या क्षमतेचा तुलना करतात तेव्हा दोन प्रकारचे नुकसान होतं, पहिलं म्हणजे तो मुलगा स्वतःच्या क्षमतांचा वापर करत नाही किंवा त्याच्या क्षमता ओलांडूनच वापराचा प्रयत्न करतात. सर्वच महत्त्वाचं म्हणजे, स्वतःची क्षमता ओलांडूनच वापराचा प्रयत्न करतात. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, स्वतःच सर्वोत्तम देण्यापेक्षाही इतरांपेक्षा चांगली कामगिरी करणे – हाच संस्कार त्याच्यात रुजवला जातो. म्हणून फक्त असमाधान हाती येते.

सुरेश ओबेरॉय : पण जर आपण इतरांपेक्षा खरचच ठरलो नाही तर आपण आयुष्यात नापास होऊ.

शिवानीदीदी : त्यावेळी आपण स्वतःच्या क्षमतेवर लक्ष केंद्रित नाही का करू शकत ? आपण इतरांच्या कामगिरीवरून प्रेरणा घेऊन त्याचा उपयोग आपली कामगिरी सुधारण्यासाठी करू शकतो. पण इतरांना मागे टाकण्यासाठीच प्रयत्न केले गेले तर याचा शेवट काय होईल? जर आपण एकाला टाकलं तर पुढे गेल्यावर अजूनही कोणीतरी असेल. आणि मग आपल्याला त्याला मागे टाकावंसं वाटेल. त्यानंतर आणखी कोणीतरी पुढे असेल... आणि हे असं चालूच राहील. अशाने आपण कधीच आनंदी आणि समाधानी होणार नाही. खेळामध्ये किंवा प्रत्यक्ष आयुष्यातील स्पर्धेमध्ये, जिथे आपण जाणीवपूर्वक स्पर्धा करत असतो, तिथे आपल्याला फक्त स्वतःच्या कामगिरीवर लक्ष केंद्रित करायला सांगितलं जातं. जर आपण इकडेतिकडे बघत बसलो तर काय होईल?

सुरेश ओबेरॉय : एकाग्रता नसल्याने आपला वेग कमी होईल.

शिवानीदीदी : त्याबरोबर भीती आणि काळजी या भावना निर्माण होतील आणि आपली कार्यक्षम ता घटेल. याऐवजी जर आपण आपल्या खेळावर मन एकाग्र केलं तर आपण आपल्या क्षमताप्रमाणे सर्वोत्तम कामगिरी करू.

सुरेश ओबेरॉय : स्पर्धेमध्ये एका सेकंदासाठी जरी आपलं दुर्लक्ष झालं तरी आपल्यासाठी सगळं संपलेलं असतं. शिवानीदीदी : एक सेकंदाच्या दुर्लक्षामुळे आपण स्पर्धा हरू शकतो तर कल्पना करा की, आयुष्यात आपल्या पुढे कोण जातंय हेच आपण इकडेतिकडे बघत राहिलो तर स्वतःबरोबर काय करू? (क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : पाणी आणि हवा यांत काय फरक आहे?

बंडू : सर, खूप मोठा फरक आहे! पाण्यात आपण पोहू शकतो, पण हवेत आपण उडू शकत नाही... आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, पाण्यात बुडाल्यावर हवा आठवते, पण हवेत असताना पाणी आठवत नाही!

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना कोणत्या वर्षी झाली?

– १९४५

– अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

आयुर्वेदिक गर्भसंस्कार गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरणनमस्कारामध्ये गर्भवती व बाळ या दोघांच्या आरोग्यासाठी खालील तपासण्या करणे महत्त्वाचे असते.

१) हिमोग्लोबिन : हिमोग्लोबिन तपासणीमुळे गर्भवती स्त्रीच्या शरीरातील रक्ताचे प्रमाण किती आहे, हे समजते. गर्भवती स्त्रीच्या शरीरात प्रमाण कमी असल्यास त्याचा बाळाच्या शारीरिक व मानसिक वाढीवर परिणाम होतो. कारण रक्ताद्वारे गर्भाला पोषण व ऑक्सिजन मिळते. प्रसूतीच्या वेळेला गर्भवती स्त्रीच्या अंगात रक्ताचे प्रमाण कमी असल्यास तिला जीवावर धोका होऊ शकतो.

अशी वेळ येऊ नये म्हणून गर्भवतीने आहार योजना करावी. गर्भवतीची आयर्नची लेव्हल कमी असेल तर आयर्नची इंजेक्शन, टॅबलेट, सिरप घ्यावेत. नैसर्गिकरित्या आयर्न वाढवण्यासाठी हिरव्या पालेभाज्या, बीट, गूळ, शेंगदाणे, खजूर यांचा समावेश करावा. ही तपासणी दर एक महिन्याला व शेवटच्या महिन्यात दोनदा करावी. टोमॅटोचा, लसूण, तेज, पालक, मेथीचा समावेश करावा. ही तपासणी दर एकदा रक्त तपासणी केली जाते.

२) रक्तगट तपासणी :

प्रसूतीच्या वेळेला रक्तस्रावामध्ये रक्ताचे प्रमाण कमी असल्यास रक्ताची आवश्यकता असते. अशा वेळी रक्त देणे गरजेचे असते. रक्तगट माहित असल्यास रक्त मिळणे सोपे होते. रक्तगटामध्ये आईच्या रक्ताचा गट कोणता आहे, आर.एच. पॉझिटिव्ह असणे व निगेटिव्ह असणे आवश्यक असते. तसेच गर्भातील बाळाचा कॉम्बो टेस्ट होऊन बोध निर्माण होईल. बाळाच्या रक्तगटावरून त्याप्रमाणे योग्य वेळेस योग्य ती उपाययोजना करता येते व त्यामुळे संभाव्य धोके टाळता येतात.

३) एच.आय.व्ही. (एड्स) तपासणी :

एच. आय. व्ही. ची तपासणी आधुनिक काळात फार महत्त्वाची झाली आहे. त्यामुळे गर्भवती व तिच्या होणाऱ्या बाळाला याची लागण आहे की नाही हे समजते. जर मातेला एच.आय.व्ही. ची लागण असेल, तर बाळाला ती लागण होऊ नये, म्हणून डॉक्टर काही प्रतिबंधात्मक उपचार पद्धती सुरू करतात. **(क्रमशः)**

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

धम्माल मनोरंजन

सुविचार



त्याग आणि सेवा हे प्रत्येक राष्ट्राचे आदर्श असतात.

दिनविशेष १३ नोव्हेंबर

१७८०: शिख साम्राज्याचे संस्थापक महाराजा रणजितसिंग यांचा जन्म. (मृत्यू: २७ जून १८३९)१८५०: इंग्लिश लेखक व कवी आर. एल. स्टीव्हनसन यांचा जन्म. (मृत्यू: ३ डिसेंबर १८९४)१८५५: आद्य मराठी नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांचा जन्म. (मृत्यू: १४ जून १९१६)१८७३: कायदेपंडित, पं. मोतीलाल नेहरूंचे सहकारी, संसदपटू आणि पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू बॅ. मुकुंद रामराव जयकर यांचा जन्म. (मृत्यू: १० मार्च १९५९)

१८९८: पाकिस्तानचे पहिले राष्ट्रपती इस्कंदर मिर्झा यांचा जन्म. (मृत्यू: १३ नोव्हेंबर १९६९)

१९१७: महाराष्ट्राचे ५ वे व ९ वे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचा जन्म. (मृत्यू: १ मार्च १९८९)१९१७: हिंदी कवी, लेखक, टीकाकार व संपादक गजानन माधव मुक्तिबोध यांचा जन्म. (मृत्यू: ११ सप्टेंबर १९६४)

१९५४: सन मायक्रोसिस्टिम्स चे सहसंस्थापक स्कॉट मॅकनीली यांचा जन्म.१९६७: अभिनेत्री जूही चावला यांचा जन्म.

१८६५: अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बनणारे पहिले अमेरिकन ज्यू नागरिक लुई ब्रँडीस यांचा जन्म (मृत्यू : ५ ऑक्टोबर १९४१)

१७४०: प्राचीन मराठी कवी कृष्णदयार्णव यांचे निधन.

१९५६: शीख धर्माचा समग्र इतिहास लिहिणारे आधुनिक बंगाली इतिहासकार इंदुभूषण बॅनर्जी यांचे निधन. (जन्म: १ नोव्हेंबर १८९३ मेखलीगंज, कुच बिहार, पश्चिम बंगाल) २००१: ज्येष्ठ लेखिका सरोजिनी मधुसूदन शारंगपाणी यांचे निधन. (जन्म: १५ ऑगस्ट १९१७)२००२: नेपाळी लेखक, राजकारणी व मानवाधिकार कार्यकर्ते ऋषिकेश साहा यांचे निधन.२००४: कॅनडा देशातील पहिल्या महिला कॅबिनेट मंत्री एलेन फेअरक्लॉ यांचे निधन (जन्म: २८ जानेवारी १९०५)


१९६९: पाकिस्तानचे पहिले राष्ट्रपती इस्कंदर मिर्झा यांचे निधन (जन्म: १३ नोव्हेंबर १८९८)

टिप्स

प्रेशर कुकर

कुकरचे गास्केट वेळोवेळी बदला. त्याची शिटी व त्याचा पाईप साफ करतेवेळी सेफ्टी पिनचा वापर करा.ती नळी स्वच्छ असणं गरजेचं असतं. त्यात बऱ्याच गोष्टी साचून राहिल्यास कुकर फुटू शकतो. अन्न शिजवताना किंवा एखादी गोष्ट उकडताना कुकर जळल्यास एक दिवस त्यात पाणी भरून ठेवा नंतर खाण्याच्या सोड्याने तो घासा म्हणजे स्वच्छ होईल. कुकरमध्ये कुकरच्याच भांड्यात आपण काही शिजवत असाल तर कुकरचे झाकण बंद करण्याआधी त्यात लिंबाच्या फोडी टाका. सेफ्टी व्हॉल्वमध्ये तुम्हाला गडबड वाटत असेल तर ताबडतोब तो बदलून घ्या. दुर्लक्ष केल्यास धोका तुम्हालाच आहे.

महाशब्दकोडे



आडवे संकेत

१) चोरी, घोटाळा
६) शिवम सुंदरम
८) एक दुचाकी गाडी
९) वारांगणा
१०) मारणारा
११) सात व पाच
१३) सजविण्याचे साहित्य
१४) भट (शिवाजीचा) राज्यभिषेक कर्ता
१६) आईचा भाऊ
१८) अस्पष्ट दिसणारे
२०) आई, जननी
२२) एक मराठी चित्रपट
२४) एक गोड पदार्थ
२६) कुंभाराची भट्टी
२७) ज्याला गरज आहे असा
२८) दंड, शासन
२९) एका मुलीचे नाव
३०) नेहमी पक्ष बदलविणारा
३२) ईश्वर, प्रभू
३३) सैन्य
३५) तर
३६) शा अ चा अक्षरबदल
३८) सैल शर्ट
४१) चपराक
४३) गव्हाची एक जात
४५) मस्ती
४६) रामाचे सासरे
४७) चरबी, वंश
४९) आंब्याची बी
५०) मितव्यय

उभे संकेत

१) लोकोत्तर, अप्रतिम
२) विरक्त राहणारा मुसलमानी साधू
३) पोळी भाजण्याचे साधन
४) अंतर, तफावत
५) सूर्य
६) धर्मेंद्रपुत्र
७) भारतातील एक तीर्थस्थळ
८) आसाममधील गेंड्यांचे अभयारण्य
१२) अवैध विरुद्ध
१५) बोभाटा
१६) एक प्रसिद्ध लावणी गायीका
१७) किल्ल्याखालची सुपीक जमीन
१८) वधुवरांच्यामध्ये धरावयाचा कापड
१९) एक आंबट फळ
२०) सर, माळ
२१) मोठी बहिण
२३) जागत राहणारा
२५) एक प्रसिद्ध नदी
२६) सहारा, मदत
३१) नापीक जमीन
३२) संपूर्ण देश फिरणे
३४) किलबिलाट
३६) पराजय, पराभव
३७) शेतकरी
३९) गाभा
४०) पेरणी, लावणी
४२) पोंग, कुबड
४४) देवाजवळील विशिष्ट प्रार्थना
४८) सत्वांश

मागील उत्तर

सं	क्षी	प्त		ज	न		अ	वां	त	र		प
धा				वा	द	ग्र	स्त		क्ष		च	ळ
न	वा	ज	खा	नी				च	क	वि	णे	
			री		क		धों				खा	न
प्रा	सं	गि	क		व	ऱ्हा	ड	घ	र		वे	ल
व	डा	र		क	डी			ट	प		लो	
र	स	का	पू	र		क	सा		टा		खं	बा
ण		व		क	म	र	प	ट्टा		सं	डा	स
	पा	णी	पु	री		प	ळा		त		चे	
कं	ठ		ला	त	ड	णे		सा	र	थी		ता
	पु	रा	वा		ब		स	व	त		वे	ळ
आ	रा	स		मे	घा		न	का	र	घं	टा	
स	वा		ह	वा	ई	सुं	द	री			ळ	



१) नायजेरियातील हिंसाचारानंतर २००२ मिस वर्ल्ड स्पर्धा कोणत्या देशात आयोजित केली?
अ)फ्रान्स ब)इंग्लंड क)अमेरिका ड)भारत

२) भारतातील पहिले आयमॅक्स ३ डी थिएटर ऑक्टोबर २००२ मध्ये कोठे सुरु झाले?
अ)ओरिसा ब)केरळ क)महाराष्ट्र ड)गुजरात

३) संयुक्त राष्ट्र संघाचे १९१ वे सदस्य राष्ट्र कोणते?
अ)जर्मन ब)स्वित्झर्लंड क)ईस्ट तिमोर ड)तुवालु

४) १५ वी आशियाई क्रीडा स्पर्धा २००६ मध्ये कोणत्या देशात आयोजित केली होती?
अ)अथेन्स ब)दोहा (कतार)
क)दक्षिण आफ्रिका ड) सोव्हीएत रशिया

५) न्या. व्ही.एम. तारकुंडे आयोग कशासाठी नेमण्यात आला होता?
अ)बँकाचे खासगीकरण ब)नर्मदा जल विवाद
क)प्रादेशिक असमतोल ड) निवडणूक सुधारणा

६) कोणत्या सुप्रसिद्ध टेनिस खेळाडूने आपल्या कारकिर्दीतील १००० वा सामना २००३ मध्ये खेळला?
अ)स्टीफन एडबर्ग ब)आंद्रे आगासी
क)बोरीस बेकर ड)पीट सॅम्प्रास

७) 'संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने' विकसित केलेले हवेतून मारा करणारे क्षेपणास्त्र कोणते?
अ)नाग ब)अस्त्र क)आकाश ड)ब्राम्होज

८) 'गुगल' या सर्व इंजिनची स्थापना कधी झाली?
अ)१९९८ ब)२००३ क)२००० ड)१९९९

९) हॅरी पॉटर या चित्रपटाच्या मालिकेत हॅरी पॉटरची मुख्य भूमिका कोणत्या बाल कलाकाराने साकारली?
अ)टिम रँडक्लिफ ब)डॅनियल रँडक्लिफ
क) टिम हॉर्शवर्थ ड) डॅनियल वर्डस्वर्थ

१०) गंगा-मेकाँग प्रकल्प काय आहे?
अ)पाईप लाईन ब)प्रचंड धरण
क)नद्या जोडण्याची योजना
ड)पर्यटन व व्यापारास चालना देण्यासाठी महामार्ग

११) भारत व रशिया या दोघांनी मिळून खालीलपैकी कोणते क्षेपणास्त्र बनवले आहे?
अ)टी-४० टँक ब) सुखोई
क)मिग विमाने ड) ब्रम्होस

१२) २००२ ची मिस वर्ल्ड (विश्वसुंदरी) कोण होती?
अ)लारा दत्ता ब)अमेलिया व्हेगा
क)बिपाशा बासू ड)अझरा अकीन

१३) २००३ मध्ये झालेल्या इराक युद्धात इराक विरोधी देश कोणते?
अ)अमेरिका- रशिया ब)अमेरिका- कॅनडा
क)अमेरिका- फ्रान्स ड) अमेरिका- ब्रिटन

१४) २००२ साली भारताची उपराष्ट्रपती म्हणून निवड झाली?
अ)पी.एम. सईद ब)भैरासिंग शेखावत
क)लालकृष्ण अडवाणी ड) यापैकी नाही


१५) मे २००३ साली कोणाची विश्वसुंदरी म्हणून निवड झाली?
अ)निकिता आनंद ब)मॅथ्यू क्राऊनटर्ज
क)अमेलिया व्हेगा ड) अझरा अकीन

१६) २००३ सालच्या महाराष्ट्र भूषण पुरस्कारासाठी महाराष्ट्र सरकारने कोणाची निवड केली?
अ)डॉ. अभय बंग व राणी बंग
ब)पंडित भीमसेन जोशी क) डॉ. जयंत नारळीकर
ड) डॉ. रघुनाथ माशेलकर


१७) २००२-०३ सालात मोठ्या प्रमाणात दुष्काळग्रस्त झालेले भारतीय राज्य कोणते होते?
अ)ओरिसा ब)राजस्थान क)कर्नाटक ड)महाराष्ट्र

१८) २००३ ची फ्रेंच टेनिस ओपन पुरुष फायनल स्पर्धा पॅरिस येथे कोणी जिंकली?
अ)जुआन फरेरो ब)मार्टिन व्हर्केक
क) कार्लीस मोया ड) यापैकी कोणी नाही

उत्तरः (१-ब), (२-ड), (३-क), (४-ब), (५-ड), (६-ब), (७-ब), (८-अ), (९-ब), (१०-ड), (११-ड), (१२-ड), (१३-ड), (१४-ब), (१५-क), (१६-अ), (१७-ब), (१८-अ),



फिल्मी शब्दकोडे



आडवे संकेत

१) सन् १९८८ में प्रविण भट्ट निर्देशित इस फिल्म में आदित्य पांचोली और अमृता सिंह थे.
५) सन् १९९२ में अशोक गायकवाड निर्देशित इस फिल्म में संजय दत्त और किमी काटकर थे.
८) कितना प्यारा वादा है इन मतवाली आखों का इस मस्तीं में.... यह गाना इस फिल्म का है.
९) जितने भी तु करले सितम हंस हंस के सहेंगे हम ये प्यार ना होगा कम सनम तेरी कसम.... इस गित के गायक.
१०) कभी खुशी कभी (फिल्म)
११) हराम (फिल्म)
१२) सन् १९७४ में विजय निर्देशित इस फिल्म में शत्रूघ्न सिन्हा और मौसमी चटर्जी थे.
१३) सन् १९७३ में अमर कुमार निर्देशित इस फिल्म में नविन निश्चल और रेखा थे.
१५) ओढणी ओढके नाचु ओढणी नाचु ओढणी ओढ के दिल परदेसी हो गया.... यह गाना इस फिल्म का है.
१७) मुझे तेरी ने आशिक बनाया सनम..(गीत)
२०) हम आपके है कौन इस फिल्म में सलमान का नाम.
२१) सन् १९८६ में भाष्कर रेड्डी निर्देशित इस फिल्म में मिथून चक्रवर्ती और रती अग्निहोत्री थे.
२२) नरम (फिल्म)
२३) प्यार किसीसे होता है (फिल्म)
२४) तेरे कितने नाम (फिल्म)
२५) सन् १९६४ में नानाभाई भट्ट निर्देशित इस फिल्म में फिरोज खान और अमिता थे.
२७) सन् १९७५ में ह्रषिकेश मुखर्जी निर्देशित इस फिल्म में अमिताभ बच्चन और जया भादुडी थे.
२८) अमान (अभिनेत्री)
२९) बिना सुहागन (फिल्म)
३०) दिल जंगली कबुतर ओय ओय ओय... यह गीत इस फिल्म का है.
३३) रोड इस फिल्म की अभिनेत्री.
३४) सन् १९९७ में डेविड धवन निर्देशित इस फिल्म में गोविंदा, अनिल कपूर और जुही चावला थे.

उभे संकेत

१) सन् १९९१ में भप्पी सोनी निर्देशित इस फिल्म में विनोद खन्ना, संजय दत्त और डिम्पल कपाडिया थे.
२) सन् १९९२ में दीपक आनंद निर्देशित इस फिल्म में सुनील शेट्टी और दिव्या भारती थे.
३) सन् १९९९ में टी.एल.वी. प्रसाद निर्देशित इस फिल्म में जैकी श्रॉफ, मिथून चक्रवर्ती और मिंक थे.
४) अकेली ना बाजार जाया करो नजर लग जाएगी.... यह गाना इस फिल्म का है.
५) बागबान इस फिल्म का एक अभिनेता.
६) सन् २००१ में खलीद मोहम्मद निर्देशित इस फिल्म में ह्रत्विक रोशन, नेहा और करिश्मा कपूर थे.
७) सन् १९९२ में एन. चंद्रा निर्देशित इस फिल्म में अनिल कपूर और मिनाक्षी शेषांद्री थे.
१०) सन् २००० में बनी इस फिल्म में सनी देओल और अमिषा पटेल थे.
१२) आने तक (फिल्म)
१४) सन् १९७६ में चंद्रकांता निर्देशित इस फिल्म में विश्वजीत और मौसमी चटर्जी थे.
१५) सनम (फिल्म)
१६) सन् १९७७ में बनी हम किसीसे कम नही इस फिल्म के निर्देशक.
१८) से अच्छा कौन है (फिल्म)
१९) एक मशहूर पॉप गायक.
२०) बासु चटर्जी निर्देशित इस फिल्म में मिथून चक्रवर्ती और बिंदीया गोस्वामी थे.
२३) आसमान (फिल्म)
२४) ये है प्यार के (फिल्म)
२६) तौबा ये चाल झुक जाए फुलों की डाल.... (गीत)
३०) सन् २००१ में शिबु मित्रा निर्देशित इस फिल्म में सनी देओल, चंकी पांडे और निलम थे.
३१) टंडन (अभिनेत्री)
३२) सनी देओल, सलमान खान, करीश्मा कपूर और तब्बु अभिनीत फिल्म.

मागील फिल्मी उत्तर

वि	श्व	वि	धा	ता		र	म	ग	ड	के	शो	ले
नो		धु		रा	म			ज		त		क
द	स			चं	द	न	सा	ब	द	न		चा
मे		दो	ब	द	न			त		दे	व	ल
ह		स्ती		ब		स	ल	मा		सा		ली
रा	धा		ह	ड		त्ते		शा		ई		सा
		स	म	जा		पे			रो			स
ब	क्षी		स	त्या		स			जा	न	व	र
प्पी		खॉ	ब		प	त्ता	प	त्ता		या		ला
ल	ता		उ				ह		फा			
ह		म	स्ता	ना		ई	ला	अ	रू	ण		सा
री			द		व		प्या		ख			ज
	ह	म	है	रा	ही	प्या	र	के		मि	ल	न

शांतीदूत ड्रेसेसची सुवर्ण महोत्सवी वाटचाल कौतुकास्पद

आनंद मुथा यांचे प्रतिपादन; एम.जी. रोड कापड बाजार असोसिएशनतर्फे पेमराज पोखरणा यांचा सत्कार



कापड बाजारातील शांतीदूत ड्रेसेस या कापड दालनास धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल संचालक पेमराज पोखरणा यांचा एम.जी.रोड कापड बाजार व्यापारी असोसिएशनतर्फे सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

नगर – नगरच्या कापड बाजारातील शांतीदूत ड्रेसेस या कापड दालनास यंदा धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. सुवर्णमहोत्सवी वाटचाल करत नगरच्या कापड विश्वाचा नावलौकिक वाढवण्यात शांतीदूत ड्रेसेसने योगदान दिले आहे. या निमित्त दालनाचे संचालक पेमराज पोखरणा यांचा एम.जी.रोड कापड बाजार व्यापारी असोसिएशनतर्फे सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी अध्यक्ष शाम देडगांवकर, सेक्रेटरी किरण व्होरा, संचालक आनंद मुथा, राजेश तिवारी, येवलेकर आदी उपस्थित होते.

आनंद मुथा म्हणाले, नगरचा कापड बाजार चांगल्या दर्जाच्या कपड्यांसाठी महाराष्ट्रात नावाजला जातो. पोखरणा परिवाराने शांतीदूत ड्रेसेसच्या माध्यमातून लहान मुलांमुलींचे रेडिमेड कपडे उपलब्ध करून देत विश्वसनीयता आणि गुणवत्ता जपली आहे. हाच भक्कम पाया पाच दशकांच्या यशस्वी व्यवसायिक वाटचालीचा मुख्य आधारस्तंभ आहे. काळानुरूप बदल अंगिकारत लहानग्यांना आधुनिक फॅशनचे व पारंपरिक कपडे याठिकाणी कायम उपलब्ध करून दिले जातात. त्यामुळे तीन पिढ्यांचे ग्राहक शांतीदूतनी जोडले गेले आहेत.

पोखरणा यांची नवीन पिढीही तितक्याच सचोटीने व्यवसाय करत ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देत आहे. अशा वस्त्र दालनांमुळेच नगरचा कापड बाजार आपला नावलौकिक कायम वाढत आहे. मागील काही महिन्यात आ. संग्राम जगताप यांच्या पुढाकाराने कापड बाजार रस्त्याचे रूप पालटले आहे. सिमेंट काँक्रीटचा प्रशस्त रस्ता तयार झाल्याने व्यावसायिक, ग्राहकांना चांगली सुविधा मिळत आहे. त्यामुळे बाजारपेठेत आणखी चैतन्य निर्माण झाले आहे, असे मुथा म्हणाले.

ग्राहकांशी पिढ्यानपिढ्यांचे जुडले नाते

पेमराज पोखरणा म्हणाले, ५० वर्षांची प्रदीर्घ वाटचाल ग्राहकांचे प्रेम आणि विश्वासामुळेच शक्य झाली आहे. पूर्वी आईवडीलांसोबत कपडे खरेदीसाठी येणारे मुले मोठी होऊन आपल्या मुलांसाठी शांतीदूतमध्येच कपडे खरेदीसाठी येतात तेव्हा खूप समाधान लाभते. आताच्या काळात लहान मुलांमुलींच्या कपड्यांची व्हरायटी खूप वाढली आहे. सणवार, विविध मंगल कार्यात प्रसंगानुरूप वेशभूषा केली जाते. याठिकाणी रेडीमेडमध्ये एथेनिक, कॅज्युअल, पार्टी शेअर असे सर्वच प्रकारचे रेडीमेड कपडे उपलब्ध आहेत.

सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त दालनात खास योजना

सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त दालनात खास योजना सुरू आहे. यात ३ हजारांपुढील खरेदीवर सरसकट १० टक्के डिस्काउंट दिला जात आहे. ग्राहकांची खरेदी अधिक आनंददायी करण्याचा हा प्रयत्न आहे. आधुनिक फॅशनचे सर्व प्रकारचे रेडीमेड कपडे याठिकाणी उपलब्ध आहेत. दिवाळी सारख्या मोठ्या सणावेळी आपल्या कुटुंबातील लहानग्यांसाठी रूबाब वाढवणारी तसेच सौंदर्य खुलवणारी कपडे खरेदीसाठी पालक शांतीदूतलाच प्राधान्य देतात. कापड बाजार असोसिएशनने दिलेल्या शुभेच्छा आमच्यासाठी लाखमोलाच्या आहेत.



अंध बांधवांना जीवनावश्यक किराणा किटचे वाटप करण्यात आले.

अंध बांधवांना किराणा किटचे वाटप

नगर – अंधजन मंडळातील अंध बांधवांना जीवनावश्यक किराणा किटचे वाटप करण्यात आले.

सध्याच्या महागाईच्या काळात अंध आणि दिव्यांग बांधवांना जीवनावश्यक वस्तूंची कमतरता भासू नये, तसेच दिवाळीचा सण आनंदाने साजरा करता यावा या उद्देशाने अश्विनी आव्हाड यांच्या पुढाकारातून सुमारे २० ते २५ अंध बांधवांना किराणा किटचे वितरण करण्यात आले. या किटमध्ये गहू, तांदूळ, तेल, डाळी, साखर, चहापत्ती तसेच इतर आवश्यक वस्तूंचा समावेश होता.याप्रसंगी अश्विनी आव्हाड, सुनील मंगुडकर, वैशाली आव्हाड, भारती दरेकर, प्रथमेश मंगुडकर अंधजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर, राजेंद्र फळके, अनिल चाबुकस्वार, गोरख दरंदले, अप्पा फुफसे, गणेश जाधव, छाया धनवटे, मनिषा लोंढे, अनिता जाधव, दृष्टीसाथी मनेष वैराळ, आदी दिव्यांग बांधव उपस्थित होते.

प्रास्ताविक अनिल चाबुकस्वार यांनी केले, तर गोरख दरंदले यांनी आभार मानले.

यावेळी अश्विनी आव्हाड व भारती दरेकर यांचा सत्कार करण्यात आला.

अंधजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर यांनी सर्व सेवाभावी दात्यांचे आभार मानत समाजातील अधिकाधिक नागरिकांनी अशा उपक्रमांमध्ये सहभागी होऊन गरजूंना मदतीचा हात द्यावा असे आवाहन केले.



अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या जॉगिंग ट्रॅक जवळील सावेडी शाखेमध्ये दिवाळी अंकांच्या माध्यमातून आगळी वेगळी मेजवानी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या दिवाळी अंकांचे वाचकांना वितरण उद्योजिका शिवानी देशमुख व स्मिता देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

सावेडीकरांसाठी आता दिवाळी अंकांची मेजवानी

नगर – दीपावलीची सगळीकडे धूम असताना नगर शहरातील सावेडी उपनगरातील रसिक वाचक नगरकरांना ही दिवाळी आगळीवेगळी ठरणार आहे. दिवाळीचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या जॉगिंग ट्रॅक जवळील सावेडी शाखेमध्ये दिवाळी अंकांच्या माध्यमातून आगळी वेगळी मेजवानी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या दिवाळी अंकांचे वाचकांना वितरण उद्योजिका शिवानी देशमुख व स्मिता देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. राजा ठाकूर, संचालिका प्रा ज्योती कुलकर्णी, संचालक कवी चंद्रकांत पालवे, सौ. गौरी जोशी, वाचक डॉ. धर्माधिकारी, अजित कटारिया ग्रंथपाल अमोल इथापे, सौ. सारिका देव आदी उपस्थित होते .

उद्योजिका देशमुख यांनी यावेळी बोलताना मराठी संस्कृतीत दिवाळी अंकाचे मोठे योगदान असून सावेडी मधील वाचकांची दिवाळी या उपक्रमामुळे अधिक दैदिप्यमान होणार असल्याचे सांगितले. डॉ. ठाकूर यांनी याप्रसंगी बोलताना विचारांची संस्काराची आणि आत्मिक आनंदातून साजरी करण्यासाठी दिवाळी अंकांचे योगदान अमूल्य आहे. रसिक वाचकांना या दिवाळी अंकामुळे आगळीवेगळी मेजवानी मिळणार असल्याचे सांगितले.

प्रास्ताविकात प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी उपक्रमाची माहिती देऊन सावेडी जिल्हा वाचनालयात दीपावली निमित्त विनोदी, क्रीडा, पाककृती, कथा, विज्ञान, धार्मिक, बालकथा, फॅशन, भविष्य तसेच सर्व वृत्तपत्रांचे दिवाळी अंक उपलब्ध असून त्याचा वाचकांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले.

यावेळी स्मिता देशमुख, गौरी जोशी, कवी चंद्रकांत पालवे, डॉ. धर्माधिकारी, अजित कटारिया यांनी आपली मनोगते व्यक्त केली. ग्रंथपाल अमोल इथापे यांनी आभार मानले.

दिवाळी अंकातून मिळणारी आनंदाची दिवाळी चिरकाळ टिकणारी

डॉ. राजा ठाकूर यांचे प्रतिपादन; जिल्हा वाचनालयात दिवाळी वाचकांसाठी मेजवानी



अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात दीपावली निमित्ताने रसिक नगरकर वाचकांसाठी उपलब्ध केलेल्या दिवाळी अंकांचे वाचकांना वितरण करण्यात आले.

नगर – बदलत्या जीवनशैलीत दीपावलीच्या साजरा करण्याच्या पद्धती ही बदलत चालल्या आहेत. दीपावलीच्या या काळात घेतलेले नवीन वस्तू, बनवलेल्या फराळ, केलेली फटाक्यांची आतशबाजी यांचा आनंद अल्पावधीत कमी होईल. परंतु आपल्याला दैदिप्यमान परंपरा असलेल्या मराठी दिवाळी अंकाच्या वाचनातून मिळणारे विचार, ज्ञान, आनंद हा खऱ्या अर्थाने चिरकाल टिकणारा असल्याचे प्रतिपादन जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. राजा ठाकूर यांनी व्यक्त केले.


अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात दीपावली निमित्ताने रसिक नगरकर वाचकांसाठी उपलब्ध केलेल्या दिवाळी अंकांचे वाचकांना वितरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड, सहकार्यवाह राहुल तांबोळी, उपाध्यक्ष दिलीप पांढरे, किरण आगरवाल, जिल्हा ग्रंथालयाचे अधिकारी संतोष कापसे, उद्योजक ओंकार व सौ आणि देशमुख, यश तांदूळवाडकर, ग्लोबल इन्फोटेकचे अशोक दानी, अभिजीत भळगट, ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल, कवी चंद्रकांत पालवे, अनिल झंवर, अविनाश रसाळ, मकरंद राजहंस, विठ्ठल पाठक, पल्लवी कुक्कडवाल, वर्षा जोशी, संजय गाडेकर, राजेंद्र साळी, शंतनु साळी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संचालिका प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी वाचनालयात वाचकांसाठी त्यांच्या आवडीप्रमाणे विविध वृत्तपत्रांचे दिवाळी अंक तसेच विनोदी, धार्मिक, क्रीडा, भविष्य, विज्ञान, कथा, पाककला, अध्यात्मिक बालवाचकांसाठी दिवाळी अंक असे असंख्य विषयावर दिवाळी अंक उपलब्ध करण्यात आले. त्याचा रसिक नगरकरांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. उद्योजक ओंकार देशमुख यांनी या उपक्रमाबद्दल जिल्हा वाचनालया विषयी कृतज्ञता व्यक्त करत दिवाळी अंकांच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने विचारांची तेजोमय दिवाळी साजरी होणार असल्याचे सांगितले.

याप्रसंगी विविध क्षेत्रातील उद्योजक, व्यावसायिक, रसिक, वाचक, सभासद उपस्थित होते. सहकार्यवाह राहुल तांबोळी यांनी आभार मानले.

अवॉर्ड फंक्शनमुळे बांधकाम क्षेत्रातील कामांचा दर्जा सुधारण्यास मदत

महेश बांगड यांचे प्रतिपादन; आर्किटेक्ट इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशनच्या वतीने सभासदांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा



आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगर यांच्या वतीने सभासदांसाठी बांधकाम क्षेत्रातील मानांकित स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी आवश्यक तयारी या विषयावर मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. (छायाचित्र – लहू दळवी)

नगर – बांधकाम क्षेत्रातील उत्कृष्ट कामांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या अवॉर्ड फंक्शनमुळे व्यावसायिकांमध्ये कामाचा दर्जा सुधारण्याची प्रेरणा निर्माण होते. अशा स्पर्धांमध्ये सहभागी होण्याच्या प्रक्रियेतून आपल्या कामातील त्रुटी आणि वेगळेपण समजण्यास मदत होते. त्यामुळे अवॉर्ड फंक्शनकडे केवळ पुरस्कार मिळविण्याचे माध्यम म्हणून न पाहता बांधकाम क्षेत्रातील कामांचा दर्जा उंचावण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे, असे प्रतिपादन महेश बांगड यांनी केले.

आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगर यांच्या वतीने सभासदांसाठी बांधकाम क्षेत्रातील मानांकित स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी आवश्यक तयारी या विषयावर मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी पुणे एसा संस्थेचे अध्यक्ष आर्कि. शेखर गरूड, पुण्यातील आर्कि. हेमंत महाजन, मनोज देशमुख, आरती भट आणि महेश बांगड यांचे तज्ज्ञ पॅनल निमंत्रित करण्यात आले होते.

अहिल्यानगरमध्ये अनेक दर्जेदार बांधकामे

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संस्था अध्यक्ष प्रदीप तांदळे यांनी सांगितले की, अहिल्यानगरमध्ये अनेक दर्जेदार बांधकामे होतात. मात्र, त्या कामांचे रेकॉर्ड व्यवस्थित जतन केले जात नाहीत. तसेच आपल्या कामांचे प्रभावी सादरीकरण करण्यातही आपण कमी पडतो. अशा कार्यशाळांच्या माध्यमातून योग्य मार्गदर्शन मिळत असून, त्याचा उपयोग केवळ अवॉर्ड फंक्शनपुरता मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष कामाचा दर्जा सुधारण्यासाठी झाला पाहिजे. पुणे एसा संस्थेचे अध्यक्ष शेखर गरूड यांनी पुणे एसा संस्थेच्या वतीने राबविण्यात येणारे विविध उपक्रम आणि संघटना बळकट होण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती सभासदांना दिली. अवॉर्ड फंक्शन आणि मानांकित स्पर्धांचे महत्त्व स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, पुण्यातील प्रतिष्ठित स्पर्धांमध्ये संस्थेचे सभासद सहभागी होऊन विजेते ठरत आहेत. त्यामुळे काम करण्याचा उत्साह वाढतो आणि आपण व्यावसायिक क्षेत्रात नेमक्या कोणत्या पातळीवर आहोत, याचा अंदाज घेता येतो.

विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शन

आर्किटेक्ट हेमंत महाजन यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन मिळविलेल्या पुरस्कारांच्या अनुभवातून मार्गदर्शन केले.

मनोज देशमुख यांनी स्पर्धांमध्ये सहभागी होताना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि ज्युरींच्या साइट व्हिजिटसाठी करावयाच्या तयारीबाबत मार्गदर्शन केले. पुण्यातील विविध संस्थांमध्ये पदाधिकारी म्हणून काम पाहणाऱ्या तसेच आरसीसी डिझाइन क्षेत्रातील तज्ज्ञ आरती भट यांनी आरसीसी डिझाइनमधील बारकावे समजावून सांगितले.

महेश बांगड यांनी संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा मांडताना शहरात दर्जेदार बांधकामे उभी राहण्यासाठी अशा स्पर्धांचा कसा उपयोग होतो, याची माहिती दिली.

या कार्यशाळेसाठी पोलाद स्टीलचे सुशांत गव्हाणे, आदेश गुंगे, तसेच एसा संस्थेचे दत्तात्रय शेळके, कोमल कुलकर्णी, नंदकिशोर घोडके, प्रल्हाद जोशी, वैभव देशमुख उपस्थित होते. याशिवाय संचालक भूषण पांडव, अनमोल जैन, संतोष खांडेकर, सुनील जाधव, सचिन डागा, संकेत पादिर, गौरव मांडगे, अमोल येनगंदुल, आदिनाथ आंबेकर, सागर ढगे, विजय उजनीमठ आणि संस्थेचे सभासद उपस्थित होते. सूत्रसंचालन अन्वर शेख यांनी केले, तर उपाध्यक्ष सुनील औटी यांनी आभार मानले.

राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत पार्थ गायकवाडची सलग चौथ्यांदा निवड



राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत नगरच्या पार्थ गायकवाडची सलग चौथ्यांदा निवड झाल्याबद्दल त्याचा आ. संग्राम जगताप, नगरसेवक गणेश भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.


नगर – नुकत्याच पुणे येथे स्केटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्राच्यावतीने राज्यस्तरीय स्पीड स्केटिंग, रोलर हॉकी व इनलाइन हॉकी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्हा रोलर स्केटिंग संघटना संचलित टीम स्पीड स्केटिंग ॲक्ॅडमीच्या खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. पुणे येथे ३० ऑक्टोबर व १ नोव्हेंबर रोजी झालेल्या राज्यस्तर स्केटिंग रोलर हॉकी स्पर्धा व राष्ट्रीयस्तरावर निवड चाचणीमध्ये महाराष्ट्रातील उत्कृष्ट राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी झाले होते. या निवड चाचणी स्पर्धेत पार्थ सतीश गायकवाड देखील सहभागी झाला होता. त्याच्या सर्वोत्कृष्ट खेळाच्या जोरावर त्याची निवड १५ वर्षाआतील स्केटिंग रोलर हॉकी या प्रकारात ५ ते १५ डिसेंबर दरम्यान बेंगलोर, कर्नाटक येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली आहे.

पार्थ हा अहमदनगर जिल्हा रोलर स्केटिंग संघटना संचलित टीम स्पीड स्केटिंग ॲक्ॅडमीची खेळाडू असून दादासाहेब गायकवाड यांचा नातू आहे. तसेच तो कारमेल कॉन्व्हेंट हायस्कूल मधील इयत्ता नववीचा विद्यार्थी आहे. पार्थची राष्ट्रीय स्पर्धेत सहभागाची चौथी वेळ आहे. तो यापूर्वी विशाखापट्टणम (आंध्र प्रदेश), मोहली (पंजाब), बेंगलोर (कर्नाटक) येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धत सहभागी झाला होता आता तो पुन्हा या वर्षी बेंगलोर, (कर्नाटक) येथे राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होत आहे.

सदर राष्ट्रीय स्पर्धेत पदकाची कमाई करुन आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करुन घेण्याचा त्याचा मानस आहे. वयाच्या अवघ्या अडीच वर्षांचा असल्यापासून तो स्केटिंग खेळाचा सराव बुरुडगाव रोड येथील महापालिका, विभागीय कार्यालय येथील संघटनेच्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रात करत आहे. आजपर्यंत अनेक स्पर्धांमध्ये त्याने उत्कृष्ट कामगिरी करत अनेक पदकांची कमाई केली आहे.

आपल्या प्रयत्नांची पराकाष्टा करत त्याने चौथ्यावेळी राष्ट्रीय स्पर्धेत निवडीची कामगिरी केली आहे. सदर बाब ही जिल्हा तसेच राज्यासाठी देखील भूषणाची आहे, आमदार संग्राम जगताप व नगरसेवक गणेश भोसले यांनी त्याचे कौतुक करून पुढील स्पर्धेत शुभेच्छा दिल्या. अहमदनगर जिल्हा रोलर स्केटिंग संघटनेचे सचिव आसिफ बाबुलाल शेख व इतर पदाधिकाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले. पार्थला राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक सतिश गायकवाड यांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण लाभले.

'जेएसएस गुरुकुल'च्या विद्यार्थ्यांनी केली 'वंचितांसोबत' दिवाळी साजरी



केडगाव येथील जेएसएस गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी आरणगाव येथील मानव सेवा प्रकल्पातील वंचितांसोबत दिवाळी साजरी केली. विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत किराणा साहित्य, कपडे, अन्नधान्य, साफसफाईचे साहित्य तसेच दैनंदिन वापरातील विविध जीवनावश्यक वस्तू भेट देत गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलविला.

नगर – केडगाव येथील जेएसएस गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी अरणगाव येथील मानव सेवा प्रकल्पातील वंचितांसोबत दिवाळी साजरी केली. विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत किराणा साहित्य, कपडे, अन्नधान्य, साफसफाईचे साहित्य तसेच दैनंदिन वापरातील विविध जीवनावश्यक वस्तू भेट देत गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलविला.

प्राचार्य आनंद कटारिया आणि निकिता कटारिया यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ मदतकार्य न ठरता माणुसकी, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीचे संस्कार देणारा अनुभव ठरला.

दिवाळीच्या सणाचा आनंद प्रत्येकाला मिळावा आणि समाजातील वंचित घटकांनाही सणाचा गोडवा अनुभवता यावा, या उद्देशाने जेएसएस गुरुकुलच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी प्राचार्य आनंद कटारिया यांनी विद्यार्थ्यांना आपापल्या घरून शक्य होईल त्या स्वरूपात मदत घेऊन येण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला विद्यार्थ्यांनी प्रतिसाद देत सामाजिक जाणिवेचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमतेनुसार विविध वस्तू गोळा केल्या. काही विद्यार्थ्यांनी किराणा साहित्य, काहींनी कपडे, तर काहींनी साफसफाईसाठी लागणारे साहित्य आणले. याशिवाय अन्नधान्य आणि दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या वस्तूंचाही समावेश करण्यात आला. एकत्रितपणे जमा केलेले हे साहित्य मानव सेवा प्रकल्पातील गरजूंसाठी भेट देण्यात आले.

या भेटीनंतर विद्यार्थ्यांनी केवळ दिवाळीपुरतेच मदतकार्य मर्यादित न ठेवता यापुढे आपले वाढदिवस आणि जीवनातील विविध आनंदाचे प्रसंगही मानव सेवा प्रकल्पातील वंचितांसोबत सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरे करण्याचा संकल्प व्यक्त केला. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान देणे पुरेसे नसून त्यांच्यामध्ये माणुसकी, संवेदनशीलता, सहकार्य, सामाजिक बांधिलकी आणि गरजूंबद्दल आपुलकीची भावना निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. जेएसएस गुरुकुलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच असे संस्कार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होत असल्याची भावना प्रकल्पाचे जाधव यांनी व्यक्त केली.

वन नाईट स्टेमधून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित

दिवाळीच्या सुट्ट्या सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांसाठी शाळेतच एकत्रित वन नाईट स्टे उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील नेहमीच्या शैक्षणिक वातावरणापेक्षा वेगळा अनुभव देणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थ्यांना मित्र-मैत्रिणींसोबत वेळ घालविण्याची, एकत्रित राहण्याची आणि विविध आनंददायी क्षण अनुभवण्याची संधी मिळाली. शाळेतच मुक्काम करण्याच्या या अनोख्या अनुभवामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह आणि आनंद द्विगुणित झाला.

एकीकडे वंचितांसोबत दिवाळी साजरी करून सामाजिक बांधिलकीचे संस्कार रुजविणे, तर दुसरीकडे वन नाईट स्टेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आनंददायी सामूहिक अनुभव देणे, अशा दुहेरी स्वरूपाच्या उपक्रमांमुळे जेएसएस गुरुकुलमधील दिवाळी विशेष ठरली.

पुनर्विकासाचा निर्णय घेण्यापूर्वी सावधान

महाराष्ट्र शासनाचा ३० सप्टेंबर २०२६ चा शासन आदेश; अहिल्यानगरमधील जुन्या गृहनिर्माण संस्थांनी आता काय करावे?



पुनर्विकासासंदर्भातील संस्थेची बैठक



इमारतीची तांत्रिक व बांधकामविषयक पाहणी




विशेष सर्वसाधारण सभा व सभासदांचा सहभाग




PMC / वास्तुविशारदाकडून प्रकल्प नियोजन



व्यवहार्यता अहवालासाठी आराखडे व खर्चाचा अभ्यास



निविदा दस्तऐवजाचे उदा.



विकास कराराची नोंदणी



पुनर्विकासित इमारत व सभासदांचा ताबा



जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाची गरज

अहिल्यानगर शहरातील अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारती २५ ते ४० वर्षे किंवा त्याहून अधिक जुन्या झाल्या आहेत. काही इमारतींमध्ये बांधकामाची झीज, छत किंवा बाहेरील भिंतींमधून होणारी गळती, प्लास्टर सुटणे, गंजलेल्या जलवाहिन्या, विद्युत यंत्रणेतील अडचणी, अपुरी वाहनतळ व्यवस्था, लिफ्टचा अभाव आणि आधुनिक सुविधांची कमतरता जाणवू लागली आहे. दुरुस्तीचा खर्च वाढत असताना सभासदांच्या मनात सुरक्षिततेचा आणि भविष्यातील देखभालीचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे अनेक संस्थांमध्ये पुनर्विकासाची चर्चा सुरू झाली आहे.

याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाने दिनांक ३० सप्टेंबर २०२६ रोजी सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासंदर्भात शासन आदेश क्रमांक सगृयो-२०२६/प्र.क्र.१०८/१४-स जारी केल्याचे अपलोड केलेल्या दस्तऐवजात नमूद आहे. हा आदेश महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७९-अ अंतर्गत जारी करण्यात आल्याचे दस्तऐवजात म्हटले आहे. पुनर्विकासाचा प्राथमिक निर्णय, व्यवस्थापन समिती व विशेष सर्वसाधारण सभेची भूमिका, वास्तुविशारद किंवा PMC ची निवड, व्यवहार्यता अहवाल, निविदा प्रक्रिया, विकासकाची निवड आणि सभासदांचे संरक्षण अशा अनेक टप्प्यांबाबत या आदेशात निर्देश आहेत.

म्हणून यापुढे या विषयाचा उल्लेख केवळ जुन्या अर्थाने 'मार्गदर्शक सूचना' असा न करता, ३० सप्टेंबर २०२६ रोजी जारी झालेल्या शासन आदेशातील कार्यपद्धती व निर्देश असा करणे अधिक योग्य आहे. अपलोड केलेल्या संदर्भ दस्तऐवजानुसार या आदेशाने ४ जुलै २०१९ च्या पुनर्विकासविषयक शासन निर्णयासह त्याअंतर्गत जारी केलेली परिपत्रके अधिक्रमित केली आहेत. प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी मात्र शासनाच्या अधिकृत पोर्टलवरील मूळ आदेशातील अचूक शब्दरचना, लागू अटी आणि त्यानंतरचे कोणतेही बदल तपासणे आवश्यक आहे.

आकर्षक आश्वासनांपेक्षा वस्तुस्थिती महत्त्वाची

अनेकदा एखादा विकासक संस्थेशी संपर्क साधतो आणि सभासदांना अतिरिक्त कार्पेट क्षेत्र, मोठा कॉर्पस फंड, मासिक भाडे किंवा इतर सुविधा देण्याचे आश्वासन देतो. अशा प्रस्तावांमुळे पुनर्विकासाची चर्चा वेग घेते. परंतु केवळ सर्वाधिक क्षेत्रफळ किंवा मोठी आर्थिक ऑफर पाहून निर्णय घेणे योग्य नाही. त्या प्रस्तावामागील गणित, विकासकाची आर्थिक क्षमता, मंजुरी मिळण्याची शक्यता, बांधकामाचा कालावधी आणि सभासदांच्या संरक्षणाची व्यवस्था यांचा एकत्रित विचार करणे गरजेचे आहे.

संस्थेने सुरुवातीलाच काही मूलभूत प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत. इमारतीची प्रत्यक्ष स्ट्रक्चरल स्थिती काय आहे? दुरुस्ती करून इमारत सुरक्षित व वापरण्यायोग्य ठेवणे शक्य आहे का, की पुनर्विकासाचा पर्याय अधिक व्यवहार्य आहे? भूखंडाची मालकी, conveyance किंवा deemed conveyance, property card, सातबारा, मंजूर आराखडे आणि इतर कागदपत्रे व्यवस्थित आहेत का? लागू UDCPR व इतर विकास नियंत्रण नियमांनुसार उपलब्ध FSI, TDR आणि संभाव्य बांधकाम क्षमता किती आहे? विद्यमान सभासदांना किती अतिरिक्त कार्पेट क्षेत्र देणे शक्य आहे? बांधकाम खर्च, बाजारभाव, विक्रीयोग्य क्षेत्र आणि विकासकाचा नफा यांचा ताळमेळ बसतो का?

याचबरोबर प्रकल्प पूर्ण होईपर्यंत सभासदांच्या पर्यायी निवासाची, भाड्याची, अनामत रकमेची, स्थलांतर खर्चाची आणि आर्थिक सुरक्षिततेची तरतूद कशी असेल, हे आधी समजून घेणे आवश्यक आहे. या प्रश्नांची उत्तरे तोंडी आश्वासनांवरून मिळत नाहीत. त्यासाठी तांत्रिक, आर्थिक, कायदेशीर आणि प्रशासकीय बाबींचा अभ्यास करावा लागतो.

१. इमारतीची स्थिती आणि संस्थेची प्राथमिक तयारी

पुनर्विकासाची चर्चा सुरू करण्यापूर्वी इमारतीची सद्यस्थिती समजून घेणे हा पहिला टप्पा आहे. इमारतीचे वय, पूर्वी केलेल्या दुरुस्त्या, गळती, काँक्रीटमधील तडे, स्टीलला आलेला गंज, पाया व स्तंभांची स्थिती, जिने, छत, जलवाहिन्या आणि विद्युत व्यवस्था यांची पाहणी आवश्यक आहे. आवश्यक असल्यास पात्र स्ट्रक्चरल इंजिनिअरकडून स्ट्रक्चरल ऑडिट करून घ्यावे. केवळ इमारत जुनी आहे म्हणून ती आपोआप पुनर्विकासास पात्र ठरते, किंवा केवळ किरकोळ दुरुस्ती करून प्रश्न सुटेल, असे गृहीत धरू नये.

संस्थेची जमीन आणि बांधकामाशी संबंधित कागदपत्रेही तपासावीत. मंजूर बांधकाम आराखडा, बांधकाम परवानगी, पूर्णत्व प्रमाणपत्र किंवा भोगवटा प्रमाणपत्र, मालकी हक्काची कागदपत्रे, संस्थेची नोंदणी कागदपत्रे, सभासद नोंदवही, सदनिकांचे क्षेत्रफळ आणि पूर्वीच्या ठरावांची माहिती एकत्रित करावी. कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास त्या कोणत्या टप्प्यावर आणि कोणत्या पद्धतीने दूर करता येतील, याचा प्राथमिक सल्ला घ्यावा.

२. व्यवस्थापन समिती, सभासद आणि विशेष सर्वसाधारण सभा

पुनर्विकास हा संस्थेच्या सर्व सभासदांवर परिणाम करणारा विषय असल्याने तो केवळ अध्यक्ष, सचिव, काही पदाधिकारी किंवा एखाद्या विकासकाच्या पुढाकारावर आधारित असू नये. विधिवत निवडून आलेली आणि कायदेशीररीत्या गठित व्यवस्थापन समितीने लागू कायदा व शासन आदेशानुसार प्रक्रिया पुढे नेणे अपेक्षित आहे. अपलोड केलेल्या स्पष्टीकरणात्मक दस्तऐवजात प्रशासक किंवा प्राधिकृत अधिकारी स्वतःहून पुनर्विकासाचा निर्णय घेऊ शकत नसल्याचा मुद्दा नमूद आहे; या बाबीची अंमलबजावणी करताना मूळ आदेशातील अचूक तरतूद तपासावी.

अपलोड केलेल्या स्पष्टीकरणात्मक दस्तऐवजानुसार, संस्थेच्या किमान २० टक्के सभासदांना पुनर्विकासाच्या विषयावर विशेष सर्वसाधारण सभा बोलावण्याची लेखी मागणी करता येण्याची तरतूद नमूद आहे. सभेची नोटीस, विषयपत्रिका, सभासदांना नोटीस मिळाल्याचा पुरावा, उपस्थितीपत्रक, इतिवृत्त आणि ठराव यांचे व्यवस्थित दस्तऐवजीकरण करणे महत्त्वाचे आहे.

त्याच दस्तऐवजात विशेष सर्वसाधारण सभेसाठी एकूण सभासदांच्या दोन-तृतीयांश उपस्थितीचा कोरम आणि पुनर्विकासाच्या प्राथमिक निर्णयासाठी एकूण सभासदांपैकी किमान ५१ टक्के सभासदांची मान्यता आवश्यक असल्याचे नमूद आहे. प्रत्यक्ष उपस्थिती, पात्र ऑनलाइन सहभाग, मतदानाची पद्धत आणि संमतीची गणना कोणत्या प्रकारे करावी, याबाबत मूळ शासन आदेशातील अचूक शब्दरचना तपासणे अत्यावश्यक आहे. कारण कोरम आणि निर्णयासाठी आवश्यक असलेली संमती या दोन स्वतंत्र बाबी आहेत; त्यांची गल्लत होऊ नये.

सभासदांना प्रस्ताव, उपलब्ध माहिती, संभाव्य फायदे, जोखीम आणि पर्याय समजावून सांगितल्याशिवाय निर्णय घेऊ नये. सभासदांमध्ये मतभेद असतील तर त्यावर चर्चा, प्रश्नोत्तरे आणि लेखी नोंदी यांद्वारे मार्ग काढण्याचा प्रयत्न करावा.

३. वास्तुविशारद किंवा PMC ची पारदर्शक निवड

पुनर्विकास प्रक्रियेत वास्तुविशारद किंवा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultant - PMC) हा संस्थेचा तांत्रिक आणि प्रक्रियात्मक सल्लागार असतो. त्याची भूमिका केवळ आराखडा तयार करणे किंवा निविदा मागविणे एवढी मर्यादित नसते. संस्थेची गरज समजून घेणे, जमिनीची व बांधकामाची क्षमता तपासणे, व्यवहार्यता अहवाल तयार करणे, विकासकांच्या प्रस्तावांची तुलना करणे, सभासदांना निर्णयासाठी योग्य माहिती देणे आणि संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यास मदत करणे या जबाबदाऱ्या त्याच्याशी संबंधित असतात.

अपलोड केलेल्या स्पष्टीकरणात्मक दस्तऐवजात व्यवस्थापन समितीने पात्र वास्तुविशारद किंवा PMC कडून किमान तीन दरपत्रके मागविणे आणि अंतिम निवड विशेष सर्वसाधारण सभेत करणे असा उल्लेख आहे. PMC ची कामाची व्याप्ती, शुल्क, कालमर्यादा, जबाबदाऱ्या आणि अहवाल देण्याची पद्धत स्पष्ट असावी. नियुक्तीपत्रासोबत लेखी करार करणे संस्थेच्या हिताचे आहे.

PMC निवडताना केवळ कमी फी हा निकष ठेवू नये. पुनर्विकासाचा प्रत्यक्ष अनुभव, तांत्रिक पात्रता, FSI-TDR आणि UDCPR चे ज्ञान, आर्थिक व्यवहार्यतेचे विश्लेषण, निविदा प्रक्रिया हाताळण्याची क्षमता, विकास करारातील महत्त्वाच्या अटी ओळखण्याचे कौशल्य आणि सभासदांशी संवाद साधण्याची पद्धत या सर्व बाबी तपासाव्यात. एखाद्या सल्लागाराने किती प्रकल्प पूर्ण केले आहेत हा महत्त्वाचा निकष असला, तरी त्याचे तांत्रिक ज्ञान, कामाची पद्धत आणि निष्पक्षता यांचाही विचार करावा.

४. व्यवहार्य प्रकल्प अहवाल : पुनर्विकासाचा पाया

Feasibility Report किंवा व्यवहार्यता अहवाल हा संपूर्ण पुनर्विकासाचा पाया आहे. या अहवालात भूखंडाचे क्षेत्रफळ, मालकी, विकासाची पात्रता, लागू UDCPR व इतर विकास नियंत्रण नियमांनुसार उपलब्ध FSI/TDR, विद्यमान सदनिकांचे क्षेत्रफळ, प्रस्तावित बांधकाम, वाहनतळ, मोकळ्या जागा, बांधकाम खर्च, विक्रीयोग्य क्षेत्र, बाजारातील संभाव्य विक्रीदर आणि प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता यांचा अभ्यास केला जातो.

याच अहवालातून विद्यमान सभासदांना किती अतिरिक्त कार्पेट क्षेत्र देता येईल, कॉर्पस फंड किंवा इतर लाभ देणे शक्य आहे का, भाडे व अनामत रक्कम किती असू शकते, बांधकामासाठी किती कालावधी अपेक्षित आहे आणि प्रकल्पात कोणत्या जोखमी आहेत, याचा प्राथमिक अंदाज येतो. अहवाल तयार करताना केवळ आशावादी गृहीतके न धरता वास्तववादी बांधकाम खर्च, विक्रीदर, मंजुरीसाठी लागणारा कालावधी आणि बाजारातील चढउतार यांचा विचार करावा. अपलोड केलेल्या स्पष्टीकरणात्मक दस्तऐवजात PMC ने मंजूर कामाच्या व्याप्तीनुसार अहवाल तयार करावा आणि त्यासाठी दोन महिन्यांची मुदत नमूद असल्याचे वृत्त असल्याचा उल्लेख आहे. ही मुदत नेमकी कोणत्या घटनेपासून सुरू होते आणि कोणत्या अटी लागू होतात, हे मूळ शासन आदेशातून पडताळावे. महत्त्वाचा मुद्दा असा की अहवाल वेळेत तयार होण्याइतकेच तो वास्तववादी, तपासता येण्याजोगा आणि सभासदांना समजेल असा असणे आवश्यक आहे. योग्य व्यवहार्यता अहवालामुळे सर्व विकासकांना समान आधारावर प्रस्ताव सादर करता येतो. अन्यथा एका विकासकाने अधिक क्षेत्रफळ देण्याचे आश्वासन दिले आणि दुसऱ्याने जास्त भाडे किंवा कॉर्पस दिला, तर कोणता प्रस्ताव प्रत्यक्षात चांगला आहे हे ठरविणे कठीण होते.

५. खुली निविदा आणि विकासकाची निवड

व्यवहार्यता अहवालाच्या आधारे निविदेचा मसुदा तयार केला जातो. निविदेत सभासदांना मिळणारे क्षेत्रफळ, भाडे, अनामत रक्कम, कॉर्पस, स्थलांतर खर्च, बांधकामाचा कालावधी, बँक हमी, गुणवत्ता, परवानग्या आणि विलंब झाल्यास परिणाम अशा बाबी स्पष्ट असाव्यात. सर्व विकासकांना समान अटी देणे आणि प्राप्त प्रस्तावांची निष्पक्ष तुलना करणे महत्त्वाचे आहे.

अपलोड केलेल्या स्पष्टीकरणात्मक दस्तऐवजात मराठी व इंग्रजी स्थानिक वृत्तपत्रांत जाहिरात देऊन खुली निविदा मागविणे, शक्यतो किमान तीन निविदा प्राप्त करणे, निविदांची यादी संस्थेच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करणे आणि PMC किंवा वास्तुविशारदाने Comparative Statement तयार करणे यांचा उल्लेख आहे. निविदा कमी प्राप्त झाल्यास मुदतवाढ देण्यासारख्या बाबीही मूळ आदेशाच्या अधीन राहून तपासाव्यात.

विकासकाची निवड करताना केवळ सर्वाधिक अतिरिक्त क्षेत्र किंवा मोठा कॉर्पस पाहू नये. त्याने यापूर्वी पूर्ण केलेले प्रकल्प, आर्थिक क्षमता, निधी उभारण्याची क्षमता, बँकिंग व्यवहार, बांधकामाचा दर्जा, वेळेत काम पूर्ण करण्याची क्षमता, भाडे देण्याची ताकद आणि करारातील जबाबदाऱ्या पार पाडण्याची क्षमता तपासावी. जास्त लाभाचे आश्वासन देणारा विकासक आर्थिकदृष्ट्या सक्षम नसेल, तर प्रकल्प अडकण्याचा धोका असतो.

अपलोड केलेल्या दस्तऐवजात विकासक निवडीसाठी विशेष सर्वसाधारण सभा, निबंधकाने नियुक्त केलेल्या अधिकृत अधिकाऱ्याची भूमिका आणि सभेचे व्हिडिओ चित्रीकरण यांचा उल्लेख आहे. काही परिस्थितीत गुप्त मतदानाची मागणी होऊ शकते, असेही नमूद आहे. या प्रक्रियेतील आवश्यक सभासद मान्यता, गुप्त मतदानाच्या अटी आणि कागदपत्रे सादर करण्याच्या मुदती मूळ आदेशानुसारच निश्चित कराव्यात.

६. विकास करार, PAAA आणि सभासदांचे संरक्षण

विकासकाची निवड झाली म्हणजे पुनर्विकास पूर्ण झाला असे नाही. निवडीनंतर विकास करार (Development Agreement) आणि प्रत्येक सभासदाचा कायमस्वरूपी पर्यायी निवास करार (Permanent Alternate Accommodation Agreement - PAAA) हे अत्यंत महत्त्वाचे टप्पे आहेत. करारामध्ये विद्यमान व नवीन कार्पेट क्षेत्रफळ, अतिरिक्त क्षेत्र, कॉर्पस, भाडे, अनामत रक्कम, स्थलांतर खर्च, बांधकामाची मुदत, विलंब झाल्यास दायित्व, बँक हमी किंवा इतर आर्थिक सुरक्षा, आवश्यक परवानग्या आणि करारभंग झाल्यास उपलब्ध उपाय स्पष्ट असावेत.

अपलोड केलेल्या स्पष्टीकरणात्मक दस्तऐवजात विकासक निवडीनंतर तीन महिन्यांच्या आत विकास करार करण्याची तरतूद असल्याचा उल्लेख आहे. तसेच प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पहिल्या किंवा पाया उभारणीच्या प्रमाणपत्राच्या तारखेपासून सामान्य परिस्थितीत जास्तीत जास्त दोन वर्षे आणि अपवादात्मक परिस्थितीत तीन वर्षे अशी मुदत दिल्याचे नमूद आहे. या मुदतींचा नेमका प्रारंभबिंदू, अपवाद आणि लागू अटी मूळ आदेश व करारातून तपासणे आवश्यक आहे.

सभासदांनी घर रिकामे करण्यापूर्वी आवश्यक कायदेशीर मंजुऱ्या प्राप्त झाल्या आहेत का, प्रत्येक सभासदाचा झ नोंदणीकृत झाला आहे का, पर्यायी निवास किंवा भाडे व अनामत रकमेची व्यवस्था स्पष्ट आहे का आणि आवश्यक आर्थिक सुरक्षा उपलब्ध आहे का, याची खात्री करावी. केवळ विकासक निवडला किंवा कराराचा मसुदा तयार झाला म्हणून लगेच सदनिका रिकामी करणे योग्य नाही. प्रत्येक सभासदाच्या वैयक्तिक हक्कांचे संरक्षण लेखी व नोंदणीकृत दस्तऐवजांतून झाले पाहिजे.

पुनर्विकसित इमारतीतील सदनिकांचे वाटपही पारदर्शक पद्धतीने व्हावे. अपलोड केलेल्या स्पष्टीकरणात्मक दस्तऐवजात वाटपाच्या सभेसाठी किमान १४ दिवस आधी नोटीस, शक्य असल्यास विद्यमान मजल्यांच्या क्रमाशी सुसंगत वाटप, आवश्यकतेनुसार सोडत, व्हिडिओ चित्रीकरण आणि प्रमाणित वाटप यादी जतन करण्याचा उल्लेख आहे. प्रत्यक्ष वाटप करताना मूळ आदेशातील प्रक्रिया आणि सभासदांच्या नोंदणीकृत करारातील हक्क पाळणे आवश्यक आहे.

अहिल्यानगरमधील संस्थांनी आत्ताच काय करावे?

अहिल्यानगरमध्ये काही संस्था प्राथमिक चर्चेच्या टप्प्यावर आहेत; काहींनी विकासकांशी संपर्क साधला आहे; काही ठिकाणी सभासदांमध्ये मतभेद आहेत; तर काही संस्थांना पुनर्विकास करायचा आहे, पण सुरुवात कुठून करावी हे समजत नाही. अशा प्रत्येक संस्थेची परिस्थिती वेगळी असते. एका संस्थेचा प्रस्ताव किंवा अनुभव दुसऱ्या संस्थेला तंतोतंत लागू होईलच असे नाही.

सुरुवातीला संस्थेने इमारतीचे वय, स्ट्रक्चरल स्थिती, उपलब्ध दुरुस्ती अहवाल, भूखंडाची कागदपत्रे, मंजूर आराखडे, विद्यमान सदनिकांचे क्षेत्रफळ, सभासदसंख्या आणि संस्थेची सध्याची आर्थिक व प्रशासकीय स्थिती यांची माहिती एकत्र करावी. त्यानंतर प्राथमिक तांत्रिक व आर्थिक अभ्यास करून पुढील प्रक्रिया ठरवावी. काही प्रकरणांत प्रथम कागदपत्रे दुरुस्त करणे आवश्यक असू शकते; काही ठिकाणी स्ट्रक्चरल ऑडिट किंवा व्यवहार्यता अहवालाची गरज असू शकते; तर काही संस्थांमध्ये सभासदांची प्राथमिक चर्चा आणि विशेष सर्वसाधारण सभेची प्रक्रिया सुरू करावी लागू शकते.

पुनर्विकासाचा निर्णय घाईत घेऊ नका; परंतु योग्य नियोजन सुरू करण्यास विलंबही करू नका. शासन आदेशातील कार्यपद्धती समजून घेऊन, संस्थेच्या प्रत्यक्ष परिस्थितीचा अभ्यास करून आणि आवश्यक तज्ज्ञांचा सल्ला घेऊनच पुढील पावले उचलावीत.

पुनर्विकासाचा निर्णय घेण्यापूर्वी अनुभवी PMC चा सल्ला घ्या

आपल्या गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीचे वय किती आहे? इमारतीची सध्याची स्ट्रक्चरल स्थिती कशी आहे? दुरुस्ती करणे योग्य ठरेल की पुनर्विकासाचा पर्याय तपासणे आवश्यक आहे? जमिनीची मालकी व कागदपत्रे पूर्ण आहेत का? उपलब्ध FSI आणि TDR च्या आधारे पुनर्विकास कितपत व्यवहार्य होऊ शकतो? संभासदांना किती अतिरिक्त कार्पेट क्षेत्र, भाडे किंवा इतर लाभ मिळू शकतील? या सर्व प्रश्नांचा प्राथमिक अभ्यास करणे आवश्यक आहे.

पुनर्विकासाचा निर्णय घेण्यापूर्वी संस्थेने इमारतीचे वय, स्ट्रक्चरल स्थिती, जमीन व बांधकामाची कागदपत्रे, सभासदांची संख्या आणि पुनर्विकासाची सद्यस्थिती यांची माहिती संकलित करून पुनर्विकासाचा अनुभव, तांत्रिक ज्ञान आणि आर्थिक व्यवहार्यतेचा अभ्यास करण्याची क्षमता असलेल्या माहितगार व अनुभवी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराशी (PMC) संपर्क साधणे केव्हाही हिताचे ठरेल. त्यामुळे केवळ आकर्षक आश्वासनांवर अवलंबून न राहता संस्थेला वस्तुस्थिती समजेल, योग्य पर्यायांची माहिती मिळेल आणि पुढील प्रक्रिया अधिक नियोजनबद्ध व पारदर्शक पद्धतीने राबविता येईल.

आपल्या संस्थेचा पुनर्विकास करण्याचा विचार सुरू असेल, तर विकासकाची निवड किंवा कोणताही अंतिम निर्णय घेण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला अवश्य घ्या. सुरुवातीच्या टप्प्यावर घेतलेला योग्य सल्ला भविष्यातील अनेक तांत्रिक, आर्थिक आणि कायदेशीर अडचणी टाळण्यास मदत करू शकतो.

७. प्रत्येक टप्प्याचे दस्तऐवजीकरण आणि माहितीची उपलब्धता

पुनर्विकासात पारदर्शकता केवळ सभेत ठराव मंजूर करण्यापुरती मर्यादित नसते. सुरुवातीपासून शेवटपर्यंत प्रत्येक महत्त्वाच्या निर्णयाची लेखी नोंद ठेवणे आवश्यक आहे. सभासदांची लेखी मागणी, विशेष सभेची नोटीस, विषयपत्रिका, नोटीस बजावल्याचे पुरावे, उपस्थितीपत्रक, सभेचे इतिवृत्त, मतदान किंवा संमतीची नोंद, PMC नियुक्तीपत्र, कामाची व्याप्ती, व्यवहार्यता अहवाल, निविदा जाहिरात, प्राप्त निविदा, तुलनात्मक तक्ता, विकासक निवडीचा ठराव आणि विकास करार ही कागदपत्रे क्रमाने जतन करावीत.

सभासदांना निर्णयासाठी आवश्यक माहिती वेळेत उपलब्ध झाली पाहिजे. कोणता प्रस्ताव का स्वीकारला जात आहे, दुसरा प्रस्ताव का कमी योग्य आहे, कोणत्या अटी संस्थेसाठी अधिक सुरक्षित आहेत आणि कोणत्या जोखमी स्वीकारल्या जात आहेत, हे स्पष्ट करता आले पाहिजे. दस्तऐवज फक्त पदाधिकाऱ्यांकडे राहू नयेत; लागू कायदा, शासन आदेश आणि संस्थेच्या नियमांनुसार सभासदांना पाहणी किंवा प्रत मिळण्याची प्रक्रिया उपलब्ध असावी.

बैठकीत झालेली चर्चा आणि प्रत्यक्ष ठराव यामध्ये फरक राहू नये. तोंडी संमती, व्हॉट्सअॅपवरील संदेश किंवा अनौपचारिक बैठकीतील आश्वासने यांवर महत्त्वाचे निर्णय आधारित ठेवू नयेत. प्रत्येक निर्णय अधिकृत सभेत, योग्य विषयपत्रिकेवर आणि इतिवृत्तात नोंदवून घ्यावा. व्हिडिओ चित्रीकरणाची तरतूद लागू असेल तर त्याची सुरक्षित नोंद आणि जतन करण्याची जबाबदारीही स्पष्ट करावी. पुनर्विकासाच्या प्रक्रियेत सभासदांचा विश्वास टिकविण्यासाठी नियमित माहिती देणे महत्त्वाचे आहे. कोणता टप्पा पूर्ण झाला, कोणती मंजुरी प्रलंबित आहे, विकासकाकडून कोणती कागदपत्रे अपेक्षित आहेत आणि पुढील कृती काय आहे, याचा संक्षिप्त अहवाल सभासदांसमोर मांडावा. माहितीची कमतरता ही गैरसमज आणि मतभेदांना कारणीभूत ठरू शकते.

८. विकासक निवडल्यानंतरही संस्थेची जबाबदारी संपत नाही

विकासकाची निवड आणि करार नोंदणी झाल्यानंतर संस्थेने संपूर्ण जबाबदारी विकासकावर सोपवून निष्क्रिय राहणे योग्य नाही. करारातील अटींचे पालन होत आहे का, मंजुऱ्या वेळेत मिळत आहेत का, सभासदांचे भाडे व अनामत रक्कम ठरल्याप्रमाणे दिली जात आहे का, बँक हमी किंवा अन्य आर्थिक सुरक्षा वैध आहे का आणि बांधकामाची प्रगती मंजूर वेळापत्रकानुसार आहे का, याचा नियमित पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

PMC किंवा नियुक्त तांत्रिक सल्लागाराने बांधकामाच्या प्रगतीचे निरीक्षण, गुणवत्ता तपासणी, साइटवरील महत्त्वाच्या टप्प्यांची नोंद, मंजूर आराखड्याशी प्रत्यक्ष कामाची तुलना आणि विलंबाची कारणे याबाबत संस्थेला अहवाल द्यावा. विकासकाने मंजूर आराखड्यात बदल सुचविल्यास त्याचा सभासदांच्या क्षेत्रफळावर, सुविधांवर, वाहनतळावर किंवा इतर हक्कांवर काय परिणाम होतो, हे समजून घेतल्याशिवाय संमती देऊ नये. सभासदांनीही स्वतःच्या करारातील क्षेत्रफळ, मजला, सदनिकेचे तपशील, parking किंवा इतर मान्य लाभ यांची प्रत जतन करावी. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ताबा घेण्यापूर्वी सदनिकेची गुणवत्ता, वापरातील सुविधा, सामान्य भाग, लिफ्ट, अग्निसुरक्षा, पाणीपुरवठा, ड्रेनेज आणि आवश्यक प्रमाणपत्रे तपासणे गरजेचे आहे. दोष आढळल्यास त्यांची लेखी यादी करून दुरुस्तीची मागणी करावी. म्हणजेच, पुनर्विकासाची प्रक्रिया विकासक निवडीने संपत नाही. करार, मंजुऱ्या, घर रिकामे करणे, बांधकाम, गुणवत्ता नियंत्रण, सदनिकांचे वाटप आणि अंतिम ताबा या सर्व टप्प्यांवर संस्थेने सजग राहणे आवश्यक आहे.

प्रस्तावांची तुलना करताना एकाच निकषावर निर्णय नको

तुलनात्मक तक्ता तयार करताना सर्व विकासकांच्या ऑफर एकाच पद्धतीने मांडणे गरजेचे आहे. अतिरिक्त कार्पेट क्षेत्र, भाडे, अनामत रक्कम, कॉर्पस, स्थलांतर खर्च, बांधकामाचा दर्जा, प्रकल्प पूर्ण करण्याची मुदत, बँक हमी आणि विकासकाची आर्थिक क्षमता या बाबी स्वतंत्रपणे तपासाव्यात. एखादा प्रस्ताव एका बाबतीत आकर्षक असला तरी दुसऱ्या महत्त्वाच्या बाबतीत कमकुवत असू शकतो. म्हणून गुणात्मक आणि आर्थिक दोन्ही निकषांचा एकत्रित विचार करूनच शिफारस करावी. अंतिम निर्णय सभासदांनी उपलब्ध माहिती समजून घेऊन, निर्धारित प्रक्रियेनुसार घ्यावा. PMC ने कोणत्याही विकासकाच्या बाजूने झुकाव न ठेवता संस्थेच्या हिताचा आणि प्रकल्पाच्या प्रत्यक्ष व्यवहार्यतेचा विचार करून निष्पक्ष तांत्रिक मत द्यावे.

आपल्या संस्थेच्या पुनर्विकासासाठी संपर्क साधा

आदर्श कन्सल्टन्सी (Adarsh Consultancy), **अहिल्यानगर**

Er. Prakash Jain



B.E. Civil & M.I.E. & FIV &
Chartered Engineer
Approved RERA Consultant
Redevelopment Consultant
Project Management Consultant
(PMC)

मो. ९४२२२२०७६२,८९७५११२३४५

ई-मेल: reraanr@gmail.com

Architects, Engineers & Surveyors
Association Ahilyanagar

दिव्यासह आत्मज्योती लावू या - शुभ दिपावली



सर्व रसिक, सुजाण वाचकांना दिपावलीच्या हृदयपूर्वक शुभकामना... आपण सामान्य जनता. छोट्या छोट्या गोष्टीत आनंदाचे कारण शोधतो. दिवाळी हा तर सणांचाही सण. संपूर्ण भारत वर्षात वेगवेगळ्या राज्यात अलग अलग पद्धतीने दिवाळी साजरी होते.

अबालवृद्ध नव्या उमेदीने, नव्या उत्साहाने नवनवीन कपड्यांना परिधान करुन, फराळ-मिठायांच्या मेजवानीत आणि आनंदाच्या नादात प्रदूषण करणाऱ्या व क्षणात पैशांची राखरांगोळी करणाऱ्या फटाक्यांच्या गोंधळात सामान्यत: दिवाळी साजरी करतात.

अजूनही जेथे जुनी पिढी आहे व त्यांच्या नेतृत्वात कुटुंब टिकून आहेत तेथे पारंपारिक रितीरिवाजाने दिवाळी साजरी होते. नव्या जमान्याचे हम दो वाले, नोकरीवाले रेडीमेड वस्तू आणून त्यातच दिवाळीचा आनंद शोधतात. संगणक, एआय क्रांतीमुळे व्यापारी वर्गाची चोपड्या-वह्यांचे पूजन कमी झाले असून आर्थिक वर्ष एप्रिल पासून झाल्यानंतर वही पूजन मुहूर्त इ. विरळ झाले आहे.

जैन धर्मीय या पर्वाला केवळ ज्ञानप्राप्तीचा, सर्वोत्तम अध्यात्मिक सोहळा म्हणून पाहतो. रसिक वाचक विचारांची मेजवानी दिवाळी अंकांच्या माध्यमातून लुटतो तर विद्यार्थी वर्ग खेळण्यात दंग होतो. महिला वर्गांना घर सजवणं, गोडधोड करण यातूनच धावपळ होते. त्यात नोकरी करणाऱ्या महिलांना तर अधिकच परिश्रम करावे लागतात. दिवाळीच्या निमित्ताने शारिरीक चंगळ करताना थोडसं स्वत:त डोकावण्याचाही प्रयत्न व्हावा. आपल्या एक गोष्ट लक्षात येतेय का? मंद दिव्याची ज्योत पाहताना जो आनंद होतो त्याची अनुभूती घेतलीय का? थोडसं आत्मज्योती बद्दल या निमित्ताने विचार करू या. दिव्यांच्या ज्योती पाहताना जी शांतता, मानसिक निरागसता आणि आनंद मिळतो तर आपल्याच मनात डोकावताना आत्म्याच्या व पर्यायाने परमात्म्यालाच ज्योतीचा आनंद अनुभवता आला तर? त्यासाठी प्रयत्न करण्यास काय हरकत आहे? यावर्षी आत्मज्योती पाहण्याचा विचार करू या.

दुसऱ्या शब्दात सांगायचे तर यंदाच्या व पुढच्या प्रत्येक दिवाळीत बौद्धिक, तत्वज्ञानात्मक विचारांच्या फराळाची मेजवानी घेण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. पणतीच्या दिव्यासह आत्मज्योती प्रज्वलीत करुन खऱ्या प्रकाशमान जीवनासाठी प्रयत्नपूर्वक अभ्यास व्हावा.

यातून अध्यात्माची, तत्त्वज्ञानाची दृष्टी लाभते. तत्त्वज्ञान म्हणा वा अध्यात्म किंवा साध्या सुध्या शब्दात श्रद्धा, भावभक्ती म्हणा सणासुदीच्या परंपरेतून त्यापर्यंत पोहोचणे शक्य असते.

तत्त्वाज्ञान, अध्यात्म हे केवळ बुद्धीच्या आधारावर किंवा तर्कशास्त्राच्या कसोटीवर शब्दांच्या आधारानं विषद करायचा विषय नाही. हा अनुभूतीचा विषय आहे. प्रथम आपल्याला रुचलेल्या, मानव कल्याणाच्या, राष्ट्रहिताच्या संस्कृती रक्षणाच्या दृष्टीनं उचित असणाऱ्या (भासणाऱ्या नव्हे) विचारांचा मागोवा घ्यायचा हा प्रथम दिवा सोपान...

नंतरच्या विचारांनी सर्वप्रथम आपल्या जीवनात परिवर्तन घडवून आणायचं हा द्वितीय सोपान - दुसरा दिवा...आपल्या आचरणानं अनुयायांवर, स्नेही मित्र परिवारांवर प्रभाव पडून त्याचा परिणाम म्हणून आपल्या वृत्तीचं आपल्या आपल्या शिष्यांमध्ये संक्रमण होणं हा अंतीम सोपान - आत्मज्ञान, आत्मज्योतीच्या अनुभवाचा अखेरचा दिवा... या प्रक्रियेनं (पणतीच्या दिव्याने आत्मज्योतीची अनुभूती घेण्याचा) महान कार्य, व्यापक दृष्टीकोन करण्याची प्रवृत्ती निर्माण होणं म्हणजे दिपोत्सवाचं फलित प्राप्त होणं असतं. त्यासाठी ते तत्त्वज्ञान, ती प्रक्रिया आपल्या रोमारोमात भिनणं आवश्यक आहे. त्यासाठी महान परिश्रम, तनमन अन् आत्म्याची आराधना हाच एक मार्ग...सहजसुलभ असं काहीच नाही या मार्गावर...

आयुष्य सरत राहावं अगदी, ओंजळीतून पाणी सुटावं जसं...
आपण मात्र त्याला फुलवतं राहावं
दिपज्योतीनं पणतीत उजळावं जसं...
संस्कार, परंपरा अन् विचारधन यांची आम्हां समृद्ध शिकवण
असे आम्हा संगे आत्मज्योतीची साठवण...

- किशोर गांधी (दिशान फिचर्स)

प्रेरणादायी अक्षरधन

माणुसकी हाच माणसाचा धर्म



वाल्मिकी ऋषी रामायणात म्हणतात, धर्मादर्थः प्रभवति धर्मात प्रभवते सुखम। धर्मण लभतें सर्व, धर्मसारमिदं जगत ।।

धर्मामुळे धनलाभ होतो. धर्मामुळे सुख लाभते, धर्माने काय बरे प्राप्त होत नाही? जग चालले आहे ते धर्मामुळेच.

पण धर्माची व्याख्या काय? धर्माचे तत्व काय ?

धर्मस्त तत्वं निहितं गुहायाम ।

धर्माचे सार कशात? ते पडले आहे. अंधारात नाही येत हातात. पक्षपुराण सांगते, अहिंसा निर्मल धर्मम अहिंसा हाच स्वच्छ धर्म होय. तर महाभारत म्हणते, आहुः सत्यं हि परमं धर्म। सत्य हाच सर्वश्रेष्ठ धर्म होय. तुकारामांनी म्हटले आहे. सत्य तोचि धर्म ।

गौतम बुद्ध धम्मपदात म्हणतात,

असाहसेन धम्मेन समेन नयती परे।
धम्मस्थ गुत्तो मेधावी मधट्ठो ति पवुच्चति।।

विवेक करणे, विचारपूर्वक निर्णय करणे, समबुद्धीने निर्णय करणे हेच

धर्म म्हणविणे.

महावीरांचे तत्वज्ञान सांगते की,

वत्थु सहावो धम्मः।

वस्तूचा स्वभाव म्हणजे धर्म. स्वभाव म्हणजे काय ?

स्वभाव स्वकियारुपः लक्षण, कर्तव्य आणि घडण, तेव्हा माणसाचा धर्म कोणता? म्हणजे माणसाची लक्षणे काय ? जे जन्मले ते जन झाले. जे जन्मले त्यांना अस्तित्व लाभले. अस्तित्वाचे धनी ते संत जाणा मनी. म्हणून संतांचा धर्म तो माणसाचा धर्म. जनांचा धर्म. तुकोबा सांगतात.

भुतांची दया, ते भांडवल संतां । आपुली ममता नाही देही ।।

तुका म्हणे सुख पराविया सुखे। अमृत हे मुखे स्त्रवतसे ।।

माणूस तोच, की जो सर्व प्राणिमात्रांवर सदैव दया करतो. स्वतःच्या केवळ देहाचे लाड करीत नाही. दुसऱ्याला सुख देवून स्वतः सुखावतो. ओठावर कधी वाईट शब्द येऊ देत नाही. सर्वांचे मंगल व्हावे असे बोलतो व बोलवितो.

समर्थही म्हणतात. सर्वामुखी मंगल बोलवावे.

दार्शनिकांच्या मते प्रकृतिस्तु धर्मः धर्म म्हणजे प्रकृती. विकृती नव्हे, ती प्रकृती.

उष्णव मरन्यातपसं प्रयोगात
शैत्यं हि वत्सा प्रकृतिर्जलस्य ।। तापणे व तापविणे ही अग्नीची प्रकृती. पाण्याची प्रकृती थंड असणे. पण पाणीही कधीकधी तापते. मी पाण्याची विकृती असते. कारण ते उन्ह किंवा अग्नी यांमुळे तापते.

सुतप्तमपि पानौयं
पुनर्गच्छति शीतताम ।

पाणी कितीही तापले, तरी पुन्हा मूळ प्रकृतीवर जाते, थंड होते.

प्रेम, सर्व प्राणिमात्रांचे ठायी प्रेम हाच माणसाचा धर्म. परस्पर राग, द्वेष, मत्सर ही विकृती माणसातली. देश, वेष, जातपात (नावरूप), धर्म, कर्म हे माणसाचे मर्म नव्हे.

वज्रसूचिकोपनिषद म्हणते.

गवामनेकवर्णानां क्षीरत्वे एकरूपता।

गाईच्या जाती, अनेक रंग वेगवेगळे, पण पान्हा फुटला की दूध येते ते पांढरेच. तसे माणसाचे व्हावे. प्राणिमात्रास पाहून फक्त प्रेम उफाळावे. विकार बाह्य असतात. त्याची लक्षणे व्यर्थ ठरतात. म्हणूनच बाह्य लक्षणे धर्म नसतात. ती फसवी असतात.

एकाने मला देशपांड्यांचे घर विचारले. मी त्याला दुरून दाखविले. त्यावेळी त्या घरावर कावळा बसलेला हाता. मी तो दाखवला. म्हणालो, तो कावळा बसलाच, तेच ते घर. तो बरोबर पोचला.

तो देशपांड्यांच्या घरावरून दहादा गेला. पण ते घर त्याला सापडले नाही. कारण कावळा बसलेले घर कोठे दिसलेच नाही. कावळा बसलेला असणे, हे त्या घराचे तात्कालिक लक्षण. त्या वेळेपुरती खूण. ती त्या घराची प्रकृती नव्हे. क्षणिक बदल ही विकृतीच. माणुसकी हा माणसाचा एकच धर्म

जगी हा एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे।

- किशोर गांधी

दहावी-बारावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर



नगर - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या ९ विभागीय मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

बारावीची लेखी परीक्षा ६ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२७ या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते १५ मार्च २०२७ मार्चदरम्यान होणार आहे. प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षांचे वेळापत्रकही जाहीर झाले आहे. विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक ६ डिसेंबरपासून मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होणार असल्याची माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी दिली.

बारावीची परीक्षा ६ फेब्रुवारीपासून; १८ मार्चपर्यंत चालणार

राज्य मंडळाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार बारावीच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा ६ फेब्रुवारी २०२७ पासून सुरू होणार आहे. ही परीक्षा १८ मार्च २०२७ पर्यंत चालणार आहे. विज्ञान, वाणिज्य आणि कला शाखांसह विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना या वेळापत्रकानुसार परीक्षेचे नियोजन करता येणार आहे. बारावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा २० जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेपूर्वी प्रात्यक्षिक परीक्षांची तयारीही पूर्ण करावी लागणार आहे.

दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारीपासून

दहावीच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी २०२७ रोजी सुरू होणार असून १५ मार्च २०२७ पर्यंत चालणार आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा २८ जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत. परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन, उजळणी आणि सराव परीक्षांचे वेळापत्रक तयार करणे सोपे होणार आहे.

विषयनिहाय वेळापत्रक ६ डिसेंबरपासून उपलब्ध

राज्य मंडळाने परीक्षांचा कालावधी जाहीर केला असला, तरी प्रत्येक विषयाचा पेपर नेमका कोणत्या दिवशी आणि कोणत्या सत्रात होणार, याची सविस्तर माहिती विषयनिहाय वेळापत्रकातून मिळणार आहे. हे सविस्तर वेळापत्रक ६ डिसेंबर २०२६ पासून मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी अधिकृत वेळापत्रक पाहूनच आपल्या अभ्यासाचे नियोजन करावे. सोशल मीडिया किंवा इतर अनधिकृत संकेतस्थळांवर प्रसारित होणाऱ्या वेळापत्रकांवर अवलंबून राहू नये, असे आवाहन मंडळाकडून करण्यात आले आहे.



सिद्धार्थनगर येथील ख्रिस्ती समाजाच्या दफनभूमी प्रश्नाबाबत प्रशासनाने घेतलेल्या या सकारात्मक भूमिकेबद्दल अहमदनगर पहिली मंडळी ख्रिस्ती समाजाच्या वतीने उपमहापौर धनंजय जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

ख्रिस्ती समाजातर्फे धनंजय जाधव यांचा सत्कार

नगर- सिद्धार्थनगर येथील ख्रिस्ती समाजाच्या दफनभूमीच्या दुरवस्थेची दखल घेत उपमहापौर धनंजय जाधव आणि महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या पुढाकारातून दफनभूमी परिसराची स्वच्छता करण्यात आली. प्रशासनाने घेतलेल्या या सकारात्मक भूमिकेबद्दल अहमदनगर पहिली मंडळी ख्रिस्ती समाजाच्या वतीने धनंजय जाधव यांचा सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले. याप्रसंगी रेव्ह. सनी मिसाळ, रेव्ह. संजय मिसाळ, प्रसाद काळे, शाहुल बनकर, ठोंबरे सर, अमोल काळे, लोकेश बर्वे, नितीन खंडागळे, विजय सतराळकर, राजू देठे, विनीत मकासरे, दीपक साळवे, रमेश भोसले, राजेश उजागरे, पास्टर विजय काकडे, सुनील बनसोडे, विशाल केदारी, राजेश ओहोळ उपस्थित होते.

यावेळी ख्रिस्ती समाजाच्या वतीने दफनभूमीचे सुशोभीकरण करून परिसरात विद्युत खांबांची व्यवस्था, अंतर्गत रस्त्यांची निर्मिती, सभा हॉल उभारणी तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे धनंजय जाधव यांच्याकडे करण्यात आली.

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या दूध उत्पादकांची दिवाळी झाली गोड

अंबादास दूध संकलन केंद्राच्या वतीने दूध उत्पादक शेतकऱ्यांना साखरेचे वाटप



अंबादास दूध संकलन केंद्राच्या वतीने दूध उत्पादक शेतकऱ्यांना साखरेचे वाटप करण्यात आले.

नगर - दुष्काळाचे सावट, वाढता आर्थिक ताण आणि शेती व्यवसायातील अडचणी अशा प्रतिकूल परिस्थितीतही शेतकरी आपल्या कष्टाच्या जोरावर दिवाळीचा सण साजरा करत आहेत. अशा परिस्थितीत दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा छोटासा प्रयत्न निमगाव वाघा (ता. नगर) येथील अंबादास दूध संकलन केंद्राच्या वतीने करण्यात आला. दिवाळीनिमित्त दूध उत्पादक शेतकऱ्यांना साखरेचे वाटप करून त्यांच्या सणाचा गोडवा वाढविण्यात आला.

जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आदर्श गोपालक पुरस्कार प्राप्त पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते दूध उत्पादक शेतकऱ्यांना साखर वाटप करण्यात आले. दिवाळीच्या सणानिमित्त शेतकऱ्यांच्या कष्टांची जाणीव ठेवून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

शेतीला जोडधंदा म्हणून अनेक शेतकरी दुग्धव्यवसाय करतात. जनावरांची देखभाल, चारा-पाण्याची व्यवस्था, पशुखाद्याचा वाढता खर्च आणि दुधाच्या दरातील चढ-उतार अशा अनेक आव्हानांना सामोरे जात दूध उत्पादक आपला व्यवसाय टिकवून आहेत. विशेषतः दुष्काळी परिस्थितीत जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता करणे जिकिरीचे ठरत आहे. अशा काळात दूध संकलन केंद्राच्या माध्यमातून मिळालेली साखरेची भेट शेतकऱ्यांसाठी आनंददायी ठरली.

दूध उत्पादक शेतकरी हे दूध संकलन केंद्राचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या सहकार्यामुळेच दुग्धव्यवसायाची साखळी मजबूत राहते. त्यामुळे सण-उत्सवांच्या माध्यमातून शेतकऱ्यांशी जिव्हाळ्याचे नाते जपणे आणि त्यांच्या आनंदात सहभागी होणे महत्त्वाचे आहे. अंबादास दूध संकलन केंद्राच्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी आणि शेतकऱ्यांविषयीची कृतज्ञता अधोरेखित झाली.

यावेळी दूध डेअरीचे चेअरमन भाऊसाहेब जाधव, बापू सुंबे, पोपट भगत, रमेश कुलट, राजू डोंगरे, बाळू जाधव, उत्तम निमसे, नवनाथ जाधव, भागचंद जाधव, बापू पुंड, हुसेन शेख, बाबूभाई शेख, अजय फलके, संदीप डोंगरे, किरण ठाणगे, राजू शिंदे, भाऊ होळकर आदींसह दूध उत्पादक शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

मनोग्राममध्ये ग्रंथमंदिर, कलामंदिर, कृतज्ञतेचं घर आणि माइंड टॉकीजचा शुभारंभ

वाचन, कला, कृतज्ञता अन चित्रपटांतून मनाचे आरोग्य जपणार

नगर - मानसिक आरोग्य म्हणजे केवळ आजारांवर उपचार नव्हे, तर मनाला समजून घेणे, भावनांना अभिव्यक्ती देणे आणि प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे, या व्यापक विचारातून मनोग्रामने एक महत्त्वपूर्ण पाऊल पुढे टाकले आहे. निसर्गाच्या सान्निध्यात मानसिक आरोग्याची मशागत या अभिनव संकल्पनेवर आधारित मनोग्राम, शिराढोण (ता. नगर) येथे मानसिक आरोग्य संवर्धन आणि पुनर्वसनासाठी चार नावीन्यपूर्ण उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला. पद्मश्री डॉ. मोहन आगाशे, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. विद्याधर वाटवे आणि डॉ. सुजल वाटवे यांच्या हस्ते ग्रंथमंदिर, कलामंदिर, कृतज्ञतेचं घर आणि माइंड टॉकीज या उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. तर या प्रकल्पाला खासदार निलेश लंके यांनी भेट दिली.





मानसिक आरोग्य संवर्धन आणि पुनर्वसनासाठी चार नावीन्यपूर्ण उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला. पद्मश्री डॉ. मोहन आगाशे, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. विद्याधर वाटवे आणि डॉ. सुजल वाटवे यांच्या हस्ते ग्रंथमंदिर, कलामंदिर, कृतज्ञतेचं घर आणि माइंड टॉकीज या उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. तर या प्रकल्पाला खासदार निलेश लंके यांनी भेट दिली.

मनोग्राम हा केवळ मानसिक आजारांनी ग्रस्त आणि निराधार व्यक्तींच्या पुनर्वसनाचा प्रकल्प नसून, त्यांना प्रेम, आपुलकी, सन्मान आणि स्वावलंबनाच्या बळावर समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा अभिनव सामाजिक प्रयोग आहे. निसर्ग, शेती, कला, उपचार आणि समुदाय या पंचसूत्रीवर आधारित या प्रकल्पातून मानसिक स्वास्थ्य, व्यक्तिमत्त्व विकास, आत्मविश्वास आणि सामाजिक समावेशनासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच संकल्पनेचा विस्तार म्हणून चार स्वतंत्र उपक्रमांची सुरुवात करण्यात आली आहे.

या कार्यक्रमात युमेता फाउंडेशन, रायगड सेवक समिती आणि नगर कॉलेज यांचा सक्रिय सहभाग लाभला. रायगड सेवक समितीचे अध्यक्ष निलेश पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी महाराष्ट्राच्या पारंपरिक मर्दानी खेळांची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. या सादरीकरणातून महाराष्ट्राच्या शौर्यपरंपरेचे तसेच शारीरिक आणि मानसिक सामर्थ्याचे दर्शन उपस्थितांना घडले. नगर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

यावेळी पद्मश्री डॉ. मोहन आगाशे, डॉ. विद्याधर वाटवे आणि डॉ. सुजल वाटवे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. कार्यक्रमाला नगर ग्रामीणचे पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने उपस्थित होते. त्यांनी मनोग्रामच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले.

खासदार नीलेश लंके यांनीही मनोग्रामला भेट दिली. यावेळी त्यांनी डॉ. किरण चव्हाण आणि डॉ. सुप्रिया चव्हाण यांचा सत्कार करून त्यांच्या सामाजिक कार्याला शुभेच्छा दिल्या. सामाजिक क्षेत्रात योगदान देणारे कमलेश देवाळे, माधवन सर आणि बेदरकर यांचेही स्वागत व सत्कार करण्यात आला.

या संपूर्ण प्रकल्पाची संकल्पना आणि अंमलबजावणी डॉ. किरण चव्हाण आणि डॉ. सुप्रिया चव्हाण यांच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी केतन क्षीरसागर, गणेश कावळे, हेमंत मुळे, सानू माधवन, रवी गोयल, अक्षय चव्हाण, ओंकार जाधव, गौरव जाधव, विराज अहिरे, श्रेयस गौरी यांच्यासह अनेक मित्र, सहकारी आणि स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

विचारांना नवी दिशा देण्याचा प्रयत्न

वाचन ही केवळ ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया नसून मनाला समृद्ध करणारी आणि विचारांना सकारात्मक दिशा देणारी शक्ती आहे. हीच भूमिका लक्षात घेऊन ग्रंथमंदिराची निर्मिती करण्यात आली आहे. पुस्तकांच्या माध्यमातून वाचनसंस्कृती विकसित करणे, विचारविश्व समृद्ध करणे, मानसिक ताणतणावातून सकारात्मकतेकडे वाटचाल करण्यास मदत करणे आणि मानसिक स्वास्थ्य जपण्याची प्रेरणा देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. पुस्तकांच्या सहवासातून मनाला नवी ऊर्जा आणि विचारांना नवी दिशा देण्याचा प्रयत्न येथे केला जाणार आहे.

कलेच्या माध्यमातून मनातील भावना व्यक्त

प्रत्येक व्यक्तीच्या मनात अनेक भावना, विचार आणि अनुभव दडलेले असतात. त्यांना व्यक्त होण्यासाठी योग्य माध्यम मिळणे आवश्यक असते. कलामंदिराच्या माध्यमातून चित्रकला, संगीत, नाट्य आणि इतर कलाप्रकारांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. कलेच्या माध्यमातून मनातील भावना व्यक्त करणे, सर्जनशीलतेला वाव देणे, आत्मविश्वास वाढविणे आणि मानसिक स्वास्थ्याला बळकटी देणे, अशी या उपक्रमाची संकल्पना आहे. कला ही मानसिक आरोग्य संवर्धनासाठी प्रभावी माध्यम ठरू शकते, हा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.

मानवी नातेसंबंध अधिक दृढ

आजच्या धावपळीच्या जीवनात माणसांमधील नातेसंबंध, प्रेम, जिव्हाळा आणि कृतज्ञतेची भावना जपणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. आपल्या आयुष्यात प्रेम, आदर आणि आधार देणाऱ्या व्यक्तींविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कृतज्ञतेचं घर ही विशेष जागा निर्माण करण्यात आली आहे. आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान असलेल्या व्यक्तींची आठवण, त्यांच्याविषयीचा आदर आणि मनातील भावना व्यक्त करण्याची संधी या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. सकारात्मकता, भावनिक जिव्हाळा आणि मानवी नातेसंबंध अधिक दृढ करण्याचा हा संवेदनशील प्रयत्न आहे.चित्रपट आणि दृकश्राव्य माध्यमांच्या प्रभावी वापरातून मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी माइंड टॉकीज हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. विशेषतः विद्यार्थी आणि तरुणांमध्ये मानसिक आजार, आत्महत्या प्रतिबंध, व्यसनमुक्ती, भावनिक स्वास्थ्य आणि मानसिक आरोग्याशी संबंधित विविध विषयांबाबत समज निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

भारतातील पहिले चित्रपटगृह

चित्रपट, लघुपट आणि माहितीपटांच्या माध्यमातून मानसिक आरोग्यविषयक विषय प्रभावीपणे मांडले जाणार आहेत. चित्रपट प्रदर्शनानंतर संवादात्मक चर्चा आयोजित करून प्रेक्षकांना विषय समजून घेण्याची आणि आपले विचार मांडण्याची संधी मिळणार आहे. विशेष म्हणजे, ग्रामीण भागात केवळ मानसिक आरोग्य आणि व्यसनमुक्ती या विषयांवर केंद्रित असलेले भारतातील पहिले चित्रपटगृह असल्याचा या उपक्रमाचा दावा आहे. त्यामुळे माइंड टॉकीजला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मनोरंजनासोबतच मानसिक आरोग्याचे शिक्षण आणि जनजागृती घडविणारे हे व्यासपीठ ठरणार आहे.

प्रभाग १ मधील विकासकामांचा 'नगरोत्थान' मध्ये समावेश करावा

रस्ते, बंदिस्त गटारी व पाणीपुरवठा पाइपलाइनच्या कामांना प्राधान्य देण्याची नगरसेवक संपत बारस्कर यांची मागणी

नगर – सावेडी उपनगरातील नव्याने विकसित होत असलेल्या महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक एकमधील मूलभूत सुविधा आणि विकासकामांना गती देण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत १३ महत्त्वपूर्ण विकासकामांचा समावेश करावा. या कामांचा महासभेत ठराव करून तो तातडीने मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठवावा, अशी मागणी नगरसेवक संपत बारस्कर यांनी निवेदनाद्वारे केली आहे. यासंदर्भात त्यांनी महापौर ज्योती गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे पाठपुरावा केला आहे.



महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक एकमधील मूलभूत सुविधा आणि विकासकामांना गती देण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत १३ महत्त्वपूर्ण विकासकामांचा समावेश करावा, या मागणीचे निवेदन नगरसेवक संपत बारस्कर यांनी महापौर ज्योती गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांना दिले. (छायाचित्र – लहू दळवी)

प्रभाग क्रमांक १ हा सावेडी उपनगरातील झपाट्याने विकसित होणारा भाग असून, या परिसरात मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती वाढत आहे. त्यामुळे रस्ते, पावसाळी पाण्याचा निचरा, बंदिस्त गटारी आणि पाणीपुरवठा अशा मूलभूत सुविधांची कामे प्राधान्याने होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक बारस्कर यांनी प्रभागातील विविध विकासकामांची यादी प्रशासनाकडे सादर केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, ४ नोव्हेंबर रोजी आयोजित महानगरपालिकेच्या महासभेतील विषय क्रमांक २८ मध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत अहिल्यानगर शहरातील रस्ते, पावसाळी पाणी वाहून नेणाऱ्या नाल्या, रस्ता दुभाजक, पदपथ व वृक्षलागवडीच्या कामांचा समावेश आहे. या विषयासंदर्भातील महासभेचा ठराव तातडीने महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा आणि त्यामध्ये प्रभाग क्रमांक एकमधील खालील कामांचा प्राधान्याने समावेश करावा.

अंबिका स्टाईल ते वडगाव गुप्ता शिव

अंबिका स्टाईल ते वडगाव गुप्ता शिव (आठरे पाटील पब्लिक स्कूल रोड) : ३० मीटर रुंदीचा विकास योजना रस्ता तयार करणे, बंदिस्त पाईप गटार व पाणीपुरवठ्याची पाइपलाइन टाकणे. श्रीहरी टॉवर ते संत निरंकारी भवन, भिस्तबाग महाल पश्चिम बाजू, नायरा पेट्रोल पंप, नाना चौक, ढवन वस्ती, पोलीस क्वार्टर, गायकवाड हॉस्पिटल ते बुऱ्हानगर शिव (जुना पिंपळगाव रस्ता) : पूर्व–पश्चिम लांबीचा व उत्तर–दक्षिण रुंदीचा २४ मीटर विकास योजना रस्ता तयार करणे, बंदिस्त पाईप गटार व पाणीपुरवठा पाइपलाइन टाकणे. नाना चौक उत्तर बाजू ते कैसर शाळा, बारस्कर नगर ते सावेडी–वडगाव शिव : पूर्व–पश्चिम रुंदीचा व उत्तर–दक्षिण लांबीचा २४ मीटर विकास योजना रस्ता तयार करणे, बंदिस्त पाईप गटार व पाणीपुरवठा पाइपलाइन टाकणे. नाना चौक दक्षिण बाजू ते सचिन कुचेकर यांचे घर ते भिस्तबाग तलाठी कार्यालय रोड : १५ मीटर विकास योजना रस्ता तयार करणे, बंदिस्त पाईप गटार व पाणीपुरवठा पाइपलाइन टाकणे.

तागडनगर (सरस्वती शाळा)

तागडनगर (सरस्वती शाळा), भिस्तबाग तलाठी कार्यालय रस्ता दक्षिण बाजू ते कादंबरी फेज–३ ओढ्यापर्यंत (किसनगिरी नगर) : उत्तर–दक्षिण लांबीचा व पूर्व–पश्चिम रुंदीचा १२ मीटर विकास योजना रस्ता तयार करणे. तसेच किसनगिरी नगर ते इस्कॉन मंदिर ते गोकुळधाम अपार्टमेंट हा पूर्व–पश्चिम लांबीचा व उत्तर–दक्षिण रुंदीचा १२ मीटर विकास योजना रस्ता तयार करणे. या दोन्ही मार्गांवर बंदिस्त पाईप गटार व पाणीपुरवठा पाइपलाइन टाकणे. नगर–मनमाड रोड ते भोर वस्ती, डॉन बॉस्को शाळा ते माजी नगरसेवक पोपट बारस्कर यांचे घर (शेरणे वस्ती, बारस्कर वस्ती) : प्रस्तावित मार्गावर १५ मीटर रुंदीचा विकास योजना रस्ता तयार करणे, बंदिस्त पाईप गटार व पाणीपुरवठा पाइपलाइन टाकणे. भिस्तबाग महाल उत्तर बाजूकडील राधेकृष्ण नगर ते सारंग बारस्कर यांची जमीन ते सावेडी–वडगाव गुप्ता शिव : उत्तर–दक्षिण लांबीचा व पूर्व–पश्चिम रुंदीचा १५ मीटर रुंदीचा विकास योजना रस्ता तयार करणे, बंदिस्त पाईप गटार व पाणीपुरवठा पाइपलाइन टाकणे.

राजवीर चौक ते बंधन लॉन ते डी–मार्ट

राजवीर चौक ते बंधन लॉन ते डी–मार्ट : उत्तर–दक्षिण लांबीचा व पूर्व–पश्चिम रुंदीचा ३० मीटर रुंदीचा विकास योजना रस्ता तयार करणे, बंदिस्त पाईप गटार व पाणीपुरवठा पाइपलाइन टाकणे.नगर–मनमाड रोड ते कॉटेज बेकरी ते वडगाव गुप्ता रोड : १५ मीटर रुंदीचा विकास योजना रस्ता तयार करणे, बंदिस्त पाईप गटार व पाणीपुरवठा पाइपलाइन टाकणे. पाटील मेडिकल, तपोवन रोड (कजबे टॉवर) ते दाणी यांचे घर ते बोठे यांचे घर : उत्तर–दक्षिण लांबीचा व पूर्व–पश्चिम रुंदीचा १२ मीटर विकास योजना रस्ता तयार करणे, बंदिस्त पाईप गटार व पाणीपुरवठा पाइपलाइन टाकणे. वडगाव गुप्ता रस्ता ते नक्षत्र नगर (आठरे पाटील स्कूलच्या दक्षिण बाजूच्या भिंतीलगत), पुढे वैभवलक्ष्मी कॉलनी उत्तर बाजू, सावेडी–भिस्तबाग शिव ते चंद्रभान बारस्कर यांची जमीन, कैसर शाळा ते कराळे मळा : पूर्व–पश्चिम लांबीचा व उत्तर–दक्षिण रुंदीचा १२ मीटर विकास योजना रस्ता तयार करणे, बंदिस्त पाईप गटार व पाणीपुरवठा पाइपलाइन टाकणे.

भिस्तबाग तलाठी कार्यालय रस्ता

भिस्तबाग तलाठी कार्यालय रस्ता दक्षिण बाजू ते गुलाब बाबा टॉवर, डोहीफोडे यांचा लेआऊट ते ओढा : दक्षिण–उत्तर लांबीचा व पूर्व–पश्चिम रुंदीचा १२ मीटर विकास योजना रस्ता तयार करणे, बंदिस्त पाईप गटार व पाणीपुरवठा पाइपलाइन टाकणे. गावडे मळा (ध्यान मंदिर) ओढा दक्षिण बाजू, भिस्तबाग सर्व्हे क्रमांक २१ व ३३ आणि सावेडी सर्व्हे क्रमांक ३४ मधील रस्ता : संबंधित भागातील विकास योजना रस्ता तयार करणे, बंदिस्त पाईप गटार व पाणीपुरवठा पाइपलाइन टाकणे. प्रभाग क्रमांक एकमधील वरील सर्व विकासकामांचा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेत प्राधान्याने समावेश करावा. या कामांसाठी आवश्यक असलेला महानगरपालिकेच्या महासभेचा ठराव तातडीने महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा. त्यामुळे प्रभागातील रस्ते, पावसाळी पाण्याचा निचरा, बंदिस्त गटारी आणि पाणीपुरवठा व्यवस्थेचे प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल, असे नगरसेवक संपत बारस्कर यांनी निवेदनात नमूद केले आहे.



गुरुवाणी – १०४
तीर्थंकर पुण्य ग्रहण करा

कोणी कोणाला आपले सुख दुःख, ज्ञान, चरित्र देऊ शकत नाही. आजचा अध्याय जगातील अलौकिक साधनेची चर्चा आहे. कोणी मला आनंद देऊ शकत नाही पण मी आनंद घेऊ शकतो. यासाठी जे माध्यम असते त्याला लेश्या म्हणतात. चंडकौशिककडे तीर्थंकर महावीर पोहोचले. चंडकौशिकने जन्मोजन्मीचे अपमान, दुःख पकडून ठेवले होते. माझे कोणीच मित्र होऊ शकत नाही अशी त्याची धारणा बनली होती. त्याच्यात अनेक जन्मांचे विष तयार झाले होते. त्याच्या नुसत्या नजरेने जीव मरण पावायचा. कारण त्याच्या विषयी प्रत्येकाच्या मनात भय होते. चंडकौशिक आपल्याला मारणारच अशी मानसिकता होती. जशी आपली मानसिकता असते तसेच आपल्या जीवनात होत राहते. आपण नकारात्मक मानसिकतेचे दरवाजे उघडे ठेवतो. पण तीर्थंकर महावीरांनी चंडकौशिकच्या विषासाठीआपले दरवाजे बंद केले. मन, वचन, काया गुप्ति केली. कोणाचेही पाप, राग, विष या लेश्या ग्रहण न करण्याचा निश्चय म्हणजे गुप्ति किंवा संवर असते. तीर्थंकरांनी आधी चंडकौशिकचे सगळे विष बाहेर पडू दिले. त्याचा कोणताही परिणाम तीर्थंकरांवर झाला नाही. हे पाहून चंडकौशिकही जागेवर थिजून गेला. त्याचा आतील दरवाजा खुला झाला आणि तीर्थंकरांच्या वात्सल्याचे अमृत त्याला प्राप्त झाले व चंडकौशिक आमूलाग्र बदलला. एखादी वस्तू कोणी दिली तरच ग्रहण केली जाऊ शकते. पण समोरच्याने दिली नाही तरी लेश्या ग्रहण केली जाऊ शकते. कोणाची लेश्या ग्रहण करायची हे ठरवायचे असते. सूर्य प्रकाश सगळ्यांसाठी समान आहे. तरीही प्रत्येक फुल वेगवेगळ्या रंगाचे असते. यामागे सायन्स आहे. फुलांमध्ये एक सिस्टीम असते, सूर्य प्रकाशापासून कोणती ऊर्जा ग्रहण करायची. जो रंग ग्रहण करायचा प्रोग्राम आहे, तोच रंग फक्त ग्रहण केला जातो. इतर सर्व रंग सोडून दिले जातात. सुधर्मा स्वामींनी परमात्म्याला ग्रहण केले. अर्जुन द्रोणाचार्यांचा शिष्य होता तर एकलव्य द्रोणाचार्यांचा भक्त होता. शिष्य गुरू जितके देईल तितकेच आत्मसात करतो. भक्त गुरूंकडील सगळेच घेतो. घेण्याचे सामर्थ्य आणि देण्याची कला ही जिन शासनाची अनोखी लेश्या आहे. आपण आपली श्रद्धा कोणाला देऊ शकत नाही. पण आपण लेश्या देऊ शकतो आणि घेऊही शकतो. जे आपण ग्रहण करू त्याचा परिणाम होतोच. जे ग्रहण करणार नाही त्याचा परिणाम होत नाही. म्हणूनच दिवाळीच्या पूजेवेळी चक्रवर्तीचे पुण्य ग्रहण करा, तीर्थंकर भगवान महावीरांचे पुण्य ग्रहण करा, इंद्रभूती गौतम, सुधर्मा स्वामींची भक्ती ग्रहण करा, विश्वातील स्वस्तिक ग्रहण करा.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्याबाबत आक्षेपार्ह व अवमानकारक पोस्ट; कारवाईची मागणी

नगर – नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजस्तंभ पूजन व धर्मध्वजारोहण कार्यक्रमास भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम झाले. यानंतर विकास लवांडे या व्यक्तीने समाजमाध्यमांवर राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्याबाबत आक्षेपार्ह, दिशाभूल करणारे व आदिवासी समाजाच्या अस्मितेला ठेच पोहोचवणाऱ्या अपमानकारक संदेश प्रसारित केला. याची सखोल चौकशी करून संबंधित व्यक्तीविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ नुसार कारवाई करण्याची मागणी अहिल्यानगर जनजाती कल्याण आश्रमच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी जनजाती कल्याण आश्रमाचे दक्षिण अहिल्यानगर संघटनमंत्री हरिजीत माळी, जिल्हा सचिव अनंत पुंड, डॉ.निळकंठ ठाकरे, नानासाहेब गुरसळ, विशारद पेटकर, हिंतरक्षाप्रमुख संदिप गायकवाड, श्रीरामपुर तालुका प्रमुख रमेश सोनवणे, पाथर्डी तालुका प्रमुख अर्जुन माळी, संगमनेर तालुका गटप्रमुख राकेश माळी, राहुरी तालुका गटप्रमुख दीपक वाघ, आदी पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनात म्हंटले आहे की, राष्ट्रपती या देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदावर विराजमान असून त्या आदिवासी समाजाचे प्रतिनिधित्व करतात. त्यांच्या या घटनात्मक पदाचा व प्रतिष्ठेचा सन्मान राखणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. विकास लवांडे या व्यक्तीने सदर कार्यक्रमानंतर समाजमाध्यमांवर राष्ट्रपती व त्यांच्या आदिवासी समाजाशी असलेल्या ओळखीचा संदर्भ देऊन चुकीचे, आक्षेपार्ह, अवमानकारक व दिशाभूल करणारे संदेश प्रसारित केल्याचे निदर्शनास आले आहे.



राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या बद्दल अक्षेपार्ह व अपमानकारक पोस्ट टाकणाऱ्या विकास लवांडे यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना देण्यात आले.

यामुळे संपूर्ण आदिवासी समाजाच्या भावना, स्वाभिमान व सामाजिक प्रतिष्ठेला ठेच पोहोचू शकते. समाजात जातीय तेढ, द्वेष किंवा वैमनस्य निर्माण होण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे विकास लवांडे यांनी समाज माध्यमावर टाकलेल्या संदेशांची, पोस्टची व व्हिडिओंची सखोल चौकशी करावी.

तसेच आदिवासी समाजाच्या अस्मितेचा, स्वाभिमानाचा आणि घटनात्मक पदावरील व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा प्रश्न असल्याने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

राधाकृष्ण विखे व राम शिंदे यांच्यात बंद दाराआड दीड तास चर्चा

जिल्हा बँक अध्यक्ष–उपाध्यक्ष निवडीच्या पार्श्वभूमीवर घेतली भेट

नगर – अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ६ नोव्हेंबर रोजी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या चौंडी (ता. जामखेड) येथील निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. एकाच पक्षात असूनही जिल्हा बँक निवडणुकीच्या निमित्ताने दोन्ही नेत्यांमध्ये काहीसे ताणलेले संबंध पाहायला मिळाले होते. मात्र, या भेटीदरम्यान दोघांमध्ये बंद दाराआड जवळपास दीड तास सविस्तर खलबतं झाली.



अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या चौंडी (ता. जामखेड) येथील निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली.

जिल्हा बँकेचा निकाल लागल्यानंतर आगामी १२ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीच्या संदर्भाने ही भेट अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. या पदासाठी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या नावाची चर्चा सुरू असून, राम शिंदे यांच्या मतदारसंघातील (कर्जत–जामखेड) दोन्ही उमेदवार विजयी झाल्याने त्यांच्या भूमिकेला वजन प्राप्त झाले आहे.

ही भेट पूर्वनियोजित होती. दिपावलीनिमित्त सदिच्छा भेट देण्यासोबतच जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, पाणी नियोजन आणि जामखेडमधील उपाययोजनांबाबत चर्चा झाल्याचे सांगत जिल्हा बँक निवडणूक संपल्याने तो विषय संपल्याचे विखे यांनी स्पष्ट केले. तर, आम्ही एकाच पक्षात आहोत. सहकारातील निवडणूक संपली असून भविष्यातील राजकारणात आम्ही एकत्र असू. बँकेच्या अध्यक्षपदाच्या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जे बोलावतील, त्या बैठकीला आम्ही जाऊ, अशी सकारात्मक आणि मवाळ भूमिका राम शिंदे यांनी भेटीनंतर मांडली.

या चौंडी येथील भेटीमुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीनंतर दोन्ही भाजप नेत्यांमधील राजकीय वितुष्ट संपून भविष्यात एकीचे नवे समीकरण आकारास येण्याचे संकेत मिळत आहेत.

बँकेचे नवनिर्वाचित संचालक घेणार मुख्यमंत्र्यांची भेट

जिल्हा बँकेच्या अध्यक्ष–उपाध्यक्षपदाची निवड दिवाळीनंतर लगेच १२ नोव्हेंबर रोजी होत असून नूतन संचालक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला जाणार आहेत. कर्जत व जामखेडचे दोन संचालक निवडून आले असून मुख्यमंत्र्यांनी मला बोलवले तर जावेच लागेल असे स्पष्ट करताना शिंदे यांनी त्यांच्याकडे २१ पैकी १८ संचालक असल्याने त्यांना माझी गरज भासणार नाही असा मिश्किल टोलाही लगावला.

राजकारणात दोस्ती : सहकारात कुस्ती

सहकार व प्रचलित राजकारण या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. प्रचलित राजकारणात विखे व मी एकाच पक्षात असून भविष्यातही आम्ही सोबत राहणार आहोत. परंतु सहकारात माझी ताकद नसल्याने कदाचित मला सामावून घेतले गेलेले नाही पण आता जिल्हा बँकेत माझेही दोन संचालक निवडून आल्याने माझ्या ताकदीचा त्यांना अंदाज आला असेल, अशी टीपण्णी राम शिंदे यांनी केली.



कर्डिले ब्युरो नर्सिंग होम संस्थेच्या ए.डी.एम.एल.टी. अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये मोहिनी मल्हारी खेडकर हिने शैक्षणिक गुणवत्तेत प्रथम क्रमांक पटकावून यश संपादन केले. त्याबद्दल तिचा सन्मान करण्यात आला.

मोहिनी खेडकर हिचे शैक्षणिक यश अभिमानास्पद

संस्थापक अध्यक्ष बाबुराव कर्डिले यांचे प्रतिपादन

नगर– वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात कर्डिले ब्युरो नर्सिंग होम, यश प्यारा मेडिकल इन्स्टिट्यूट, यश अलाईड आणि शुभ नर्सिंग या संस्थांच्या माध्यमातून अत्यंत उल्लेखनीय कार्य सुरू आहे. गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत त्यांचे भविष्य घडविण्याचे काम या संस्थांच्या माध्यमातून होत आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव कर्डिले आणि मंगल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेले हे कार्य कौतुकास्पद आणि प्रेरणादायी असल्याचे मत मोहिनी खेडकर हिच्या पालकांनी व्यक्त केले.

संस्थेच्या ए.डी.एम.एल.टी. अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये मोहिनी मल्हारी खेडकर हिने शैक्षणिक गुणवत्तेत प्रथम क्रमांक पटकावून यश संपादन केले.

या यशाबद्दल तिचे पालकांनी आनंद व्यक्त करत संस्थेच्या वतीने मिळालेल्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

मोहिनी खेडकर हिने विद्यार्थ्यांना संदेश देताना त्यांनी सांगितले की, प्रत्येक विद्यार्थ्याने आई–वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून गुरुजनांचा सन्मान करावा. मेहनत, प्रामाणिकपणा, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आयुष्यात मोठे यश संपादन करावे. आपल्या यशातून आई–वडील आणि शिक्षकांच्या चेहऱ्यावर अभिमानाचे हास्य फुलवावे. संस्थेच्या माध्यमातून वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होत असून, संस्थेची अशीच उत्तरोत्तर प्रगती व्हावी, अशा शुभेच्छाही त्यांनी यावेळी दिल्या.

प्रास्ताविक कोमल पंचमुख यांनी केले.



स्थानिक विकास निधीच्या माध्यमातून मिळणारा ५ टक्के निधी शेंडी ग्रामपंचायतीने किराणा किटच्या माध्यमातून खर्च केला. त्याचे वितरण आ. अक्षय कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आले.

किराणा किटमुळे दिव्यांगाची दिवाळी गोड

आमदार अक्षय कर्डिले यांचे प्रतिपादन

नगर – स्थानिक विकास निधीच्या माध्यमातून मिळणारा ५ टक्के निधी शेंडी ग्रामपंचायतीने किराणा किटच्या माध्यमातून खर्च केला. यामुळे दिव्यांगाच्या चेहऱ्यावर हसू निर्माण झाल्याचा आनंद हा काही वेगळा असतो. त्याबद्दल नक्कीच शेंडी ग्रामपंचायतीचे धन्यवाद देत आ. अक्षय कर्डीले यांनी कार्यकर्त्यांचे कौतुक केले.

आम्ही सदैव ग्रामपंचायतच्या माध्यमातून गावातील दिव्यांग बंधू भगिनीं यांना सहकार्य करून प्रत्येक वर्षी निधीचे वाटप करून मदत करत असतो असे शेंडी ग्रामपंचायत सरपंच प्रयागा लोंढे यांनी सांगितले.

आज दिवाळीनिमित्त शेंडी गावातील ३२ दिव्यांगाना किराणा वाटप करून एक वेगळा आदर्श निर्माण केल्याचा आनंद वाटतो, असे भाजपा दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हा अध्यक्ष वसंत शिंदे म्हणाले.

स्व. आ. शिवाजी कर्डीले यांनी आमची संजय गांधी निराधार अनुदान पेन्शन २५०० रूपये करण्यासाठी सिंहाचा वाटा उचलला. तसेच आ.अक्षय कर्डिलेही नेहमीच आमच्या दिव्यांगच्या समस्या समजून घेऊन मार्गी लावतात.


अहिल्यानगर शहराच्या आसपास एक दिव्यांग भवन उभारावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य सुनिल देठे, रमेश देठे, माजी ग्रामपंचायत सदस्य अविनाश शिंदे, एकनाथ शिंदे, गावातील दिव्यांग बंधू, भगिनी उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

सारडा महाविद्यालयात सर्वांगीण प्रगतीसाठी योग्य मार्गदर्शन

सुमतीलाल कोठारी यांचे प्रतिपादन; 'बिन रंगाची गोष्ट' या विजेत्या एकाकीकेतील कलाकारांचा सत्कार

नगर – सारडा महाविद्यालयात केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला, क्रीडा, नाट्य आशा सर्व क्षेत्रांमधील यशासाठी योग्य मार्गदर्शन केले जात आहे. त्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये यशाचा डंका पेटवत आहेत. यामुळे महाविद्यालयाचे नावलौकिक वाढत आहे, असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे सचिव सुमतीलाल कोठारी यांनी केले.



'बिन रंगाची गोष्ट' या विजेत्या एकाकीकेतील कलाकारांचा सुमतीलाल कोठारी व महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा यांच्या हस्ते करण्यात आले.

अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या नाट्यपरिषद करंडक एकांकिका स्पर्धेच्या अंतिम फेरीत पेमराज सारडा महाविद्यालयाच्या 'बिन रंगाची गोष्ट' या एकांकिकेने सांघिक तृतीय पारितोषिकासह वैयक्तिक ५ पारितोषिके पटकावली. या यशाबद्दल सारडा महाविद्यालयात आयोजित कौतुक सोहळ्यात एकांकिकेत सहभागही कलाकारांचा सत्कार संस्थेचे सचिव सुमतीलाल कोठारी व महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, संचालिका प्रा.ज्योती कुलकर्णी, डॉ.पारस कोठारी, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, नाटकाचे मार्गदर्शक प्रा.प्रसाद बेडेकर, मध्यवर्ती नाट्य परिषदेचे कोशाध्यक्ष सतीश लोटके यांच्यासह कलाकार उपस्थित होते.

यावेळी मधुसूदन सारडा यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. 'बिन रंगाची गोष्ट' या एकांकिकेमध्ये पाण्याच्या गंभीर प्रश्नावर प्रकाश टाकण्यात आला आहे. महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी गौरी डांगे हिने ही एकांकिका लिहिलेली असून, याचं दिग्दर्शन महाविद्यालयाचा विद्यार्थी निरंजन केसकर यानी केले आहे. या नाटकाची मूळ संकल्पना अमोल साळवे याची आहे. या विद्यार्थ्यांना नाट्य परिषद उपनगर शाखेचे अध्यक्ष आणि महाविद्यालयातील शिक्षक प्रा. प्रसाद बेडेकर यांचे मार्गदर्शन मिळते आहे.

मुबई येथे झालेल्या महाअंतिम फेरीत या एकांकीने सांघिक तृतीय परितोषिक (रोख ५० हजार रोख), नेपथ्यचे तृतीय पारितोषिक, लक्षवेधी अभिनेता यशवंत दुसुंगे, लक्षवेधी अभिनेत्री मृण्मयी ठोंबे, दिग्दर्शन तृतीय निरंजन केसकर आसे विविध पारितोषिके मिळवली आहेत.

शुद्धतेची परंपरा,
सणांचा खरा आनंद.
खास दिवाळीसाठी नमकिन व मिठाई
धनत्रयोदशी व दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
चावंडा केटरर्स
चावंडा स्पेशल लवंग शेव, मोहन थाळ,
काजु गजक, ड्रायफ्रुट कसाटा
प्रोप्रा. मुरली महाराज : 9823030554 । रवि उपाध्ये : 8412902554
चावंडा सदन, अभिनव रेसिडेन्सी, विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर

सर्व ग्राहक व नगरकर यांना
दिपावली व पाडवाच्या
हार्दिक शुभेच्छा...!
पित्रोडा सेल्स
गुलमोहर रोड
संपर्क: 9823704000
प्लायवुड, लॅमिनेट, वुड,
मोल्डिंग, सी.एन.सी. वर्क
सर्व प्रकारचे प्लायवुड व लाकडी फर्निचर चे कामे
साईटवर देखील केली जातील.

विकणे आहे
2BHK
रो-हाऊस घर
विकणे आहे
केडगाव एकनाथनगर
भागातील सरस्वती
टॉवर्स मागील
9890312412

सावेडी येथील नामांकित शोरुमसाठी
त्वरित पाहिजेत
सेल्समन/सेल्सगर्ल- १०
१ ते २ वर्षाचा अनुभव
कॅशिअर-०४
(आकर्षक पगार) -अर्जासह समक्ष भेटा -
Franchise by - DB VENTURES One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Address : Opp. Gold's Gym,
TV Center, Savedi Road, A.Nagar
7887395983

पाहिजेत
कराळे क्लब हाऊस येथे
लेडीज जीम ट्रेनर
सावेडी, एस.टी.स्टॅण्ड मागे, अहिल्यानगर
7410741363 / 7385223421

DCM SHRIRAM
Growing with trust
Fenesta
Better by Design
भारताची नंबर 1
खिडक्यांचा आणि दरवाजांचा ब्रँड
uPVC | Aluminium | Doors | Façades
आता अहिल्यानगर (अहमदनगर) मध्ये आहे.
CHANDAN GLASS
Plot No.23, Industrial Estate, Kedgaon, Ahilyanagar-414005, Maharashtra.
Ph: 9860119223

HAPPY Diwali
Light up the festivities with timeless style
THE Raymond SHOP
Custom Tailoring | Ready-to-Wear | Accessories
GALAXY
अहिल्यानगर
शॉप नं. २५८८, लोकसेवा हॉटेल जवळ, एम्. जी. रोड, कापडबाजार. ☎ ०२४१-२९९१६६०
शॉप नं. १ ते ३, ग्राऊंड फ्लोअर, माऊली संकुल, झोपडी कॅन्टीन जवळ, सावेडी. ☎ ०२४१-३३५३०९२

खास दिवाळी
आणि भाऊबीज
निमित्ताने
घरगुती व्यवसाय करणाऱ्या लाडक्या बहिणींसाठी
खास सवलत योजना तुम्ही आमच्या कडून आवडेल
त्या साड्या होलसेल दरात घेऊन जा आणि
न विकलेल्या साडया परत देऊन
नवीन स्टॉक घेऊन जा.
साड्या रिटेलमध्ये पण मिळतील
सियाराम पॅन्ट पीस शर्ट पीस जोडी 499/- रु मध्ये
रेमंड शुटिंग ₹ 299/- मीटर मध्ये
सर्व प्रकारचे फॅन्सी रेडिमेड वर 20 ते 50 % डिस्काऊंट
5 x 7 चा वेलवेट गालिचा 249/- रु मध्ये
सर्व वस्तूंची अशी रेंज जी रेग्युलर मार्केटला पहायला मिळणार नाही.
आणि तेही होलसेल रेटमध्ये...
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर
कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ,
मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

दिवाळी महासेल..
स्टॉक असेपर्यंत...
महिलांसाठी : साडी, कुर्ती, लेगीन्स, वन पीस,ब्लाऊज भारी, टॉप, लोवर
रु.२००/-ला काहीही १ व रु.५०० ला ३
लेडीज : स्मॉल ते XL टू पीस, कॉर्ड सेट, नाईट ड्रेस रु.२५०/-
टू पीस 3XL ते 6xL रु.३००/-
* लहान मुला-मुलींचे ड्रेस रु. २०० पासून पुढे
* लहान व मोठ्या मुलींचे भारी कपडे रु.३०० पासून पुढे
प्रत्येक रु.१००० च्या खरेदीवर एक लकी ड्रॉ कुपन..
* बेडशीट+पिलो कव्हर
100 x 100 चे ८०० चे रु.४००/-
108 x 108 चे रु.१२०० चे रु.५००/-
वेळ : दुपारी १२ रात्री ८ वाजेपर्यंत
* ब्रॅण्डेड लेडीज २ पीस थ्री पीस रु.१००० पासून पुढे
* जेन्टसचे ब्रॅण्डेड शर्ट, टी-शर्ट 6XL पर्यंत तसेच फॉर्मल पॅण्ट व जीन्स ४४ साईजपर्यंत व जम्बो बेडशीट उपलब्ध.
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

फेब इंडियन
हेण्डलूम एण्ड हेण्डीक्राफ्ट
आर्ट & क्राफ्ट
एक्झीबीशन
Diwali SPECIAL
आमच्या एक्झीबिशन मध्ये कोणत्याही दुकानातून रु. 1999 पेक्षा जास्त खरेदी करा आणि लकी ड्रॉमध्ये जिंका आकर्षक बक्षिसे
• चंदेरी आणि पटोरा साडी
• बनारसी साडी-ड्रेस मटेरिअल्स
• पॅच वर्क • पश्चिम बंगाल साडी
• लखनवी चिकन • कोटा सिल्क
• काश्मीर सूट आणि पश्मिना शाल
• जयपुर बेडशीट्स • राजस्थानी मोजरी
• भदोई कार्पेट • ज्वेलरी • खादी शर्ट
BOOKS • गृह उपयोगी वस्तु
वेळ : स. ११.०० ते रा. १०.०० पर्यंत
पार्किंग व एन्ट्री फ्री
ओपन ग्राउण्ड - पारिजात चौक
तांबटकर मळा, गुलमोहर रोड, अहिल्यानगर

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 30 ते 05 नोव्हेंबर 2026
रामायण ३ डी (हिंदी)
07:00 AM 06:15 PM
10:45 AM 10:00 PM
02:30 PM
रामायण २ डी (हिंदी)
08:00 AM 08:45 AM
11:45 AM 12:30 PM
03:30 PM 04:15 PM
07:15 PM 08:00 PM
11:00 PM 11:35 PM
10:00 AM 01:45 PM
05:30 PM 09:15 PM
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

ॲडव्हान्स बुकिंग सुरू
MY cinema
AHILYANAGAR'S 1ST
5-SCREEN MULTIPLEX
Pipeline Road, Ahilyanagar. Onling Booking - BookMyShow
Show - 7/11/2026 to 12/11/2026
RAMAYANA (2D) - 7:30, 8:00, 8:45, 11:00, 11:30 am, 12:15, 2:30, 3:00, 3:45, 6:00, 6:30, 7:15, 9:30, 10:00, 10:45 pm,
RAMAYANA (3D) - 8:30 pm, 12:00, 3:30, 7:00, 10:30 pm.
Booking No. : 9325085347 | टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात.

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : ७,८,९ नोव्हेंबर 2026
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
७ नोव्हेंबर 2026
SCREEN - 1 SCREEN - 2
10.00 AM 230/- 09.00 AM 180/-
02.00 PM 250/- 01.00 PM 200/-
06.00 PM 330/- 05.00 PM 280/-
10.00 PM 330/- 09.00 PM 280/-
८ नोव्हेंबर 2026
SCREEN - 1 SCREEN - 2
09.00 AM 230/- 09.00 AM 180/-
01.00 PM 250/- 01.00 PM 200/-
05.00 PM 330/- 05.00 PM 280/-
09.00 PM 330/- 09.00 PM 280/-
९ नोव्हेंबर 2026
SCREEN - 1 SCREEN - 2
08.00 AM 230/- 09.00 AM 180/-
11.30 PM 250/- 01.00 PM 200/-
03.00 PM 330/- 05.00 PM 280/-
06.30 PM 330/- 09.00 PM 280/-
10.00 PM 330/-
कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
आशा स्क्वेअर
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

या प्रकाशाच्या सणाला,
तुमच्या खात्यात आनंद,
आरोग्यात समृद्धी, आणि आयुष्यात
लक्ष्मीचा भरपूर संचय होवो !

बँकेचे भागधारक, खातेदार,ठेवीदार व हितचिंतक सर्वांना
दीपावली व नूतनवर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

नितीन भंडारी, मुख्य कार्यकारी अधिकारी | हस्तीमल मुनोत, संस्थापक चेअरमन व विद्यमान संचालक | अमित मुथा, व्हा.चेअरमन | संजय चोपडा, चेअरमन

संचालक मंडळ

अनिल पोखरणा, कमलेश भंडारी, आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी,
सीए आयपी अजय मुथा, सीए मोहन बरमेचा, किशोर मुनोत, संजीव गांधी, सुभाष बायड
श्रीमती प्रमिलाबाई बोरा, श्रीमती मीनाताई मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड,
जितेंद्र बोरा (कर्मचारी प्रतिनिधी) * प्रसाद गांधी (कर्मचारी प्रतिनिधी)

बोर्ड ऑफ मॅनेजमेंट - सीएआयपी अजय मुथा (चेअरमन), किशोर मुनोत,
राजेश झंवर, पेमराज बोथरा, सीए प्रवीण कटारिया

अहमदनगर मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. (शेड्यूल्ड बँक)

मर्चन्टस् बँक जेथे.. लक्ष्मी वास करी तेथे...
प्रधान कार्यालय : प्लॉट नं. ३३, मार्केट यार्ड, स्टेशन रोड,
अहिल्यानगर. फोन : ०२४१ -२३२२२२२

• व्यापारी व उद्योजकांसाठी नजर गहाण कर्ज
• एस.एस.आय. नजरगहाण कर्ज/टर्म लोन
• आउट कॅश क्रेडिट कर्ज
8.50% व्याजदर

• एम.एस.एम.ई. (मॅन्युफॅक्चर) कर्ज - 8.00% व्याजदर

• एस.एस.आय. मशिनरी कर्ज
एस.एस.आय. बिल्डींग कर्ज
9.50% व्याजदर

• मशिनरी कर्ज 10.50% व्याजदर

दीपावली शुभचिंतन

ठेवीवरील आकर्षक व्याजदर
१ वर्षापेक्षा जास्त २ वर्षा पर्यंत 6.50%
ज्येष्ठ नागरिक 6.75%

कार लोन 8% व्याजदर
हाऊसिंग लोन 6.50% व्याजदर

बँकेच्या विविध सुविधा - * नेट बँकींग * मोबाईल बँकींग * युपीआय * एटीएम * आरटीजीएस, एन.ई.एफ.टी. इ. सुविधा उपलब्ध...

शाखा : अ.नगर- दाळमंडई । मार्केट यार्ड । कापडबाजार । गुलमोहर रोड । चितळे रोड । एम.आय.डी.सी । तारकपुर
जामखेड । छ.संभाजीनगर । पुणे । श्रीगोंदा । शेवगाव । पाथर्डी । सोनई । घोडनदी । कडा । छ.संभाजीनगर (मोंढा)। नारायणगाव

गृहकर्ज व लोन अगेंस्ट प्रॉपर्टी

स्वप्नातील घरासाठी आजच संपर्क करा

- नवीन व जुने घर खरेदी
- घर नूतनीकरणासाठी
- जुने लोन आमच्याकडे ट्रान्सफर करून अधिक लोन मिळवा
- प्लॉट घेऊन कन्स्ट्रक्शन
- सेल्फ कन्स्ट्रक्शन

आपल्याकडे लोन केले जाणारे प्रॉपर्टीचे प्रकार

- गावठाण व सिटी सर्वे
- ग्रामपंचायत हद्दीतील तहसील एन. ए. प्रॉपर्टी
- तहसील एन.ए.
- कलेक्टर एन.ए.
- प्लॅन व परमिशनची गरज नाही

पात्रता

- व्यावसायिक
- पगारदार व्यक्ती
- कॅश सॅलरी
- विना इनकम प्रुफ बिझनेस
- नगर शहरापासून पासून ६० किलोमीटरपर्यंत लोन होईल

9860150081

दीपावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा

स्पेशल गुलाबजाम

गावराण तुपातील जिलेबी । चुरमा
बुंदी लाडू । स्पेशल कंदी पेढे
बेसन लाडू । खवा लाडू । लसून शेव
चकली । बाकरवडी । करंजी । शंकरपाळे

खास दीपावली करिता

घरगुती लक्ष्मीपुजनासाठी मिठाई बॉक्स

गावरान तुपातील मिठाई मिळण्याचे एकमेव ठिकाण

बन्सी महाराज मिठाईवाले

रामचंद्र खुंट, अहिल्यानगर

9860939981, 9881761101

बाळ आजारी आहे का?

- ते वारंवार आजारी असणे
- नेहमी सर्दी, खोकला
- वारंवार होणारा बाल दमा
- वारंवार जुलाब होणे
- प्रतिकारशक्ती कमी असणे
- वजन, उंची कमी

या तक्रारींवर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबीर

*सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
*सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

संपर्क : मो. ९५१११११०४४४
डॉ.अनिरुद्ध गिते MBBS / MD paeds

अक्षय मुलांचे हॉस्पिटल बालिकाश्रम रोड, अ.नगर

सोन्याच्या पावलांनी लक्ष्मी येवो दारी,
दागिन्यांची चकाकी नांदो घरोघरी !

दिपावली व पाडव्यानिमित्त सर्व ग्राहक हितचिंतकांना हार्दिक शुभेच्छा !

सुवर्ण संचय योजना

मेट्रोचे सुपरफास्ट गोल्डलोन फक्त २० मिनिटात

ADN

आपल्या स्नेह व सहकार्याच्या पाठबळावर ५४ व्या वर्षात पदार्पण करीत आहोत.

अशोक दत्तात्रय नांदुरकर (सराफ)

गोल्ड व्हॅल्युअर - शहर सहकारी बँक, ए.डी.सी.सी. बँक
भाजी मार्केट जवळ, गोल्डन अपार्टमेंट, गंज बाजार, अ.नगर.
मो. ९०२८०५७४३८, ९९२१९९७७९०

॥ १५ वे पुण्यस्मरण ॥



कै. सुरेखा अविनाश दळवी

(स्वर्गवास दि. १३/११/२०१२ (लक्ष्मीपुजन)

संस्कार, स्नेह, सहानुभूती या तत्वातुन घडली,
आपल्या जीवनाची अमृतगाथा..
प्रेरणा देत राहतील आपल्या स्मृती आम्हां सदैव आता...

* दुःखांकित *

अविनाश रामदास दळवी
मयुर अविनाश दळवी । सौ. सोनल मयुर दळवी
संदिप अरुणशेठ बोराटे । सौ. स्नेहा संदिप बोराटे
कु.तनिष्का । कु.श्रिक्षा । कु.अधिराज

समस्त दळवी परिवार

न्यायालय अपर कलेक्टर एव विवाह अधिकारी, जिला जशपुर (छ.ग)

ईश्तहार

क्रमांक/४९४३/वाचक-२/अपर काले/२०२६
जशपुर दिनांक २९/१०/२०२६

सर्वसाधारण को इस ईश्तहार के जरिये सुचित किया जाता है कि आवेदक श्री. सतीश भूमकर पिता श्री. यादव भूमकर, उम्र ३३ वर्ष, जाती माली, ग्राम शेवगाव, थाना शेवगाव तहसील शास्त्रीनगर शेवगाव जिला अहमदनगर (महाराष्ट्र) एव आवेदिका कु. गायत्री सिंह पिता श्री. जगेश्वर राम उम्र 30 वर्ष जाति रौतिया, ग्राम बांसटोली फरसाकानी थाना कुनकुरी तहसील कुनकुरी जिला जशपुर (छ.ग) द्वितीय पक्ष ने विशेष विवाह अधिनियम १९५४ की धारा ०५ के तहत आवेदन पत्र प्रस्तुत कर आशयित विवाह की सूचना दी गई है। उक्त प्रकरण की सुनवाई दिनांक १३/११/२०२६ को दोपहर ०३.०० बजे मेरे न्यायालय में. होगी।

उपयपक्ष के विवाह के संबंध मे जिस किसी को अपत्ति करना हो तो निर्धारित तिथि एव समय के पुर्व स्वयं अथवा अपने अभिभाषक के माध्यम से उपस्थित होकर प्रस्तुत कर सकते है। निर्धारित समयावधि के पश्चात प्राप्त आपत्ति पर विचार नही किया जाएगा।

आज दिनांक ०७/१०/२०२६ को मेरे हस्ताक्षर एव न्यायालय की मुद्रा से जारी किया गया।

जशपुर,
दिनांक २९/१०/२०२६
अपर कलेक्टर
जिला जशपुर (छ.ग)

CELEBRATING 36 Years

३६ वर्षे सेवा, विश्वास आणि गुणवत्तेची

आपणा सर्वांच्या विश्वासाच्या पाठबळांवरच
आम्ही ३७ वर्षे अर्थपूर्ण सेवा अविरत प्रदान करीत आहोत..
असाच दृढ विश्वास चिरंतर राहो हीच सदीच्छा...

दिपतेजाची आली दिवाळी.. नवसंकल्पांचे आले नवे वर्ष..
आनंदाने.. उत्साहाने स्वागत करू सहर्ष...

कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या.

मुख्य कार्यालय : श्रीरंग अपार्टमेंट, शनि मंदिरासमोर, गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक, अ.नगर. फोन : २३४५९८३.
Email : kailasnagari@gmail.com

सर्व सभासद, खातेदार, ठेवीदार आपणा सर्वांना ही दिपावली सुख-समृद्धीची व भरभराटीची जावो हीच शुभकामना...

दामदुप्पट भरावयाची रक्कम	मुदतीनंतर मिळणारी रक्कम				
	१ वर्ष	२ वर्ष	३ वर्ष	४ वर्ष	५ वर्ष
रूपये ५००	६३०० रु.	१३३२५ रु.	२१०५० रु.	२९६०० रु.	३९०५० रु.
रूपये १०००	१२६०० रु.	२६६५० रु.	४२१०० रु.	५९२०० रु.	७८९०० रु.

लाभांष १२%
भागभांडवल २८.०५ लाख
ठेवी १४.७९ कोटी

ठेवीदारांसाठी आकर्षक ठेव योजना

अल्पमुदत ठेव खाते
४६ दिवस ते १ वर्षाच्या आत
द.सा.द.शे. ९%

मुदत ठेव खाते
१३ महिने ते २ वर्ष द.सा.द.शे. १०%
२५ महिने ते पुढे द.सा.द.शे. १०.५०%

दामदुप्पट ठेव योजना
९० महिने

सोनेतारण कर्ज सुविधा
१२ %

वाहन कर्ज योजना
१५ %

१० ग्रॅम सोनेतारणावर रु. ७०,०००/-

MIS योजना
१,२०,०००/- ठेव ठेवा व १०००/- रु. प्रत्येक महिन्याला व्याज मिळवा...

श्री. रखमाजी निस्ताने, चेअरमन/ संस्थापक
श्री. चंद्रकांत औशीकर, व्हा. चेअरमन

संचालक मंडळ - श्री. सागर चवंडके, श्री. अनंता औशिकर, श्री. जगन्नाथ बहिरवाडे, श्री. अमोल निस्ताने, श्री. रोहिदास नामदे, सौ. उषाताई खताडे, श्रीमती जयश्री घिडकर, श्री. संतोष थिवर, • श्री. शंकर मिसाळ (सेक्रेटरी) • तज्ञ संचालक - श्री. सुभाष भागानगरे, श्री. होनाजी गोडळकर • तडजोड, गाऱ्हाणे आणि तक्रार निवारण समिती - सुभाष दारवेकर, गंगाधर सोनवणे
कर्मचारी वृंद - गणेश गोडळकर, अजिंक्य कलागते, अमोल बारस्कर, गणेश भुजबळ



१४ वे ॥ पुण्यस्मरण ॥

हास्य तुमच्या चेहऱ्याचे,
आठवे पावलो पावली..
सन्मार्ग तुम्ही दाखवलात,
पण हरवली मायेची सावली..

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!

स्व. अर्जुनराव चिमाजी चवंडके
स्व.दि. ९/११/२०१२

- दुःखांकित -
दत्तात्रय चिमाजी चवंडके
गणेश रामभाऊ चवंडके
विजय भिमराव चवंडके
विशाल भिमराव चवंडके
सागर अर्जुनराव चवंडके
सचिन अर्जुनराव चवंडके
रविंद्र दत्तात्रय चवंडके
योगेश दत्तात्रय चवंडके

समस्त चवंडके परिवार